# नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा

# लेखा परीक्षण अहवाल

# 2014-2015

सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा,सातारा

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा,जिल्हा परिषद विस्तारी इमारत, दुसरा मजला, सातारा

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा यांनी 2014-2015 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा**

**लेखापरीक्षण अहवाल सन 2014-15**

---

जा.क्र.स्था. 2 /ब/ले.प.अ/न.प. सातारा/2014-15/५४८

सहायक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
म.रा.सातारा यांचे कार्यालय,
दिनांक १8/08/2016

प्रेषक,
सहसंचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
पुणे विभाग, पुणे.

प्रति,
मा. अध्यक्ष,
नगरपरिषद सातारा

नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा सन 2014-15 या वर्षाचे लेखापरिक्षण श्री. शैलेश हिं. मोरे, सहाय्यक संचालक, श्री. वि. शा. ढावरे, श्री. श. मा. कुलकर्णी, सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, श्री. मा. स. शिंदे, श्री. सा. रा. चौगुले, श्री. श्री.ग. खेडकर, श्री. सु.नि. कदम, वरीष्ठ लेखापरीक्षक व रा.बा. बरकडे, श्री. सु. पु. वीर, श्री. मि. वि. जगताप, श्री. यो. शा. शिंदे, श्री. अ.प. साबळे कनिष्ठ लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा, यांनी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारणा 2011) चे नियम 4 अन्वये दिनांक 11/04/2016 ते 20/05/2016 या कालावधीत पूर्ण केले. पुनर्विलोकन श्री. मा. श. वाघमारे, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा यांनी व अंतिमीकरण श्री. दि. रा. सुर्यवंशी, सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे विभाग, पुणे यांनी दिनांक ९/08 /2016 रोजी चर्चा करुन अंतिमीकरण केले आहे.

लेखापरिक्षण कालावधीत खालील प्रमाणे अधिकारी व पदाधिकारी पंचायत समितीचा कारभार पहात होते.

| अ क्र | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | सौ. सुजाता सागर राजेमहाडीक | अध्यक्ष | 01/04/2014 ते 14/07/2014 |
| 2 | श्री. सचिन अशोक सारस | अध्यक्ष | 14/07/2014 ते 31/03/2015 |
| 3 | श्री. अभिजीत सतिश बापट | मुख्याधिकारी | 01/04/2014 ते 31/03/2015 |

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा.

अध्यक्ष
सातारा नगर परिषद

सहसंचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
पुणे विभाग, पुणे

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ......1

I PART I : भाग १ ......2

मागील लेखा परीक्षण अहवाल ......3

PART II ......7

**कलम ९ अ खालील आक्षेप ......8**

1 कुपर कारखाना ते कमानी हौद अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ......9

2 ई निविदा कार्यप्रणाली अंमलबजावणीबाबत. ......11

3 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी योजना (IHSDP) घरकुल बांधणे सुविधा खर्चाबाबत. ......12

4 गोडोली राजमाता जिजाऊ उद्यान ते गोडोली समाजमंदीर ते खामकर घर ते गोडोली जकातनाका अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ......14

5 पेठ मल्हार प्रभाकर स्टोअर्स ते कामेरी चौक ते करंजे नाका रस्ता डांबरीकरण करणे ......16

6 नगरपरिषदेच्या मुख्य इमारतीलगत असणा-या श्री. छत्रपती शाहु रस्त्याच्या बाजूस लोअर ग्राऊंडला भराव करुन पार्किंग व्यवस्था करणे. ......17

7 पेठ गुरुवार सि.स.नं. 191ब येथे संरक्षक भिंत बांधणे. ......19

8 महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 व पेठमाची सिसनं 38 येथे चार सिट शौचालय बांधणे काम व सदर योजनेतील कामांबाबत. ......21

9 मुदतवाढ दिलेल्या कामांबाबत. ......22

10 प्रभाग क्रमांक 10, पेठ चिमणपुरा ढोणे कॉलनी अंतर्गत रस्ता दुरुस्ती खर्चाबाबत. ......24

11 अपुर्ण कामांबाबत ......25

12 बांधकाम विभाग तांत्रिक मंजूरी फी छाननी फी थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट रिपोर्ट, कामाचे डिझाईन फी याबाबींचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. ......26

13 समर्थ मंदीर ते बोगदा रस्त्यावरील जय हनुमान वडार सोसायटी जवळील पुलाचे रुंदीकरण करणे. ......27

14 वाहन दुरुस्तीबाबत ......29

15 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत ......30

16 नळ पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत. ......31

17 घनकचरा व्यवस्थापन न केलेबाबत. ......33

18 नगरपरिषद क्षेत्रातील घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचरा गोळा करणे. ......34

19 चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना साडया व ब्लाऊज खरेदीबाबत. ......36

20 जंतुनाशके खरेदीबाबत. ......37

21 अंदाजपत्रकातील कमी जादा खर्चाबाबत ......39

22 नगरपरिषद मुख्य कार्यालय ते शाही मशिद अखेर नवीन पोल बसवून स्ट्रीट लाईटची सोय करणे कामाबाबत. 42
23 अपंग कल्याणकारी खर्चाबाबत. ....43
24 ई.सी.एच.एस. पॉलीक्लिनीक सातारा या ठिकाणी नवीन एअर कंटीशनर बसविणेबाबत. ....45
25 सिसनं 58, मल्हारपेठ जवळील श्री. छत्रपती अभयसिंहराजे उद्यान येथे फायबर म्युअरल्स बसविणे. ....46
26 थकीत कर वसूली व त्याच्या नोंदीबाबत. ....47
27 एस.एल. ओ. नोंदवही न ठेवलेबाबत. ....49
28 आर्थिक स्थितीवरील अभिप्राय. ....50

**कलम ९ ब खालील आक्षेप ....52**

29 सातारा नगरपालिका हद्दीतील सदरबझार 409/4 नढे मंगल कार्यालयाजवळ पाईप ड्रेन करणे व रस्त्यावर भराव करुन मजबुतीकरण करणे. ....53
30 प्रभाग क्रमांक 3 सुखटणकर हॉस्पीटल ते दाजी नलवडे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ....54
31 प्रभाग क्रमांक 10 पेठमाची सि.स.नं. 56 अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे व गटर आणि पाईप ड्रेन करणे. ....56
32 प्रभाग क्रमांक 9 पेठ शनिवार चोरगे घर ते नातूवाडा अखेर रस्ता ....57
33 सदर बझार कॅनॉल ते पारशी अग्यारी ते कत्तलखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ....58
34 प्रभाग क्रमांक 3(अ) सि.स.नं. 196 रविवार पेठ ते 47 पंताचा गोट जुरवे घर ते 13 ब पंताचा गोट अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ....60
35 प्रभाग क्रमांक 10 पेठ मंगळवार संत कबीर सोसायटी व बेडकर घर ते भंडारे घर येथील रस्ता दुरुस्ती करणे. 61
36 प्रभाग क्रमांक 10 पेठ मंगळवार धस कॉलनी व वडार वस्ती या ठिकाणी रस्ता दुरुस्ती करणेबाबत. ....63
37 चांदणी चौक ते मंगळवार तळे रस्ता डांबरीकरण करणे. ....65
38 वाहन वापरावरील इंधन व देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत. ....66
39 शहापूर योजना बिगरसिंचन पाणीपट्टी भरणा करणेबाबत. ....67
40 शहापूर पंपींग स्टेशन मधील 150 एच.पी. मोटार व पंपसेट दुरुस्ती करणेबाबत. ....69
41 करांची मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत ....70
42 प्रलंबित तसलमात रकमांबाबत. ....71
43 प्रभाग क्रमांक 2 राजू शेळके घर ते होमगार्ड अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे ....73
44 कर वाढ व घट नोंदवहीबाबत. ....75
45 जाहिरात कराबाबत. ....76

**कलम ९ क खालील आक्षेप ....78**

**———— निरंक ———— ....79**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....81**

46 कार्यादेश पुस्तक (नमुना नंबर 23) न ठेवलेबाबत. ....82
47 थकीत लेखापरीक्षण आक्षेपांबाबत. ....82
48 घसारा निधीबाबत. ....83
49 नगरपरिषदेमध्ये दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत. ....84
50 ऐक्य कॉर्नर ते दळवी घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे. ....85
51 सातारा शहरातील कुपनलिका (बोअर) दुरुस्ती करणेबाबत. ....86
52 वाढीव पाणी पुरवठा योजना कुशल, अकुशल व तांत्रिक कर्मचारी नमून चालविणे. ....87
53 निवृत्ती वेतन अंशदान नोंदवही व सेवापुस्तकातील तफावतीबाबत. ....89
54 भविष्य निर्वाह निधी लेख्यांबाबत. ....90
55 नळ जोडणी गणना करणेबाबत. ....91
56 वृक्ष लागवड व त्यांचे जतन वृक्ष गणना याबाबत. ....92
57 विद्युत पोल व दिवे यांच्या नोंदवहया न ठेवलेबाबत. ....93
58 दिग्विजय ऑटोमोबाईल ते रयत शिक्षण संस्था अखेर डिव्हायडरमध्ये लॅम्प्स व केबल बदलणे. ....94
59 शाहुकला मंदीर व देखभाल दुरुस्ती खर्चाबाबत. ....95
60 अनामत नोंदवहीबाबत ....97
61 नगरपालिका फंडातून केलेल्या निवडणुक खर्चाबाबत. ....98
62 विविध प्रकारच्या नोंदवहया अपुर्ण असल्याच्या अनियमिततेबाबत. ....99
63 गाळा भाडे/इमारत भाडे थकबाकी वसुलीबाबत ....100
64 पथदिवे देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत. ....101

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....104

**विवरणपत्रे व जोडपत्रे** ....105

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28 | 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45 | | 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64 |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | | | | |
| नगर सचिव | | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | | | | |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | | | |
| लेखापरीक्षण | | | | |
| नगर रचना | | | | |
| कर निर्धारण व संकलन | | | | |
| आरोग्य | | | | |

# I Part I : भाग १

# मागील लेखा परीक्षण अहवाल

**भाग एक**
**नगरपरिषद सातारा, जिल्हा सातारा**
**मागील लेखापरीक्षण अहवाल**
**प्रलंबित परिच्छेदांचे विवरणपत्र**
**मागील अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा.आयुक्त, पुणे विभाग यांचे कडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार चालू आहे.**

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | पं.रा.परिच्छेद क्रमांक | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | १९७२-७३-७४ | ८ | - | ०१ |
| २ | १९७६-७७-७८ | ७,६२ | - | ०२ |
| ३ | १९७८-७९-८० | ३,३३,८३ | - | ०३ |
| ४ | १९८०-८१-८२ | ५,२६,३४,३५,३७,८१,८२ | - | ०७ |
| ५ | १९८२-८३-८४ | ८,३२,३७,३९,४४,५३,९४,१०६ | - | ०८ |
| ६ | १९८४-८५-८६ | ८,१७,१८ | - | ०३ |
| ७ | १९८६-८७ | १३,१४,१५,६६,८२,१०२- | - | ०६ |
| ८ | १९८७-८८ ते १९८९-९० | १०,१७,२५,२७,३८,५१,१४५,१८८,१९७,२१५ | - | १० |
| ९ | १९९०-९१-९२ | ७,२६,६६,१०२ | - | ०४ |
| १० | १९९२-९३ | २२,२६,२७,३२,४५,७०,७१,८७,९४,१०६(२) | - | १० |
| ११ | १९९६-९७ ते १९८-९९ | ९,१०,५,१७,२३,२५,३०,३१,३२,३३,४७,४८,५८,६०,९३, १०४,१०९,१२१,१४५,१४७,१५१,१६८,१८७,१९८,२०० | - | २५ |
| १२ | १९९९-०० -२००१ | १६,४४,५५,६४,६९,७१,१७५,१७६,१८०,१९३,२०६,२२१ | | १२ |
| १३ | २००१-०२ ते २००२-०३ | ५,२२,४२,४४,४६,४७,४८,५४,९२,९७,१०३,१०५,१०६, १११,११५,११७,१२८ | | १७ |
| १४ | २००३-०४ | ६,१६(ब),१८,२२,४४,४६,४७,४८,४९,५५,५८,६१,७० ७७,८२,८४ | | १६ |
| १५ | २००४-०५ | १४,१७,१८,२४,३०,३२,३४,३६,५०,५६,५७,६५,९४,९५, ९६,९७ | | १६ |
| १६ | २००५-०६ | ५,१९,२०,२३,२५,३८,३९,४०,४३,४५,४६,६२,७६,८१,८९ ६ | | १६ |
| १७ | २००६-०७ | ४,६,८,९,११,१४,१८,२४,२५,३३,३४,३८,३९,४४,४५,४६, ४७,४९,५१,५५,६०,६१,६३,६४,६६,६७,६९,७१,७३,७४ ७५,७७,७८,७९,८१,८२,८३,८४,८६,८७,९२,९३,९४,९५, ९९,१०० | | ४६ |
| १८ | २००७-०८ | ३,४,५,६,७,८,११,१३,१७,१९,२२,२९,३६,३७,३८,४०,४१, ४७,५८,५९,६०,६१,६२,६३,६५,७२,७३,७५,७६,८३,८४, ८६,८७,८८,९०(ब),९१,९३,९८ | | ३८ |
| १९ | २००८-०९ | ४,५,६,७,८,१०,११,१२,१३,१५,१६,१७,२२,२४,२६,३४,३५, ४१,४३,४४,४५,४६,४७,५२,५३,५५,५७,६३,६४,६५,६६, ७१ | | ३२ |
| २० | २००९-१० | ७,८,९,११,१४,१६,१७,२०,२२,२३,२५,२६,२७,२८,२९,३०, ३१,३२,३३,३४,३६,३९,४०,४२,४३,४६,४७,४८,५१,५२,५४, ५५,५६,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,७२,७३,७४,७५, | | ४४ |
| २१ | २०१०-११ | ४,५,६,७,८,१२,१४,१६,१८,१९,२०,२१,२३,२४,२८,३३,३४, ३५,३६,३७,४०,४५,४७,५४,५८,६१,६२,६६,६७,६९,७१,७२ | | ३५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ७३,७४,७९ | | |
| २२ | २०११-१२ | ३,४,५,६,७,८,९,१०,११,१३,१४,१६,१९,२०,<br>२२,२३,२४,२७,३०,३६,४०,४१,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,<br>५१,५२५३,५४,५५,५७,५८,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,<br>६९,७१,७४,७५,७७,७९,८०,८१,८२,८३,८५,८६,८७,८८ | | ५९ |
| २३ | २०१२-१३ | १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,<br>२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७<br>३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७,४८,४९,५०,५१,५२<br>५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५ | | ६५ |
| २४ | २०१३-१४ | १. कर निर्धारण नोंदवहीवर नवीन मालमत्ता नोंदविण्यास झालेल्या विलंबाबत.<br>२. अल्पसंख्यांक निधी गुंतवणुकीबाबत.<br>३. अंशत: प्रदान देयकाबाबत.<br>४. वार्षिक लेखे प्रसिध्दी व सादर करणेबाबत.<br>५. ई निविदा कार्यप्रणाली लागु करणेबाबत.<br>६. दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत.<br>७. आर्थिक गणना २०१३ खर्चाबाबत.<br>८. मागासवर्गीय कल्याण सदरी खर्चाबाबत.<br>९. वाहन दुरुस्ती खर्चाबाबत.<br>१०. नगरपरिषद वाहनांना स्पेअर पार्ट्स पुरविणे निविदेबाबत व पुनर्प्रत्यायी आदेशाबाबत.<br>११. क्रिडाविषयक बाबींवरील खर्चाबाबत.<br>१२. नगरपरिषद कार्यक्षेत्रासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द करणेबाबत.<br>१३. देयक नमुन्याबाबत व लेखाशिर्ष बदल केल्याबाबत.<br>१४. आयकर उदगम कर कपात विलंबापोटी दंडव्याज आकारणेबाबत.<br>१५. जयंती उत्सव साजरे करणे खर्चाबाबत.<br>१६. श्रीमंत छत्रपती शाहु कलामंदीर येथे रंगकाम करणे.<br>१७. सि.स.नं. ८२अ पंतांचा गोठ येथे चार शिट सार्वजनिक संडास बांधणे.<br>१८. वार्ड क्रमांक ९, १०१ कामाठीपुरा येथील सार्वजनिक संडासची दुरुस्ती करणे.<br>१९. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजना कामासाठी ट्रांझीट कॅम्प तयार करणेकामी जागा लेवल माती वाहतुक करणे.<br>२०, वॉर्ड क्रमांक ३२ पेठ शनिवार बागवान घर ते शेख घर अखेर गटर करणे.<br>२१. नळ पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत.<br>२२. हायप्रेशर सोडियम व्हेपर दिवे खरेदी खर्चाबाबत.<br>२३. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारणा योजनेअंतर्गत घरकुल बांधकामाबाबत व इतर पायाभुत सुविधा खर्चाबाबत.<br>२४. लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत.<br>२५. प्रभाग क्रमांक ८ मौला अली दर्गा ते डोहीफोडे दवाखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे.<br>२६. जुना वॉर्ड क्रमांक २३ ते २६ व २८ ते ३३ मधील रस्ते पीचींग करणे. | | ८२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २७. वॉर्ड क्रमांक २२ पेठ भवानी, सोमवार, यादो गोपाळ येथील अंतर्गत रस्ते पीचींग करणे.<br>२८. प्रभाग क्रमांक ६ पेठ मंगळवार गवई विठ्ठल मंदीर ते सोहनीची गिरणी ते राजा जे. चौक अखेर डांबरीकरण करणे.<br>२९. पेठ गुरुवार सि.स.नं. २७१/२७२ येथे गेट बसविणे व ग्रील वर्क करणे.<br>३०. सदर बाजार डॉ. लिमये हॉस्पीटल ते घेवारी हॉस्पीटल प्लॉट नंबर ३२ अखेर रस्ता डांबरीकरण करणे.<br>३१. आदालत वाडा ते शुक्राचार्य मठ ते माऊली मंदीर कमान अखेर रस्ता डांबरीकरण करणे व संरक्षण भिंत बांधणे.<br>३२. वॉर्ड क्रमांक ३ रामकृष्ण कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे.<br>३३. जंतुनाशके खरेदीतील अनियमितता.<br>३४. शासन परिपत्रकदिनांक ५/५/२०१० नुसार सुधारीत संरचनेनुसार वेतननिश्चिती न केलेबाबत.<br>३५. न्यायालयीन प्रकरणांबाबत.<br>३६. वाहन वापरावरील जादा झालेल्या खर्चाबाबत.<br>३७. एस.एल.ओ. नोंदवही न ठेवलेबाबत.<br>३८. आर्थिक स्थितीवरील अभिप्राय<br>३९. अंदाजपत्रकातील कमी जादा खर्चाबाबत.<br>४०. पावती पुस्तके साठा नोंदवहीतील अनियमिततांबाबत.<br>४१. करांची मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत.<br>४२. नवीन चतुर्थ वार्षिक कर निर्धारण सुची तयार करणेबाबत.<br>४३. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजनेसाठी नपा हिस्सा भरणेबाबत.<br>४४. मंगल कार्यालय भाडे तत्वावर देणेबाबत.<br>४५. भविष्य निर्वाह निधी लेख्यांबाबत.<br>४६. अग्निशमक कराबाबत.<br>४७. पेठ मंगळवार श्री. राजू भोसले घर ते राजू महाडिक घर २ इंची जीआय पाईपलाईन टाकणे.<br>४८. नगरपालिकेने घेतलेल्या कर्जाबाबत.<br>४९. रस्ता खुदाई नुकसान भरपाई रकमेबाबत.<br>५०. नगरपालिका शिक्षण मंडळाकडील शाळांना सेमी इंग्लीश व प्ले ग्रुप शिक्षक मदतनीस नियुक्तीबाबत.<br>५१. जलतरण तलाव बंद असलेबाबत.<br>५२. अनामत रकमा परताव्याबाबत.<br>५३. देयकामधील कपात रकमा व उपप्रमाणकाबाबत.<br>५४. प्रलंबित तसलमात रकमांबाबत.<br>५५. प्रभाग क्रमांक १ पेठ सदरबाजार लोणंद रस्ता ते थोटे घर अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण व बनसोडेवस्ती डांबरीकरण.<br>५६. वॉर्ड क्रमांक ११ पेठ रविवार येथील ५ सीट सार्वजनिक संडास पाडुन नवीन ८ सीट संडास बांधणे.<br>५७. वॉर्ड क्रमांक ३२ पेठ गुरुवार १९६ब श्री. सुतारघर ते १९६ गुरुवार पालकर घर अखेर संरक्षण भिंत बांधणे.<br>५८. सी.स.नं. १०१ कामाठीपुरा कोल्हाटे वस्ती येथे सार्वजनिक सभागृह बांधणे.<br>५९. आय हॉस्पीटल ते कुपर बंगला ते सिबॉयसिस हॉस्पीटल अखेर रस्ता डांबरीकरण करणे. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ६०. ठेव पावती वटविताना झालेल्या नुकसानीबाबत.<br>६१. पवई नाका ते जरंडेश्वर नाका या रस्त्यापैकी पवई नाका ते कॅनॉल पुल चेनेज (०० ते १५२०) या पहिल्या टप्प्याचे रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे व रोड डिव्हायडर बांधणे.<br>६२. पवई नाका ते सिव्हील हॉस्पीटल स्ट्रील लाईट बसविणे.<br>६३. प्रभाग क्रमांक ७(क) सुर्योदय कॉलनी सार्वजनिक संडास सि.स.नं. १२४ रविवारपेठ येथे पाईप ड्रेन करणे.<br>६४. राजवाडा मोती तळे येथे गाळ काढणे.<br>६५.गुंठेवारी प्रकरणात प्रशुमन शल्क व विकास शुल्क आकारणीबाबत कार्यवाही न केलेबाबत.<br>६६. कर वाढ व घट नोंदवहीबाबत.<br>६७. मालमत्ता करांच्या थकबाकीबाबत.<br>६८. भविष्य निर्वाह निधीचे ठेव पावती मुदतीपूर्वी वटविल्याबाबत.<br>६९. अनुदान नोंदवहीबाबत.<br>७०. शासकीय विमा निधीची कपातीबाबत.<br>७१. अनधिकृत बांधकामांबाबत.<br>७२. वॉर्ड क्रमांक १ ते ३९ मधील कचरा घंटागाडीने गोळा करण्याबाबत.<br>७३. सेवापुस्तके व वेतनदेयकांमधील अनियमिततांबाबत.<br>७४. इमारत गाळा भाडे थकबाकी व भाडे निश्चितीबाबत.<br>७५. बाग सादील खर्चाबाबत.<br>७६. पेठ गुरुवार सि.स.नं. ३४४ येथे तळमजला येथे शॉपींग सेंटर बांधणे.<br>७७. जाहिरात कराबाबत.<br>७८. शाहुकला मंदीर देखभाल व देखभाल दुरुस्ती खर्चाबाबत.<br>७९.नळ जोडणी गणना करणेबाबत.<br>८०. प्रदान धनादेश ताळमेळाबाबत.<br>८१. हातगाडया परवाना शुल्क वसूल न केलेबाबत.<br>८२. वृक्ष प्राधिकार निधीबाबत. | | |
| | | | | | ५५७ |

उपरोक्त नमूद परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या अभिप्रायांमध्ये नमूद केलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

# Part II

# भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 कुपर कारखाना ते कमानी हौद अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्णजयंती**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : रस्तेनिधी नप./शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3320588.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3139817.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35060.00/-

***1. तांत्रिक मान्यतेअगोदर प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. तसेच शासन निधी प्राप्त न होताच प्रशासकीय मंजूरी घेतलेली आहे.2. कमी जादा कामाचे गोषवारा जोडलेला नाही.3 कामगार कल्याण उपकर कपात केलेली नाही.4. गौण खनिजे स्वामीत्व धन कपात केलेली नाही.5. लेखासंहिता नियम 175 नुसार कार्यवाही केलेली नाही.6. अंदाजपत्रकातील नमूद दर व मुल्यांकनामधील नमूद दर यामध्ये तफावत आहे.7. कामावर वापरलेले साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.8. लेखासंहिता नियम क्रमांक 180(4) नुसार कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 221 दिनांक 12/11/2012

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता मजिप्रा जलव्यवस्थापन विभाग सातारा

लेखाशिर्ष - रस्ते

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 3126340/-

ठेकेदार - ए. एस. देसाई

कामाचे आदेश दिनांक - क्रमांक 994/21/11/2014

कामाची मुदत - 6 महिने

निविदा प्रक्रिया - ई टेंडरिंग

मोजमाप पुस्तक क्रमांक - 68 पान क्रमांक क99 व 108 ते 114

| प्रमाणक क्रमांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|
| 2031-31/3/2015 | 2052299 | दुसरे व अंतिम |
| 2621-31/3/2015 | 1268289 | प्रथम देयक |

उपरोक्त प्रमाणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 21 दिनांक 26/04/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामास प्रशासकीय मान्यता सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 221 दिनांक 12/11/2012 तांत्रिक मान्यता जा.क्र.चिशा/तांमा/1940/2014 महाराष्ट्र जीवन प्राधीकरण जलव्यवस्थापन विभाग सातारा दिनांक 30/7/2014 व सदर काम हे महाराष्ट्र नगरोत्थान सुवर्णजयंती महाअभियान या याजनेतून केलेले आहे. सदर योजनेमध्ये 50 टक्के हिस्सा नगरपरिषद व 50 टक्के हिस्सा राज्य शासन पैकी पहिला हप्ता रक्कम रुपये 7.81 लक्ष क्रनि/जिवायो/2014-15/नपा/प्रमा/का-3/27 जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय सातारा दिनांक 2/7/2014 ने नगरपरिषदेस प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 160 नुसार तांत्रिक मान्यता घेतल्याशिवाय प्रशासकीय मान्यता घेऊ नये असे असतांना सदर कामास प्रथम प्रशासकीय मान्यता व नंतर तांत्रिक मान्यता याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. तसेच सदर कामास शासनाचा पहिला हप्ता /दिनांक 21/07/2014 रोजी नगरपरिषदेस प्राप्त झाला आहे. म्हणजेच शासन निधी जमा न होताच सदर कामास दिनांक 12/11/2012 रोजी प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 176 नमुना क्रमांक 132 नुसार कमी जादा केलेल्या कामाचा मोजमापाचा गोषवारा देयकासोबत जोडलेला नाही. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 177 नमुना क्रमांक 133 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला देयकासोबत अथवा नस्तीसोबत जोडलेला नाही.

3. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/सीआर-108/लेबर 7- ए दिनांक 17/6/2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक असतांना प्रथम धावते देयक व दुसरे अंतिम देयकामधून 1 टक्के कामगार कल्याण उपकर कपात करुन शासनास भरणा केलेला नाही. त्यामुळे रक्कम रुपये 34440/- संबंधीतांकडून वसुल करुन शासनास भरणा करावी.

4. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक गौखनि-10/1009/प्र.क्रग.-309/ख (3) दिनांक 11/2/2010 नुसार प्रति घनमीटर 70.67 गौण खनिज कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक असतांना सदर कामावर 60मीमी खडी 10 घनमीटर व हार्ड मुरुम 5 घनमीटर असे एकूण 15 घनमीटर X 70.67 = 1060/- संबंधीतांकडून वसुल करुन गौणखनिज स्वामित्वधन पोटी शासनास भरणा करावे.

5. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 175 नुसार मुख्याधिकारी/नगरपरिषद अभियंता यांनी कामास भेटी देऊन बांधकामाची मोजणी घेतली पाहिजे. परंतू त्याबाबत मोजमाप पुस्तकावर कोणत्याही नोंदी नाहीत.

6. अंदाजपत्रकाबरोबर दरपृथ्थकरण जोडलेले नाही. परंतू अंदाजपत्रकाच्या गोषवा-यामध्ये नमूद केले दर व प्रत्यक्ष मुल्यांकन करतांना नोंदलेल्या दरामध्ये खालीलप्रमाणे तफावत आहे.

| बाब | अंदाजपत्रक | प्रत्यक्ष आदा | फरक | परिमाण | जादा आदा |
|---|---|---|---|---|---|
| Excavation for roadwapin soil | 166.66 | 133.95 | 17.29 | 13.50 | 233 |
| Compacting the sub grade | 4.44 | 12.28 | 7.84 | 60 | 470 |
| p/L 25mm thick bituminous | 243.79 | 244.82 | 1.03 | 4526.25 | 4662 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| concrete | | | | | |
| | | | | | 5365 |

7. कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

8. महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 180 (4) नुसार मोजणी पुस्तकामध्ये नोंदलेली मोजमापे नगरअभियंता अथवा मुख्याधिकारी यांनी तपासणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 1, Hmm No : 21)

## *2 ई निविदा कार्यप्रणाली अंमलबजावणीबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 न.पा/शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 19/1/2013 चे आदेशानुसार रुपये 10 लाखावरील विकास कामे व खरेदीसाठी ई निविदा प्रणालीचा वापर करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 36 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

नगरपालिकेस केंद्र व राज्य शासनाकडून विविध विकास योजनांसाठी अनुदान प्राप्त होते तसेच नगरपंचायतीच्या स्वनिधीतून विविध विकास कामे, योजना साहित्य खरेदी व सेवा पुरवठा अशा विविध बाबींसाठी तरतूद असते. सदरप्रमाणे काम करतांना तसेच साहित्य खरेदी व सेवांचा पुरवठा करुन घेतांना अवलंबावयाच्या प्रक्रियेत सुटसुटीतपणा व जास्तीत जास्त पारदर्शीपणा येण्यासाठी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती/2012/प्र.क्र.273/39दिनांक 19/1/2013 अन्वये ई निविदा कार्यप्रणाली ही 1 फेब्रुवारी 2013 पासून अवलंबवयाची असून 10 लाख व त्यावरील मुल्याच्या निविदा ई निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन प्रसिध्द करावयाच्या आहेत. परंतू नगरपंचायतीने सन 2014-15 करीता तशी कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत खुलासा करुन यापुढे उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ई निविदा कार्यप्रणाली अवलंबविण्यात यावी. ई निविदा कार्यप्रणाली मुळे स्पर्धात्मक दरांचा लाभ नगरपालिकेस मिळून शासकीय तसेच नगरपंचायत निधीचा योग्य विनियोग होणेस व दर्जात्मक कामे/खरेदी होणेस मदत होणार आहे. तरी यापुढे उपरोक्तबाबत आवश्यक दक्षता घ्यावी. व नियमबाहयतेबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

### *3 एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी योजना (IHSDP) घरकुल बांधणे सुविधा खर्चाबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 शासन/नपा निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 74453501.00 /-

***सदर योजनेतील सात कामे अपुर्ण असून पुर्ण झालेल्या कामांची अंतिम देयके पारीत केलेली नाहीत. 1429 लाभार्थ्यांकडून रुपये 21732450/- एवढे अंशदान वसूल करणे बाकी आहे. मुदतबाहय कामांबाबत निविदा बी-1 मधील क्लॉज 2-35 प्रमाणे दंड आकारणी करणे आवश्यक आहे. अखर्चित निधी लाभाथी निवड प्र क्रि या व प्राधान्यक्रम ताबा याबाबत साधार पुर्तता झालेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - Under Seccretion, GUI Mimdh of Housing and Urban Poresh Alloviation No= N/11028/2011/IHSDP/JNNURM-VOL XIII DATE - 27/6/2011

अंदाजपत्रकीय रक्कम - 2470.22 लक्ष

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता, पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे क्रमांक पुणे/कार्यकारी अभियंता/1/1434/11 दिनांक 17/9/2011 रुपये 3470.22 लक्ष

मक्तेदाराचे नांव - मे. बी.व्ही.जी. (इंडिया) लिमीटेड

कामाचा आदेश दिनांक - 22/2/2013

काम पुर्ण दिनांक - अपूर्ण कामाची मुदत 12 महिने

लेखाशिर्ष - IHSDP

सन 2014-15 मध्ये खालीलप्रमणे खर्च झालेला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | खर्च रक्कम | मक्तेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| 262 | 29/5/2014 | 1287003 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 321 | 11/6/2014 | 10748938 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 539 | 5/7/2014 | 6879395 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 592 | 9/7/2014 | 4453106 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |

| | | | |
|---|---|---|---|
| 784 | 11/8/2014 | 486586 | मे. जयंत विनायक किकले |
| 892 | 25/8/2014 | 6868363 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 967 | 4/9/2014 | 472320 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 1020 | 16/9/2014 | 287445 | श्री. विजय आनंदराव पवार |
| 1035 | 17/9/2014 | 11351124 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 1219 | 18/10/2014 | 6895795 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 1710 | 22/12/2014 | 4404106 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 2306 | 27/2/2014 | 531160 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 2314 | 2/3/2015 | 66382 | श्री. विजय आनंदराव पवार |
| 2363 | 5/3/2015 | 5155127 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 2434 | 12/3/2015 | 144782 | मे. जयंत विनायक किकले |
| 2515 | 23/3/2015 | 7019533 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 2591 | 17/3/2015 | 5482325 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| 2622 | 31/3/2015 | 1919911 | मे. बि. व्ही. जी. इंडिया लिमीटेड |
| | | 74453401 | |

सदर कामे अद्यापही अपुर्ण असून निविदा प्रक्रिया योजना मंजूरी याबाबत सन 2013-14 चे लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदविणेत आलेले आहेत. या आक्षेपांची अद्यापही पुर्तता झालेली नाही. सन 2014-15 मध्चये या सर्व कामाची धावती देयके पारीत झालेली आहेत. याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 39 दिनांक 07/05/2016 अन्वयये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. योजनेतील एकूण आठ कामांपैकी 286 शनिवारपेठ या ठिकाणची इमारत पुर्ण झाली असून यातील 44 सदनिका वाटप करणेत आलेल्या आहेत. या लाभार्थ्यांचे खालीलप्रमाणे लाभार्थी हिस्सा प्राप्त झालेला आहे. उर्वरीत सात काम दिनांक 31/3/2015 अखेर अपुर्ण आहेत. तसेच पुर्ण झालेल्या कामाचे अंतिम देयक प्रदान केलेले नाही.

| लाभार्थी | दर | रक्कम |
|---|---|---|
| 44 | 30000 | 1320000 |

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग क्रमांक जेनेयो-2007/प्र.क्र.52 गृनियो-2 दिनांक 25/6/2007 मधील अ.क्र. 27(अ) अन्वये प्रकल्प सुरुवात करतांनाच लाभार्थ्यांचे अंशदानाबाबतची प्रतिक्रीया पाहणे व प्रत्येक लाभार्थ्यांचे बँक खाते उघडून या बँक खात्यावर अंशदान रक्कम जमा करुन घेणे, बँक खाते पुस्तक नगरपरिषदेकडे (अंमलबजावणी यंत्रणा) ठेवणे बंधनकारक आहे. मात्र योजनेत समाविष्ट 1473 लाभार्थ्यांपैकी एकही बँक खाते उघडलेले नाहीत तसेच प्रकल्प सुरु झालेपासून लाभार्थी अंशदान जमा केलेले नाही. उपरोक्त 44 लाभार्थ्यांनी ताबा घेणेपूर्वी अंशदान जमा केलेले नाही.

2. उर्वरीत 1429 लाभार्थ्यांकडून रुपये 21732450/- एवढे अंशदान वसूल करणे बाकी आहे. सदर रक्कम वसुल करावी.

3. योजनेतील कामांची मुदत 12 महिने म्हणजे दिनांक 21/2/2014 अखेर होती. दिनांक 31/3/2015 अखेर कामे

अपुर्ण आहेत. निविदा बी-1 मधील क्लॉज 2-अ प्रमाणे दंड आकारणी करणे आवश्यक आहे.

4. योजनेवर प्राप्त अनुदान व झालेला खर्च व शिल्लक रक्कम याची माहिती लेखापरीक्षणास सादर करुन शिल्लक अनुदानापैकी तीन महिनेपेक्षा जास्ता काळ अखर्चित राहिलेल्या रकमेवर महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग परिपत्रक क्रामंक जनियो-2009/प्र.क्र.128/गृनियो-2 दिनांक 1/12/2009 अन्वये व्याज आकारणी करावी व पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

5. योजनेतील आठ इमारतींमध्ये एकूण 1473 सदनिका असून सात इमारतींमधील 1429 सदनिका मुदतीनंतरही अपुर्ण असलेने शासन निधीचा योग्य विनियोग न होता विनाकारण निधी अडकून राहिला आहे. याबाबत सदर कामे तातडीने पुर्ण होईल अशी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

6. योजनेत 1473 सदनिका आहेत म्हणजे 1473 कुटुंबांना याचा लाभ दिला जाणार आहे. मात्र हे 1473 लाभार्थी निश्चितीबाबत, शहरातील झोपडपट्टया, त्यातील रहिवाशी, लोकसंख्या, कुटुंब संख्या प्रत्येक कुटुंबाचा प्रवर्ग व उत्पन्न, त्यापैकी सदनिका दिले जाणारे लाभार्थी, त्यांचा प्राधान्यक्रम त्यास घेतलेल्या मंजूरी इत्यादी कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

7. ताबा दिलेल्या घरकुलांची ताबा पावत्या घेणेत याव्यात तसेच या घरांवर मिळकत कराची आकारणी करणे आवश्यक आहे.

DATSMKM5801 (Ref No : 11, Hmm No : 39)

## *4 गोडोली राजमाता जिजाऊ उद्यान ते गोडोली समाजमंदीर ते खामकर घर ते गोडोली जकातनाका अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**वैशिष्टयपुर्ण रस्ते अनुदान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5230630.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 5230630.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 7774.00/-

***1. निविदा प्रक्रिया नियमानुसार ई- टेंडरिंग केले नाही.2. खोदकामातील साहित्याचा वापर केलेला नाही.3. स्वामीत्व धन वसुल केलेले नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव कमांक 265 दिनांक 12/11/2012

तांत्रिक मान्यता - जा.क्र./चिशा/तांमं-588 दिनांक 13/3/2013

जा.क्र./चिशा/तांमं-2006 दिनांक 5/8/2014

लेखाशिर्ष - रस्ते वैशिष्टयपुर्ण योजना

अंदाजपत्रकीय रक्कम - 2642656/- सुधारीत 4812700/-

मक्तेदार - श्री. हनुमंत लक्ष्मण फडतरे

कामाचे आदेश दिनांक - 24/10/2013

कामाची मुदत - 60 दिवस (पावसाळा सोडून) दिनांक 10/3/2015 (मुदतवाढ)

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 1225 | 18/10/2014 | 2217319 | प्रथम धावते देयक |
| | | 536947 | द्वितीय धावते देयक |
| 2516 | 23/3/2015 | 2476364 | तृतिय व अंतिम देयक |
| | | 5230630 | |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 41 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 नुसार दिनांक 1/2/2013 पासून 10 लाखांवरील कामांकरीता ई निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2. सदर कामात मोजमाप नोंदवही क्रमांक 70 पान क्रमांक 26 वरील नोंदीनुसार बाब क्रमांक 1 अन्वये 83.07 घनमीटर खोदकाम केलेले आहे. बाब क्रमांक 5 अन्वये 26.00 घनमीटर कठीण मुरुम घेतला आहे. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांचे आदेश क्रमांक प्रशा/रस्ते/49/2005 दिनांक 8/8/2005 मधील अ.क्र. 3 अन्वये खोदकामातून निघालेल्या साहित्यापैकी 50 टक्के साहित्य कामात वापरणे आवश्यक आहे. मात्र हे साहित्य न वापरता बाहेरुन मुरुम घेतला आहे, तसेच निघालेले साहित्य निरुपयोगी/वापरास अयोग्य असलेबाबत तपासणीची नोंद मोजमाप नोंदवहीवर, नस्तीसोबत नाही. सबब बाहेरुन आणलेला मुरुम 26.00 घनमीटर X 287.78 = रुपये 7194.50/- म्हणजेच 7195/- लेखापरीक्षणात वसुलपात्र ठेवणेत येत आहेत.

3. या कामातील एकूण साहित्यापैकी द्वितीय धावते देयकात 85.00 घनमीटर मेटल व 25.00 घनमीटर मुरुम वापरला असून याबाबत स्वामीत्व धन वसूल केलेले नाही. तसेच महसूल विभागाकडील चलनही जोडलेले नाही. सबब महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1009/PK309/ख-3 दिनांक 11/2/2010 प्रमाणे 110.00 घनमीटर X रुपये 70.67 = 7773.70 म्हणजेच रुपये 7774/- वसुल करुन शासनास भरणा करावी.

DATSMKM5801 (Ref No : 12, Hmm No : 41)

## 5 पेठ मल्हार प्रभाकर स्टोअर्स ते कामेरी चौक ते करंजे नाका रस्ता डांबरीकरण करणे

**रस्त अनुदान**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 नपा/ शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 7396453.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7396453.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 133322.00/-

***कामाच्या बाबत ई टेंडरिंग पध्दत अवलंबिणे बंधनकारक केले आहे. मात्र नगरपरिषदेने याप्रमो कार्यवाही केलेली नाही. अनावश्यक कामापोटी खोदकाम खर्च लेखापरीक्षणात अमान्य करणेत येत आहे. गौणखनिज रक्कम वसूल केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 204 दिनांक 12/11/2012
तांत्रिक मान्यता - मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ पुणे जा.क्र./तांशा8/818 दिनांक 4/4/2013
लेखाशिर्ष - रस्ते अनुदान
अंदाजपत्रकीय रक्कम - 9983820/-
मक्तेदार - मे. पूनम कन्स्ट्रक्शन, सातारा, निविदा दर - 4.99 टक्के जादा दराने
कामाचे आदेश - जा.क्र./साशन/सांबां/1423
कामाची मुदत - 9/10/2013 काम पुर्ण दिनांक 31/3/2015
खर्चाचा तपशिल

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 229 | 8/10/2014 | 7396453 | प्रथम धावते देयक |

सदर कामाचे फक्त प्रथम धावते देयक लेखापरीक्षण कालावधीत प्रदान झाले असून अंतिम प्रदान 2015-16 मध्ये झाले आहे. याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 42 दिनांक 07/05/2016 अन्वये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामाची निविदा दिनांक 10/4/2013 च्या दैनिक पुढारी मध्ये प्रसिध्द करणेत आली आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 नुसार दिनांक 1/2/20163 पासून रुपये 10 लक्षाचे वरील कामाच्या बाबत ई टेंडरिंग पध्दत अवलंबिणे बंधनकारक केले आहे. मात्र नगरपरिषदेने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2. सदर कामातील रस्ता हा गत 30 वर्षांपासूनचा रहदारिचा करंजे व सातारा शहर या भागांना जोडणारा वारंवार

डांबरीकरण झालेला असा प्रमुख रस्ता आहे. या कामाचे अंदाजपत्रकात बाब क्रमांक 1 व 2 अन्वये अनुक्रमे रस्ता खोदकाम व खोदलेले साहित्य 1.50 किमीवर नेऊन टाकणे या बाबी अंतर्भूत आहेत. याबाबत रेकॉर्ड एंट्री मोजमाप पुस्तक क्रमांक 39 पान क्रमांक 117 ते 122 वर सरासरी 1.50 मीटर रुंदीने व 0.225 मीटर खोलीने खोदकाम दर्शविले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकासोबतचे जनरल डिस्क्रीप्शनमध्ये पाण्याच्या पाईपलाईनसाठी खोदकाम झालेमुळे रसता खराब झालेला आहे. असे नमूद आहे. रेकॉर्ड एंट्रीतील मोजमापे ही या खोदलेल्या चराची आहेत. हे चर खोदल्यानंतर त्या चरामध्ये खोदलेले साहित्य भरलेले आहेच सबब पुनश्च खोदकाम करणेची आवश्यकता नाही. याठिकाणी फक्त खोदलेल्या चरावर 60मीमी लेअर टाकणे व रस्त्याचा पृष्ठभाग समतल करणे एवढीच बाब आवश्यक आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सकिर्ण -2014/प्रक्र.85/ रस्ते-1 दिनांक 11/6/2002 मधील अ.क्र.3 प्रमाणे कार्यवाही न केलेने सदर अनावश्यक कामापोटी खोदकाम 945.83 X रुपये 133.98 = 126722/- खर्च लेखापरीक्षणात अमान्य करणेत येत आहे.

3. सदर कामाचे नस्तीस महसूल विभागाने खाणपट्टाधारकास दिलेले व खाणपट्टा धारकाने स्वाक्षरी करुन खरेदीदार (मक्तेदार) यांना दिलेले गौण खनिज वाहतूक पास जोडलेले आहेत. यातील पास क्रमाक 122011 ते 122016 या पासेसवर तारखांमध्ये खाडाखोड केलेली आहे. या पासेसवरील दिनांक 2/5/2015 ते 6/5/2015 या कालावधीतील दर्शविले आहेत. मात्र 122012 या पासवर 2/6/2015 अशी तारीख आहे. तसेच पास क्रमांक 121927 ते 121930 हे पास दिनांक 1/2/2015 ते 4/2/2015 या कालावधीतील आहेत मात्र 121926 हा पास दिनांक 2/6/2015 या दिनांकाचा आहे. सबब उपरोक्त पास लेखापरीक्षणात अमान्य करणेत येत असून या सर्व पासेसवरील एकूण 33 ब्रास गौण खनिज रुपये 200/- प्रति दराप्रमाणे रुपये 6600/- वसुल करुन शासनास भरणा करावे.

DATSMKM5801 (Ref No : 13, Hmm No : 42)

***6 नगरपरिषदेच्या मुख्य इमारतीलगत असणा-या श्री. छत्रपती शाहु रस्त्याच्या बाजूस लोअर ग्राऊंडला भराव करुन पार्किंग व्यवस्था करणे.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : बांधकाम न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2563978.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2563978.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 47525.00/-

***मक्तेदार निश्चितीसाठी ई निविदा कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही न करता जाहिर***

**निविदा प्रसिध्दी केलेली आहे. वापरलेल्या स्टीलसाठी दिलेले वाढीव दर नियमबाहय असल्याने वसुलपात्र आहे.**

प्रशासकीय मान्यतास - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 301 दिनांक 26/2/2014

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता मजिप्रा जा.क्र. चिशा/तां.मं.-614 दिनांक 28/5/2014 रुपये 28019162/-

लेखाशिर्ष - इतर बांधकामे

अंदाजपत्रकीय रक्कम - श्री. अमृत बळवंत शिंदे निविदा दर - 4.99 टक्के जादा दराने

कामाचे आदेश - 356 दिनांक 30/7/2014

कामाची मुदत - 9 महिने काम पुर्ण दिनांक 24/9/2015

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 1259 | 18/10/2014 | 1330030 | प्रथम देयक |
| | | 1101965 | द्वितीय धावते देयक |
| 2620 | 30/3/2015 | 131983 | तृतिय व अंतिम देयक |
| | | 2563978 | |

निविदा प्रसिध्दी - दैनिक तरुण भारत दिनांक 2/7/2014

प्राप्त निविदा - 1.सुजित व्यंकटराव भोसले - 8टक्के जादा

2. शैलेशकुमार चं. शिंदे - 6 टक्के जादा

3. अमृत बळवंत शिंदे - 4.89 टक्के जादा

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 43 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामाचे बाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मांतस/नस्ती 2012/ प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 नुसार ई निविदा कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही न करता जाहिर निविदा प्रसिध्दी केलेली आहे.

2. ई निविदा केलेली नाहीच याशिवाय यापूर्वी निविदा माविणेबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय क्रमांक नप्रस/निविदा मागविणे/105/प्र.क्र.51/0519 दिनांक 29/12/2015 मधील अ.क्र. 33 अन्वये एक राज्यस्तरीय व एक जिल्हास्तरीय वृत्तपत्र अशा दोन ठिकाणी निविदा प्रसिध्द करणे या सुचना असतांना एकाच स्थानिक वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केल्याने कमी प्रतिसाद मिळून स्पर्धात्मक मूल्याचा लाभ मिळालेला नाही.

3. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ कोल्हापूर यांचे परिपत्रक क्रमांक रस्ते/सांगली 5949/2005 दिनांक 8/7/2005 मधील अ.क्र. 4 अन्वये सिमेंट, स्टील व डांबर यासाठी कोणतेही वाढीव दर आकारणेत येऊ नयेत अशा स्पष्ट सुचना असतांना या दर पृथ:करणामध्ये बाब क्रमांक 9 (RA9 ) अन्वये मूळ दर प्रति मे. टन + 10 टक्के Hill Area 5640.40 + 1 टक्के लेबर सेस 620.40 = 62662.80 देण्यात आला आहे. स्टीलचे दर हे

संपूर्ण भारतभर दैनंदिन प्रसिध्द होणा-या एकाच दराने उपलब्ध आहेत. उपरोक्त परिपत्रकानुसार जादा दिलेले रुपये 5604.40 प्रति मे. टन X 8.48 मे. टन = रुपये 47525.31 लेखापरीक्षणात अमान्य करणेत येत असून रक्कम रुपये 47525.00 वसुल करावी.

DATSMKM5801 (Ref No : 14, Hmm No : 43)

## 7 पेठ गुरुवार सि.स.नं. 191ब येथे संरक्षक भिंत बांधणे.

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : रस्ते व इमारती न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3058730.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2892320.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 166410.00/-

***1. अंदाजपत्रकामध्ये योग्य विभागातील दर परिगणित केले आहेत.2. अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेली बाब केलेली आहे.***

प्रशासकीय मान्यता - विशेष सभा ठराव क्रमांक 42 दिनांक 3/7/2014

अंदाजपत्रकीय रक्कम - 2913190/-

तांत्रिक मान्यता - मजिप्रा सातारा क्रमांक चिशा/तांम/2034/2014 दिनांक 8/8/2014 रुपये 2913190/-

मक्तेदाराचे नांव - श्री. तुकाराम दिगंबर सुतार (ई निविदा) मंजूर दर - 22.50 टक्के जादा

काम पुर्ण दिनांक - सानप/सांबां/1066/14 दिनांक 12/12/2014

काम पुर्ण दिनांक - 10/3/2015 कामाची मुदत - 6 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक - 67

लेखाशिर्ष - न.पा. निधी

झालेला खर्च

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| 2615-30/3/2015 | 2892320 | First and Final |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 44 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक 2013-14 चे दरसुचीवर आधारीत होते. याशिवाय निविदा 22.5 टक्के जादाराची निविदा सर्वात कमी दराची निविदा म्हणून स्वीकारणेत आली व ती चालू 2014-15 चे दराशी तुलना करुन 3.34 टक्के जादा दराने येत असलेने स्विकारणेत आली. सदर कामाचे अंदाजपत्रकाप्रमाणे ॲबस्ट्रॅक्ट शिटमध्ये प्रस्तावित बाबींचे खाली डिएसआर P NO. व Interim No. चा तपशिल दिला आहे. मात्र हा तपशिल डिएसआर चे पान क्रमांक 9 बाब क्रमांकाशी जुळत नाही. अंदाजपत्रकाच्या सोबत दरपृथःकरण जोडलले नाही. तसेच अंदाजपत्रकात समाविष्ट बाबी 1, 2 व 3. खोदकाम, 4. कॉंक्रीट 1:3:6, 5. कॉंक्रीट एम-15 या बाबींकरीता 2013-14 मधील ब्रिज वर्क्स या विभागातील दर घेतले आहेत. प्रत्यक्षात हे दर बिल्डींग वर्क्स मधील वापरणे आवश्यक आहे. यामुळे खालीलप्रमाणे अदाजपत्रक वाढले व जादा प्रदान झाले आहे.

| बाब क्रमांक | बिल्डींग वर्क्स दर | | | | ब्रिज वर्क दर | | | | एकूण फरक | परिमाण घमी | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मूळ दर | 10% HA | 1% Cess | Total | मूळ दर | 10% HA | Ces s | Total | | | |
| 1-खोदकाम | 128 | 12.80 | 1.28 | 142.08 | 170 | 17 | 1.88 | 188.87 | 46.79 | 1016 | 47538.64 |
| 2-खोदकाम | 138 | 13.80 | 1.38 | 153.18 | 192 | 19.20 | 2.11 | 213.31 | 60.13 | 599.29 | 36035.30 |
| 3-खोदकाम | 377 | 37.70 | 3.77 | 418.47 | 423 | 42.30 | 4.65 | 469.95 | 51.48 | - | - |
| | | | | | | | | | | | 83573.94 |

सदर काम रस्त्याचे व डोंगराचे कडेचे असून हे कॉंक्रीट कायम पाण्यात असलेले नाही. सबब या ठिकाणी बिल्डींग वर्क्स मधील (Bd Section) दर आवश्यक असून ब्रिज वर्क्स (BR Section) चे दराची आवश्यकता नाही. सबब सदर वाढीव रक्कम रुपये 83573.92 व जादा निविदा दर याप्रमाणे रक्कम वसूल करावी.

2) सदर कामाचे अंतिम देयकात अ.क्र.12 मध्ये Extra Item दर्शवून Dry Trap solling 79.64 घनमीटर X रुपये 1040.16 = 82836.34 एवढे प्रदान केले आहे. सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तीका 1984 मधील प्रकारण -3(छ) व (ज) नियम क्रमांक 148 ते 172 यामध्ये अंदाजपत्रक तंतोतंत करणेची कार्यपध्दती दिली असून अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेली बाब पुनर्मंजूरी शिवाय प्रदानास प्रतिबंध आहे. उपरोक्त Dry Trap ही बाब मूळ अंदाजपत्रकात

समाविष्ट नाही. तसेच त्यास सुधारीत मान्यताही घेतलेली नाही. यामुळे सदर बाब लेखापरीक्षणात मान्य करता येत नसलेने रक्कम रुपये 82836/- वसुल करावी.

DATSMKM5801 (Ref No : 15, Hmm No : 44)

***8 महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 10 व पेठमाची सिसनं 38 येथे चार सिट शौचालय बांधणे काम व सदर योजनेतील कामांबाबत.***

**सुजल व निर्मल अभियान अंतर्गत**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : सुजल व निर्मल शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 501538.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 501538.00/-

***पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक नादव2011/प्र.क्र.583/पापु-22 दिनांक 22/10/2011 मधील मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 915 दिनांक 17/9/2013
तांत्रिक मान्यता - एमजेपी जा.क्र./चिशा/तांम/2404 दिनांक 7/9/2012
लेखाशिर्ष - सुजल व निर्मल
अंदाजपत्रकीय रक्कम - 338270/-
मक्तेदार - श्री. शैलेशकुमार चंद्रकांत शिंदे
कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/साबां/2297 दिनांक 28/2/2015
कामाची मुदत - 120 दिवस काम पुर्ण दिनांक 20/3/2015
निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 2675 | 31/3/2015 | 501538 | अंतिम देयक |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 45 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामास कार्यकारी अभियंता, मजिप्रा/जलव्यवस्थापन विभाग/सातारा यांचे पत्र क्रमांक

2404 दिनांक 7/9/2012 रुपये 338270/- नुसार नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व नवबौध्द घटकामधील कुटुंबियांसाठी 4 सीटचे सार्वजनिक शौचालय बांधणेचे Type Estimate रुपये 338270/- तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तांत्रिक मंजूरी आदेशात नमूद केल्याप्रमाणे सदर तांत्रिक मंजूरी 1 वर्षापूरतीच मर्यादित राहिल असे सुचित केले आहे. त्यामुळे सदर कामांस नव्याने तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक होते.

2) सदर काम महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग निर्णय क्रमांक नादव2011/प्र.क्र.583/पापु-22 दिनांक 22/10/2011 अन्वये सातारा नगरपरिषद करीता सुजल व निर्मल अभियानांतर्गत मंजूर झालेल्या निधीमधून केलेले आहे. संबंधीत शासन निर्णयातील मंजूर झालेल्या निधीमधून केलेल आहे. संबंधीत शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3 अन्वये सदर योजनेअंतर्गत शहरातील अनुसुचित जाती व नवबौध्द कुटुंबियांचा 100 टक्के समावेश करण्याबाबत सुचित केले आहे. परंतू याबाबतचे अभिलेखे / नोंद नस्तीसोबत नाहीत.

3) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 7 अन्वये या योजनेअंतर्गत नागरी दलित वस्ती व नवबौध्द कुटुंबियांना वैयक्तिक शौचालय व नळजोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करणे आवश्यक आहे. असे स्पष्ट नमूद आहे. परंतू नगरपालिकेने याबाबत कोणती कार्यवाही केली याचा नस्तीवरुन / टिपणीमध्ये कोणतीही नोंद नाही.

4) शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 2 अन्वये या योजनेअंतर्गत नागरी भागातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबियांना खाजगी नळ जोडण्यासाठी रुपये 4000/- प्रतिकुटुंब व वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी रुपये 12000/- प्रतिकुटुंब अनुज्ञेय आहेत.

DATSPVM7601 (Ref No : 16, Hmm No : 45)

## *9 मुदतवाढ दिलेल्या कामांबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : सर्व न प शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन परिपत्रक उद्योग, उर्जा व कामागार विभाग दिनांक 10/10/2008 नुसार कोणत्याही कारणास्तव***

**मुदतवाढ देऊ नये असे असतांना अयोग्य कारणाचा आधार घेऊन मुदतवाढ दिली आहे.**

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 48 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

नगरपरिषद सातारा यांचेकडील सन 2014-15 च्या लेखापरीक्षण स्थायी समिती ठराव क्रमांक 1271 दिनांक 21/7/2014 नुसार बांधकाम विभागाकडील सन 2013-14 मध्ये कार्यादेश दिलेली व कामाची मुदत संपलेल्या एकूण 60 कामांना मुदतवाढ दिलेली आहे.

वास्तविक सर्व कामांसाठी एकच कारण की, युआयडीएसएसएमटी या योजनेअंतर्गत नवीन वितरण नलीका टाकण्याचे काम सुरु असलेने खडीकरण व डांबरीकरणाची कामे पुर्ण करता येत नव्हती परंतू काम क्रमांक 12, 13, 16, 18, 19 अशी एकूण 8 कामे संडास बांधकामाची तर काम क्रमांक 40 शाळा दुरुस्तीचे काम व 43 पाण्याची टाकी कामेही उपरोक्त योजनेशी संबंधीत नसल्याने त्यांना सदर कारणास्तव मुदतवाढ देणे अयोग्य वाटते. याबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक असून कामे विहीत मुदतीत पुर्ण करुन घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्रमांक भांखस-2008/प्र.क्र.256/08/ उद्योग 4 दिनांक 10 ऑक्टोबर 2008 नुसार साधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येवू नये व अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिका-याच्या मते, मुदतवाढ देणे आवश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट करणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावलीनुसार संबंधीत विभागाशी सल्लामसलत केल्याशिवाय नंतरच योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश आहेत. तसेच करारनामा अट क्रमांक 18 नुसार कोणत्याही कामांस कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाहीव तशी परिस्थिती उद्भवल्यास कामाची मुदत संपण्यापूर्वी सबळ कागदपत्रांचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

एकंदरीत सन 2013-14 मध्ये कार्यादेश दिलेल्या एकूण कामांची यादी पाहत 60 कामांना मुदतवाढ दिलेली आहे. तरी विकासकामांना आदेश देतांना सर्व बाबींची पडताळणी करुन कार्यादेश देणे आवश्यक आहे व अपवादात्मक परिस्थितीतच मुदतवाढ देणे आवश्यक आहे.
कार्यादेश दिलेली कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने दक्षता घ्यावी व सन 2013-14 व 2014-15 मधील एकूण किती कामांना कार्यादेश दिले व किती कामे पुर्ण व किती कामे अपुर्ण आहेत. याबाबत साधार पुर्तता करावी.

DATSPVM7601 (Ref No : 18, Hmm No : 48)

## *10 प्रभाग क्रमांक 10, पेठ चिमणपुरा ढोणे कॉलनी अंतर्गत रस्ता दुरुस्ती खर्चाबाबत.*

**UIDSSMT**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 8550.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 8550.00/-

***प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच देयक मंजूर करणे अपेक्षित असून जादा कामाकरीता खर्च मान्य केलेला आहे. माहीतीदर्शक फलक व कामगार विमा रक्कमेबाबत कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 1295 दिनांक 21/7/2014 रुपये 493210/-

तांत्रिक मान्यता - जा.क्र. 190 दिनांक 21/7/2014

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये - 493210/-

मक्तेदार - गणेशराज मजूर सहकारी संस्था, सातारा (अंदाजपत्रकीय दराने एकत्र वाटप समिती दिनांक 11/8/2014 च्या पत्रकानुसार)

मुदत - 90 दिवस, काम पुर्ण दिनांक 23/3/2015

प्रमाणक क्रमांक 2752 रुपये 502926/- पहिले व अंतिम देयक

मोजमाप नोंदवही - 77 पान क्रमांक 67 ते 68

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 49 दिनांक 07/05/2016 अन्वये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मोजमाप नोंदवही क्रमांक 77 मधील पान क्रमांक 67 ते 68 वरील तपशिलानुसार कामाचे एकूण मुल्यांकन 502926/- इतके झालेले असून त्यामधून आयकर, व्हॅट, सुरक्षा ठेव, सेस व रॉयल्टी अशी एकूण 82257/- ची वजावट करुन रक्कम मक्तेदारास अदा करण्यात आलेली आहे. तथापि सदर कामास अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रुपये 493210/- इतक्या रकमेस प्रशासकीय मंजूरी मिळालेली असलेने प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच देयक मंजूर करणे अपेक्षित असून जादा कामाकरीता खर्च कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही. परिणामी देयकाची एकूण रक्कम रुपये 493210/- व वजाती (आयकर - 4932/-, वॅट - 24660/-, सुरक्षा ठेव रुपये 24660/-, सेस - 4932/-, रॉयल्टी - 21907) एकूण 81091/- वजा जाता रुपये 412119/- मक्तेदारास अदा करणे आवश्यक होते. तथापि रुपये 420669/- अदा केलेने रुपये 8550/- चे अतिप्रदान झालेले असून रक्कम संबंधीतांच्या सुरक्षा ठेव मधून कपात करणे

आवश्यक आहे.

2) कामासाठी वापरलेल्या खडीचा तपासणी अहवाल हा दिनांक 24/8/2014 चा असून प्रत्यक्ष कामास सुरवात मोजमाप पुस्तिका क्रमांक 71 पान क्रमांक 67 नुसार दिनांक 11/12/2014 रोजी झालेली आहे. काम सुरु असतांना वापरलेल्या खडीची तपासणी करणे आवश्यक असतांना 4 महिन्यांपूर्वीच्या खडीचा तपासणी अहवाल घेणे संयुक्तिक वाटत नाही.
3) दिनांक 25/8/2014 च्या कार्यारंभ आदेशातील मुद्दा क्रमांक 12 नुसार कामाच्या ठिकाणी माहितीचा फलक लावणे आवश्यक असतांना सदर तरतूदीचे मक्तेदाराने पालन केले अथवा नाही. याची लेखापरीक्षणास खात्री होत नाही.
4) कामाचे देयकातून 1 टक्के कामगार विमा कपात करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त पुर्ततेअभावी खर्च रुपयचे 8550/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करणेत येत आहे.

DATYSSM8201 (Ref No : 19, Hmm No : 49)

## *11 अपुर्ण कामांबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नप./शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***अपुर्ण कामे विहीत मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 93 दिनांक 19/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

नगरपरीषद सातारा यांचेकडील सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात बांधकाम विभागाकडील पुर्ण अपुर्ण कामांच्या यादीचे अवलोकन केले असता सन 2014-15 अखेर एकूण 68 इतकी कामे अपुर्ण असल्याचे दिसते.

संबंधीत सर्व कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याबाबत नगरपरिषदेने योग्य ती कार्यवाही करुन कामे मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहेत.सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात बांधकाम विभाग,

नगरपरिषद सातारा यांनी पुर्ण अपुर्ण कामांच्या याद्या स्वतंत्र सादर केलेल्या नाहीत. पुर्ण-अपुर्ण कामाच्या यादी अर्धसमासपत्र क्रमांक 1, 4 दिनांक 12/4/2016 दिनांक 22/4/2016 अन्वये मागणी करण्यात आली आहे.

उपरोक्त 68 कामे अपुर्ण असल्याचे नगरपरिषदेने दिलेल्या यादीवरुन काढण्यात आले आहेत. सन 2014-15 अखेर लेखाशिर्षानिहाय किती कामे पुर्ण आहेत याबाबतची नोंदवही नगरपरिषदेने ठेवलेली नाही. उपरोक्तबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

DATSPVM7601 (Ref No : 21, Hmm No : 93)

## *12 बांधकाम विभाग तांत्रिक मंजूरी फी छाननी फी थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट रिपोर्ट, कामाचे डिझाईन फी याबाबींचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : सर्व न प शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***बांधकाम विभाग तांत्रिक मंजूरी फी छाननी फी थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट रिपोर्ट, कामाचे डिझाईन फी याबाबींचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.अर्धसमासपत्राने मागणी करुनही बांधकाम विभागाकडील परिपुर्ण माहिती मिळाली नाही.***

नगरपरिषद सातारा सन 2014-15 च्या लेखापरीक्षणामध्ये बांधकाम विभागाने केलेल्या विकास कामांच्या तांत्रिक मंजूरी फी, छाननी फी, थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट फी, कामांचे डिझाईन फी या बाबींचे लेखे अर्धसमासपत्र क्रमांक 1 दिनांक 11/4/2016, अर्धसमासपत्र क्रमांक 17 दिनांक 20/4/2016, अर्धसमासपत्र क्रमांक 25 दिनांक 29/4/2016 व अर्धसमासपत्र क्रमांक 31 दिनांक 6/5/2016 ने मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही. त्यामुळे लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 38 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) नगरपरिषदेने सन 2014-15 मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना तांत्रिक मंजूरी व छाननी फी पोटी किती रक्कम आदा केली. तसेच आदा केलेली रक्कम कोणकोणत्या कामांच्या तांत्रिक मंजूरीपोटी आदा केली, तांत्रिक मंजूरी मिळालेल्या कामांपैकी किती कामे पुर्ण, अपुर्ण व चालू

न केलेल्या अवस्थेत आहेत याची पडताळणी करता आली नाही.

2) थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट फी पोटी खर्च केलेली रक्कम ज्या कामांसाठी सदर फी आदा केली त्या कामांचा तपशिल व थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट रिपोर्ट लेखापरीक्षणात पहावयास मिळाले नाहीत.

3) नगरपरिषदेने कामांच्या डिझाईनसाठी खर्च केलेल्या रकमेचे अभिलेखे लेखापरीक्षणात पहायला मिळाले नाहीत.

DATRBBM8201 (Ref No : 22, Hmm No : 38)

## *13 समर्थ मंदीर ते बोगदा रस्त्यावरील जय हनुमान वडार सोसायटी जवळील पुलाचे रुंदीकरण करणे.*

**न. वि. 6**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 6757090.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6684328.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72762.00/-

***नियमानुसार निविदा प्रक्रिया केलेली नाही.स्टीलसाठी वाढीव दर दिलेले आहेत.डिवॉटरींग या बाबीसाठी जादा दर दिले आहेत.***

प्रशासकीय मान्यता - सर्व साधारण सभा ठराव क्रमांक 24 दिनांक 13/2/2012

तांत्रिक मान्यता - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यस्थापन विभाग जा.क्र./चिशा/तांमा/476 दिनांक 6/3/2015

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 6105250/-

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/साबां/1988 दिनांक 18/1/2014

कामाची मुदत - 180 दिवस काम पुर्ण दिनांक 25/5/2015

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | एम.बी. नंबर | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 590 | 9/7/2014 | 58/198 | 1701071 | Ist RA |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 70/28 ते 35 | 2613828 | IInd RA |
| | | 74/82 ते 85 | 899751 | IIIrd RA |
| | | 74/170 ते 174 | 1522440 | IVth and Final |
| एकूण | | | 6737090 | |

याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 40 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदरचे काम रुपये 10 लक्षचेवरील असलेने नगरपरिषद प्रशासन संचालनालय आदेश क्रमांक नप्रस/निविदा मागविणे/प्रक्र.151/05/9 दिनांक 29/12/2015 मधील अ.क्र. 27, 28, 30 व 33 अन्वये कार्यवाही न करता एकाच लिफाफ्यात निविदा मागविल्या आहेत. तसेच अ.क्र. 33 अन्वये या निविदेबाबत एक राज्यस्तरीय व एक जिल्हास्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे आवश्यक असतांना दैनिक सांजवात या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली आहे.
2) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 नुसार दिनांक 1/2/2013 पासून 10 लक्षचेवरील कामाकरीता ई-निविदा प्रक्रियेत अवलंब करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही.
3) सदर कामाच्या निविदा दिनांक 28/11/2013 रोजी उघडणेत आल्या व त्यातील 1. हेमंत दत्तात्रय दरेकर 17.50 टक्के जादा, 2. महेश कन्स्ट्रक्शन - 16 टक्के जादा पैकी अ.क्र. 2 मे. रत्नप्रभा कान्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटीनंतर 10.95 टक्के जादा दरास सहमती दिली या दरास नगरपरिशद विशेष सभा ठराव क्रमांक 228 दिनांक 3/1/2014 अन्श्रवये मान्यता देण्यात आली आहे. नगरपरिषद विशेष सभा ठराव क्रमांक 44 व शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्रमांक जीईएन-1093/2365/प्र.क्र./126/93नवि-14 दिनांक 20/10/1993 नुसार 10 टक्के पेक्षा जास्त दराच्या निविदा बाबत स्पष्ट आदेश दिलेले असूनही अशी कार्यवाही केलेली नाही.
4) सदर कामाचे निविदेमध्ये अंदाजपत्रकावर 10.94 टक्के जादा दराने निविदा स्वीकृत करणेत आली त्यावर सन 2013-14 चे डिएसआर प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन चालू दराचे अंदाजपत्रकाप्रमाणे 4.95 टक्के जादा दर आहेत असे दर्शविले आहे. कामाचे प्रदान करतांना देयकामध्ये एकूण मुल्यांकनावर 10.95 टक्के जादा दर परिगणित करुन दिलेले आहेत. तथापि अंतिम देयक पान क्रमांक 1 बाब क्रमांक 6 डिवॉटरींग या बाबीमध्ये चालू दर पत्रकानुसार केलेल्या अंदाजपत्रकातील दर देऊन तयावर 10.95 टक्के वाढीव दराने प्रदान करणेत आले आहे. वास्तविक मूळ अंदाजपत्रकातील दर व त्यावर 10.95 टक्के जादा दर असा दर देणे आवश्यक असतांना वाढीव दर दिलेले आहेत.

| अ.क्र. | बाब क्रमांक व तपशिल | मूळ 2012-13 चे अंदाजपत्रकातील दर | प्रत्यक्ष प्रदान 2013-14 प्रमाणे दर | जादा |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 6 डिवॉटरींग for Abutment (+) 10.95 टक्के निविदा दर | 170.75 | 209.80 | 39.05<br><br>4.97 |
| | | | | 43.32 |

उपरोक्तप्रमाणे एकूण 284.43 घनमीटर X रुपये 43.32 = 12321.50 म्हणजेच रुपये 12322/- एवढे जादा प्रदान करणेत आले असून सदर रक्कम वसुल करावी.

DATSMKM5801 (Ref No : 23, Hmm No : 40)

## *14 वाहन दुरुस्तीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 469353.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 469353.00/-

***वाहन दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जादा खर्च झालेला आहे. दुरुस्ती आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही, दुरुस्तीनंतर भंगार साहित्याचा लिलाव केलेला नाही.***

नगरपरिषद सातारा चे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतेवेळी वाहन दुरुस्तीवर एकूण रक्कम रुपये 469353/- इतका खर्च झालेला आहे. याबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 91 दिनांक 19/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्रमांक नप्रस/वाहन धोरण/2005/प्र.क्र.0519 दिनांक 10 मे 2005 तसेच स्थायी निदेश क्रमांक 32 मधील उपपरिच्छेद क्रमांक 35 मध्ये नमूद केलेप्रमाणे जी वाहन मैल अंतर कमी देत असतील व ज्यावरील दुरुस्तीचा खर्च जादा आहे अशी वाहने निर्लेखीत करावी तसेच अशा वाहनावर मोठया स्वरुपाची दुरुस्ती करीता खर्च करणेत येवू नये. असे शासन आदेशात नमूद असतांना वाहन क्रमांक एम.एच.11 ए.बी.1000, एम.एच.11 ए.बी.1001, एम.एच.11 जी.7001, एम.एच.11 एफ.4999 जादा खर्च झालेचे दिसून आले. असे असतांना वरीलप्रमाणे वाहन निर्लेखीत न करता त्यावर जादा खर्च केला आहे. याबाबत साधार खुलासा करुन आता अशी वाहने निर्लेखित करणेची कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी.

2. वाहन विभागाने वाहन दुरुस्तीवर केलेल्या खर्चाप्रमाणे व हिस्ट्रीशिटची पडताळणी करता प्रमाणकासोबत वाहन चालकाचा दुरुस्ती करणेबाबत सादर केलेल्या अहवालावर दिनांक नमूद नाही. तसेच वाहन विभाग प्रमुखाच्या शेरा/अहवाल घेतला जात नाही. तसेच वाहन दुरुस्तीच्या आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही. याबाबत खुलासा करुन वाहन वेळीच व योग्य दुरुस्ती झालेबाबतची खात्री करावी.

3. वाहन विभागाने सन 2014-15 मध्ये झालेल्या सर्व वाहनांची दुरुस्ती केल्यानंतर वाहनाचे जुने स्पेअर पार्ट, टायर्स नगरपालिकेकडे जमा करुन नोंदवहीत नोंदी घ्यावयाच्या आहेत. तथापि नगरपरिषदेने अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेकडे जुन स्पेअर पार्ट/टायर्स किती आहे याचा तपशिल समजू शकले नाही. तसेच नगरपालिकेने अशा भंगार साहित्याचा लिलाव केलेचे दिसून आले नाही. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही का करण्यात आली नाही याचा साधार खुलासा करावा व आता नोंदवही अद्यावत ठेवून भंगार साहित्याचा लिलाव करुन जमा होणारी रक्कम नगरपरिषद फंडात जमा करावी. व पुर्तता दाखवावी.

वरीलप्रमाणे पुर्तता होईपर्यंत वाहन दुरुस्तीवर झालेला एकूण खर्च रक्कम रुपये 169353/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATSGKM6501 (Ref No : 29, Hmm No : 91)

### *15 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केलेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा शासन निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 36928652.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 36928652.00/-

***1. अभिलेखे उपलब्ध न केल्याने दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.2. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रानुसार लेखापरीक्षण न करणेबाबत शासन आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.***

उपरोक्त बाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 90 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. सातारा नगरपरिषद, साताराचे सन 2014-15 चे लेखापरीक्षण करतेवेळी पाणी पुरवठा विभगाकडील अभिलेखे उपलब्ध करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 1 दिनांक 11/4/2016 नुसार सुचना देण्यात आलेली होती. सदर

UIDSSMT या योजनेअंतर्गत सुधारीत वाढीव सातारा पाणी पुरवठा योजना मंजूर असून सदर योजना ठेव तत्वावर राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे रक्कम रुपये 36928652/- वित्तीय वर्ष सन 2014-15 मध्ये वर्ग करण्यात आली आहे. सदर योजनेच्या खर्चासंबंधी अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजूरी, निविदा नस्ती, मोजमाप पुस्तके खर्च प्रमाणके व इतर संबंधीत नोंदवहया उपलब्ध करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 24 दिनांक 27/4/2016 अनुसार लेखी विनंती करण्यात आली होती. तथापि याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत.

2. सन 2013-14 अहवालातील परिच्छेद क्रमांक 24 अन्वये सदर योजनेची अभिलेखे उपलब्ध नसल्यबाबत तपशिल नमूद आहे. सदर परिच्छेदांतील उपपरिच्छेद क्रमांक 2 अन्वये नगरपालिका सातारा कडील पत्र दिनांक 6/8/2015 नुसार सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात आली असून त्यांचे पत्रानुसार योजनेचे अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी मुंबई व महालेखाकार नागपूर/मुंबई यांचेमार्फत 5 वर्षांनी लेखापरीक्षण करण्यात येते. त्यामुळे पुन्हा लेखापरीक्षणाकरीता अभिलेखे उपलब्ध करता येत नाहीत. अशा आशयाचा मजकूर नोंद आहे. मात्र उपरोक्त परिच्छेद क्रमांक 24 मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची धारणा योग्य असल्याबाबत शासनाचे आदेश प्राप्त करणे आवश्यक असे नमूद केले आहे. मात्र अद्याप असे आदेश प्राप्त झाले नाहीत. व अभिलेखे उपलब्ध केले नाहीत. याबाबत पुर्तता आवश्यक आहे. तसेच सदर परिच्छेद क्रमांक 24 मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 ( सुधारणा 2011) चे कलम 8 (मुख्य अधिनियम कलम 6(1) व 7(1) नुसार) दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATSMKM5801 (Ref No : 30, Hmm No : 90)

### *16 नळ पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक स्थितीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 93अ*

गुंतलेली रक्कम रु. 28862395.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 28862395.00/-

***1. नळ पाणी पुरवठा योजना प्रचंड तोटयात आहे.2. मिटर पध्दत वापरणे गरजेचे आहे.3. सामान्य पाणी पट्टी वसुली केली जात नाही.4. थकबाकी जादा आहे.5. कर्जाचे दायित्व जादा आहे.***

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 81 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा

मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नळ पाणी पुरवठा योजनेची सन 2012-13 ते 2014-15 मधील जमा व खर्चाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | खर्च | जमा | जादा खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | 2012-13 | 35585361 | 22259867 | 13325494 |
| 2 | 2013-14 | 33535232 | 20756939 | 12778293 |
| 3 | 2014-15 | 28862395 | 22478054 | 6384341 |
| | | 97982988 | 65494860 | 32488128 |

वरीलप्रमाणे मागील तीन वर्षाची आकडेवारी पहाता जमेपेक्षा खर्च जादा झाल्याचे दिसून येते. उपरोक्त तीन वर्षात मिळून रक्कम रुपये 32488128/- इतका तोटा झालेला आहे. म्हणजेच वार्षिक सरासरी रक्कम रुपये 10829376/- चा तोटा होत आहे. त्यामुळे योजना स्वयंपूर्ण नसून प्रचंड तोटा सहन करावा लागत आहे. खर्चात काटकसर करुन तसेच वसुलीचे प्रमाण वाढवून योजना स्वयंपूर्ण करण्याकडे नगरपरिषदेने लक्ष पुरविणे गरजेचे आहे. अन्यथा आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होणार आहे याची नोंद घ्यावी.

2. महाराष्ट्र शासन नगरविकास मुंबई अधिसुचना दिनांक 1/4/1997 अनुसार विशेष पाणीपट्टी कराचे दर ठरविले असून मीटर वापर केल्यास लिटर प्रमाणे पाणी आकारणी करण्याचे दरही दिलेले आहेत. शहराच्या काही भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणही मीटर बसवून पाणी वापरावर पाणीपट्टी आकारणी करते. त्याचपध्दतीने पाण्याच्या वापराचे मोजमाप मीटरने केल्यास पाण्याचा अपव्यय टाळला जाईल. तसेच पाणीपट्टीत वाढ होऊन याजना स्वयंपूर्ण होण्यासठी मदत होईल.

3. नगरपरिषद हद्दीत 30699/- मिळकती असून नळकनेक्शन 14139/- आहेत म्हणजेच 16560/- मिळकतधारकांकडून पाणीपट्टी कर वसूल केला जात नाही. त्यांचेकडून महाराष्ट्र नगरपालिका नगरपरिषद व औद्योगिक नागरी अधिनियम 1965 मधील नियम 105(2) अनुसार नगरपरिषदेने आपल्या हद्दीतील मिळकत धारकांकडून सामान्य पाणीपट्टी कर वसूल केला पाहिजे. तथापि तशी कार्यवाही न केलेने नगरपरिषदेचे नुकसान होत आहे.

4 नगरपरिषद हद्दीत 175 विंधन विहीरी असून सदर विंधन विहीरीवर हातपंप आहेत. त्यामुळे सामान्य पाणी पट्टी कर वसुली करुन तूट भरुन काढणे गरजेचे आहे.

5. पाणी पुरवठा याजनेवर अद्याप रुपये 19351799/- कर्ज असून त्याची परतफेड करणेसाठी मुद्दल + व्याजाची रक्कम खर्च होत आहे. सदर दायित्व कमी करणे गरजेचे आहे.

6. पाणीपट्टी कराची थकबाकी रक्कम रुपये 19106992/- इतकी आहे. नियम अधिनियमातील तरतूदींचा वापर करुन सदर रक्कम वसुली करण्याचे प्रयत्न करणे गरजेचे आहेत.

7. शहराच्या काही भागास पाणी पुरवठा करतांना नगरपरिषद ही महाराष्ट्र जिल्हा प्राधिकरण सातारा यांचेकडून कृष्णा नदीपासून उपसा केलेले पाणी विकत घेते. सदर पाणी बिलाची थकबाकी रक्कम रुपये 49178645/- इतकी आहे. सदर रकमा वेळेवर भरल्या नसल्याने त्याचे व्याज व दंड आकारणी होत आहे. तसेच सदर रकमेच्या बिलाची नोंदवही नसल्याने प्रत्यक्ष पाणी किती विकत घेतले व त्याची आकारणी बरोबर असल्याची

पडताळणी करता आली नाही. त्यामुळे रक्कम योग्य असल्याची खात्री होत नाही. त्याचप्रमाणे सदर दायित्वच कमी करणे गरजेचे आहे.

8. अनधिकृत पाणी कनेक्शन शोधून बंद करण्याची मोहीम सुरु करणे, पाणी गळती, पाणीचोरी शोधून प्रतिबंधात्मक कारवाई करावी. योजना तोटयात असल्याने कमालकर आकारणी करणे इत्यादी उपाय करणे आवश्यक आहे.

DATMSSM6801 (Ref No : 39, Hmm No : 81)

## *17 घनकचरा व्यवस्थापन न केलेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नागरी घनकचरा (व्यस्थापन व हाताळणी) नियम 2000 मधील सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नगरपरिषदेने कार्यवाही केलेली नाही.***

नगरपरिषद सातारा यांचेकडील सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात घनकाचरा व्यवथापनाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 55 दिनांक 10/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) घनकचरा व्यवस्थापनांतर्गत निधी खर्च करतांना नगरपरिषदेने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 अनुसुची क्षेत्रामध्ये घालून दिलेले निकष व पध्दती यांचे अनुपालन करुन शहरात निर्माण झालेल्या कोणत्याही नागरी घनकच-याचे व्यवस्थापन व हाताळणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहे. परंतू याबाबत नगरपरिषदेने कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

2) नागरी घनकचरा (व्यवथापन व हाताळणी) नियम 2000 अनुसुची 3 व 4 मध्ये नगरपरिषदेने स्थापित करावयाच्या कचरा प्रक्रिया व त्याच्या विल्हेवाटीची सोय करतेवेळी अनुसुचीतील निर्देश व मानके याबाबत नगरपालिकेने परिपूर्ण कार्यवाही केलेली नाही. शासन निर्णय दिनांक 31/3/2006 मधील परिच्छेद ब (1)(3) नुसार घनकचरा व्यवथापनांतर्गत घनकचरा गोळा करुन त्यांचे विलगीकरण व परिवहन करणे ही कामे अनुज्ञेय आहेत. याबाबतच्या

कार्यवाहीबाबत सादर साधार पुर्तता दाखवावी.

घनकचरा व्यवथापन व हाताळणीबाबत नियमानुसार कार्यवाही झालेली नाही.

DATVSDM6301 (Ref No : 41, Hmm No : 55)

## *18 नगरपरिषद क्षेत्रातील घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचरा गोळा करणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 5655735.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5655735.00/-

***घंटागाडया व त्यासाठीच्या खर्चाबाबत अंदाज निश्चित केला नाही. घंटागाडी वेळापत्रकाबाबत कार्यवाही केल्याचे दिसले नाही.***

सातारा नगरपरिषद सन 2014-15 लेखापरीक्षण कालावधीमध्ये नगरपरिषद क्षेत्रातील घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचरा गोळा करुन कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेकामी वार्ड क्रमांक 1 ते 39 साठा घंटागाडी जाहिर निविदा मागवून खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

| माहे | रक्कम |
|---|---|
| एप्रिल 2014 | 467693 |
| मे 2014 | 438516 |
| जुन 2014 | 434415 |
| जुलै 2014 | 441376 |
| ऑगस्ट 2014 | 445494 |
| सप्टेंबर 2014 | 447317 |
| ऑक्टोबर 2014 | 534827 |
| नोव्हेंबर 2014 | 467486 |
| डिसेंबर 2014 | 488192 |
| जानेवारी 2015 | 477082 |
| फेब्रुवारी 2015 | 527092 |
| मार्च 2015 | 496245 |
| एकूण | 5665735 |

वरील खर्चाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 58 दिनांक 10/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) नगरपरिषदेने निविदा प्रसिध्द करणेपूर्वी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने नगरपालिका हद्दीतून अंदाजे किती कचरा जमा होणार होता त्यासाठी किती घंटागाडयांची आवश्यकता होती यासाठी किती खर्च अपेक्षित आहे. याची अंदाजीत रक्कम याबाबत पूर्व आढावा न घेता 30 टक्के वाढ गृहीत धरुन सन 2014-15 साठी कोणत्या आधारे निविदा प्रसिध्द करण्यात आली.
2) महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 अन्वये ई निविदा कार्यप्रणाली प्रमाणे निविदा मागाविणे आवश्यक असता दरपत्रके मागवून दर निश्चिती केल्याने अनियमितता झाल्याचे दिसून येते.
3) निविदा अट क्रमांक 17 प्रमाणे मक्तेदाराने कचरा उचलत जाणेचा मार्ग मार्गावरील थांबण्याची सर्व ठिकाणे आणि थांबण्याच्या संदर्भातील वेळापत्रक वर्क ऑर्डर पासून 15 दिवसांत पालिकेस देण्याचे आहे. जे पुढे नागरीकांसाठी प्रसिध्द करण्यात येईल असे असतांना वॉर्ड क्रमांक 1 ते 39 घंटागाडयांचे वेळापत्रक ठेवण्यात आल्याचे दिसून येत नाही.
4) अट क्रमांक 20 प्रमाणे कचरा गोळा करतांना सुका (पुनर्वापर ) होणारा ओला ( विघटनशील) वेगवेगळा गोळा करणेचा आहे. तसेच कच-यासंबंधी अधिनियम, नियम उपविधी मधील तरतूदीनुसार पालिकेने तोंडी अगर पत्राद्वारे दिलेले सर्व संदेश कचरा निर्मात्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदार मक्तेदार यांच्य वर असतांना प्रसिध्दरी व वाटप तसेच कचरा पूनर्वापर व विघटनाबाबत मुकादम, आरोग्य निरीक्षक यांचा अहवाल दिसून येत नाही.
5) अट क्रमांक 24 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कचरा वाहनात न टाकणारे यांची यादी मक्तेदार यांनी दर आठवडा देणे बंधनकारक असतांना असे अहवाल आरोग्य निरिक्षक यांनी घेतल्याचे दिसून येत नाही.
6) अट क्रमांक 32 प्रमाणे कचरा वाहतुकीच्या प्रत्येक फेरीची नोंद, नगरपरिषदेने विहीत केलेल्या रजिस्टरवर घेणे तसेच त्या फेरीच्या घेतलेल्या नोंदी समोर मक्तेदार यांच्या चालकाने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्या रजिस्टरच्या आधारे बिल तयार करण्यात येईल असे असतांना स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही.
7) वॉर्ड क्रमांक 8 मंजूर निविदा दत्तात्रय महादेव कोळी यांची विमा पॉलीसी 17/9/2013 ते 16/9/2014 मुदत अल्प असतांना कोणत्या आधारे मंजूर करण्यात आली, तसेच वॉर्ड क्रमांक 20 श्री. संदीप हणमंत फाळके यांनी श्री. दिपक भोसले यांची घंटा गाडी बाबतची

संमतीपत्रके स्टँपवर घेतलेली नाही. तसेच त्याचप्रमाणे गाडी क्रमांक एम.एच.11 बीएस 1557 ची संमतीपत्रे स्टँपवर घेतलेले नाही. तसेच त्याचप्रमाणे गाडी क्रमांक एम.एच.11 बीएस 1557 ची वीमा पॉलीसी व परिवहन विभागाकडील कर भरणा केल्याची पावती न घेताच घंटागाडी निविदा काय आधारे मंजूर केली

8) घंटागाडीचे देयक सादर केल्यानंतर दैनंदिन कामाचा अहवाल सादर करणे आवश्यक असतांना ठेकेदाराने दैनंदिनी सादर केली नाही. वॉर्डातील नगरसेवक किंवा नागरीक तसेच आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांची स्वाक्षरी विहीत नमुन्यात प्रमाणपत्रासोबत जोडलेली नाही. त्यामुळे सादर करण्यात आलेले देयपत्र योग्य असल्याची खात्री होत नाही.

9) विहीत नमुन्यात तक्रार नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे प्रभागातील कचरा दररोज उचललेबाबत तसेच तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

तरी वरील 1 ते 9 बाबींची पुर्तता करुन दाखवावी तोपर्यंत सदरचा खर्च रक्कम रुपये 5655735/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATVSDM6301 (Ref No : 44, Hmn No : 58)

## *19 चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना साडया व ब्लाऊज खरेदीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील साहित्य नमुना योग्य नसल्याचे व दर जास्त नसलेबाबत आधार नमूद केलेला नाही.***

नगरपरिषद सातारा सन 2014-15 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना साडया व ब्लाऊज खरेदीबाबतच्या नस्तीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 59 दिनांक 10/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) नगरपरिषद साताराने सन 2013-14 व 2014-15 साठी चतुर्थ श्रेणी कर्मचा-यंना गणवेश

खरेदीसाठी मा. विक्री अधिकारी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांना दिनांक 31/12/2014 ने दरपत्रके मागणी केलेली असून त्यानुसार दरापत्रके व नमुने प्राप्त झाली. स्थायी समिती विषय क्रमांक 129 ठराव क्रमांक 1627 दिनांक 22/1/2015 ने सदरचे नमूने, दर्जा व दर जास्तीचे व योग्य नसल्याने बाजारातून दरपत्रके मागवून खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. वास्तविक पहाता शासनमान्यता प्राप्त यंत्रमाग संस्थेकडील नमूने योग्य नसल्याचे खात्री नगरपरिषदेने कोणत्याही प्रयोगशाळेकडील अहवाल नसतांना काय आधारे ठरविण्यात आले, यावरुन नगरपरिषदेस स्थानिक बाजारातून खरेदी करण्याचे प्रयोजन दिसून येते.

तरी शासन मान्यताप्राप्त यंत्रमाग संस्थेकडून खरेदी न केल्याने अनियमितता झाल्याचे दिसून येते.

2) सदरची खरेदी ही जाहिर निविदा दिनांक 26/2/2015 व फेरनिविदा दिनांक 16/3/2015 रोजी दैनिक ग्रामोध्दारमध्ये जाहिरात देण्यात आली. प्रापत 3 निविदेमधून लघुत्तम दराची लेडिज फॅशन, सातारा यांना स्थायी समिती ठराव क्रमांक 1701 दिनांक 6/4/2015 ने मंजूर घेण्यात आली, सदरचा खर्च प्रमाणक क्रमांक 1596 दिनांक 26/10/2015 ने रक्कम रुपये 155161/- सन 2015-16 मध्ये झालेला असला तरी खरेदीबाबत झालेल्या अनियमिततेबाबत या अहवालात भाष्य करण्यात आले आहे.

वरील वरील 1 ते 2 ची पूर्तता करून दाखववी.

DATVSDM6301 (Ref No : 45, Hinm No : 59)

## *20 जंतुनाशके खरेदीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/01/2013 अनुसार दिनांक 1 फेब्रुवारी 2013 नुसार 10 लाखावरील खरेदी ई निविदा पध्दीतीने न केल्याने झालेल्या अनियमितेबाबत.***

नगरपरिषद सातारा सन 2014-15 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये अर्धसमासपत्र क्रमांक 61 दिनांक

10/05/2016 ने जंतूनाशके खरेदीची नस्ती मागणी केली असता प्राप्त झाली. लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालीलप्रमाणे खरेदी करण्यात आलेली असून त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 225 | 22/5/2014 | 2336485 | मे. हार्बोमिन रिसर्च लॅब<br>आयकर 50247/- एसआरबी क्लिनर<br>5 टक्के सुरक्षा ठेव 125618/- 111X900 मि.<br>विकलेला 89 कि.X 3000<br>फिनोलिन सुपर फोर्ट - 171 लि. X 900<br>हार्बोडस्ट पावडर 123 लि X 1500 रुपये<br>हार्बोडस्ट पावडर स्प्रे - 2768 लि X 670 लि<br>सॅनियेलिन लिक्वीड 325 लि X 450 |
| 2 | 260 | 29/5/2014 | 1241550 | मे. हार्बोमिन रिसर्च<br>आयकर 26700<br>सुरक्षा ठेव 66750 |
| 3 | 1227 | 18/10/2014 | 381892 | मे. हार्बोमिन रिसर्च स्प्रे 2768<br>1 टक्के आयकर 40608 एसआरबी क्लीनर 111 X 900 मि<br>5 टक्के सुरक्षा ठेव फ्लेक्स पावडर 1800 किx 89<br>सॅनिटोडिन लिक्वीड 400लि x 325<br>फिनोलीन सुपर फोर्ट - 900 लि X 171<br>हाब्रो स्प्रे 450लि X 2768 |
| 4 | 1683 | 16/12/2014 | 1500000 | मे. हार्बोमिन रिसर्च |
| 5 | 2432 | | 1500000 | मे. हार्बोमिन रिसर्च |
| 6 | 2510 | 23/3/2015 | 791483 | मे. हार्बोमिन रिसर्च |

उपरोक्त बाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 61 दिनांक 10/05/2016 अन्वये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक भांखस-2008/प्र.क्र.256/08 उद्योग 4 दिनांक 10/10/2008 नुसार सर्वसाधारणत: कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये तसेच त्याची कारणे नमूद करणे आवश्यक असता नगरपरिषदेने विभागाची परवानगी न घेता सन 2009-10 च्या निविदा प्रक्रियेतील दरानुसार खरेदी केल्याचे दिसून येते.

2) सन 2009-10 मधील दरकरारानुसार सन 2014-15 ची खरेदी करतांना नगरपालिकेने करारनामा न करताच पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

3) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 अनुसार दिनांक 1/2/2013 पासून 10 लाखावरील खरेदीसाठी ई निविदा प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक असता नियमबाह्यपणे सन 2009-10 च्या दरानेच खरेदी केल्याचे दिसून येते.
4) भांडार विभागाने सदरच्या औषधांच्या नोंदी साठा नोंदवही फॉर्म नं 116 पान क्रमांक 49 ते 55 घेण्यात आलेली असून आरोग्य विभागास वाटप केल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात सदरच्या जंतुनाशकांचा मागील शिल्लक नोंदी घेतल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाकडून गुरुवार, सदर बाजार, राजवाडा विभागाकडे वाटप दाखवितांना साठा नोंदवही मधील रकाना क्रमांक 11 मध्ये वस्तू घेणा-याचे पदनाम व सदरच्या औषधांचा वापर कोठे केला याबाबत फॉर्म नंबर 116 नोंदवही ठेऊन प्राप्त जंतुनाशके व वापर यांचा मेळ आरोग्य अधिकारी यांनी घेतल्याचे दिसून येत नाही.
5) जंतुनाशके खरेदीसाठी सन 2009-10 मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यानुसार हार्बोमिन रिसर्च लॅबोरेटरीज सोलापूर यांची निविदा मंजूरी झालेली होती. जनरल कौन्सिल ठराव क्रमांक 3 दिनांक 26/4/2013 अनुसार उपरोक्त 2009-10 चे दर व पुरवठादाराकडून सन 2014-15 मध्ये खरेदी करण्यात मंजूरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस1088/(2512)/उद्योग 6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (परिशिष्ट 7) अनुसार निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्यास पुनर्प्रत्यायी आदेश देण्याबाबत तरतूद आहे तथापि याबाबत सन 2009-10 नंतर 4 वर्षांचा कालावधी लोटलेला असूनही निविदा प्रक्रिया न राबविता सन 2009-10 च्या निश्चित केलेल्या दरानुसार व पुरवठादार यांचेकडून खरेदी केली आहे. सदर बाब शासन आदेशाचे उल्लंघन करणारी आहे.

DATVSDM6301 (Ref No : 46, Hmm No : 61)

## *21 अंदाजपत्रकातील कमी जादा खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***नगरपरिषदेने सन 2014-15 मधील अंदाजपत्रकात तरतूद केलेप्रमाणे काही बाबींवर कमी जादा रक्कमा जमा व खर्च झालेल्या आहेत. तसेच मागासवर्ग व अपंगांसाठी योजनांवर अत्यंत कमी तरतूद करुन कमी खर्च केला आहे. अंदाजपत्रक तयार करतांना ते वास्तववादी होईल याची दक्षता घेतलेचे दिसून येत नाही.***

नगरपरिषद साताराचे सन 2014-15 चे अंदाजपत्रकाचे व नस्तीचे अवलोकन करता सन 2014-15 चे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 285 दिनांक 15/2/2014 अन्वये मान्यता दिली असून सदर अंदाजपत्रकास मा.जिल्हाधिकारी सातारा आदेश क्रमांक साशा/नपा/कावि1089 सातारा दिनांक 24/4/2014 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

नगरपरिषदेचा सन 2014-15 मधील अर्थसंकल्पातील तरतूद व वार्षिक लेख्यांचा सारांश पहाता खालीलप्रमाणे आकडेवारी दिसून येते.

जमा बाजू

| अ.क्र. | जमा बाब | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष प्राप्त | कमी प्राप्त | जादा प्राप्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | न.पा. कर | 13630000 | 101380088 | - | 87750088 |
| 2 | विशेष अधिनियमातील वसुली | 13200000 | 27920647 | - | 14720647 |
| 3 | मालमत्ता पासून मिळालेले कर/उप्तन्न | 14631000 | 10812048 | 3818952 | - |
| 4 | अनुदाने | 904540000 | 349142100 | 555397892 | - |
| 5 | संकिर्ण | 150301000 | 67348592 | 82952408 | - |
| 6 | सर्वसाधारण | 60000000 | 210865139 | - | 204865139 |
| | | | | 642169252 | 307335874 |

खर्च बाजू

| अ.क्र. | खर्च बाब | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | आदा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य प्रशासन / वसुली | 99329000 | 99620818 | - | 291818 |
| 2 | सार्वजनिक सुरक्षितता | 23573000 | 26792061 | - | 3219061 |
| 3 | आरोग्य व सोयी | 170522500 | 165995677 | 4526823 | 0 |
| 4 | शिक्षण | 14500000 | 14118471 | 381529 | 0 |
| 5 | अंशदाने | 105000 | 25000 | 80000 | 0 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | संकिर्ण | 19350000 | 28405528 | - | 9055528 |
| 7 | भांडवली खर्च | 1010160000 | 320040019 | - | 69011998 |
| | | | | 4988352 | 81578405 |

याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 73 दिनांक 12/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. उपरोक्त तपशिलाचे अवलोकन करता मालमत्तेपासून मिळालेले उत्पन्न/कर व संकिर्ण यापासून मिळणारे उत्पन्न अंदाजीत रकमेपेक्षा कमी जमा झालेचे दिसून येते. तरी नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील तरतूदींचा जास्तीत जास्त काटेकोर वापर करुन उत्पन्न वाढविणेबाबत उपाययोजना करणेबाबत कार्यवाही करणे गरजेचे आहे.

2. सामान्य प्रशासन/वसुली, सार्वजनिक सुरक्षितता, संकिर्ण व भांडवली याबाबत तरतूदीपेक्षा जादा खर्च केला. जादा खर्चाबाबतची साधार कारणे स्पष्ट करुन आता जादा खर्चाबाबत सक्षम प्राधिका-याचे क्षमापन घेणे आवश्यक आहे.

3. महाराष्ट्र शासन नगरविकास व आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी 1063/1630/प्र.क्र./22/93/नाविल दिनांक 20/12/1993 अनुसार नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी नगरपालिकेच्या निव्वळ उत्पन्नाच्या 5 टक्के रक्कम ही कल्याणकारी योजनेवर खर्च करणे आवश्यक आहे. तथापि नगरपालिकेने खालीलप्रमाणे रक्कम रुपये 785244/- इतका कमी खर्च केला आहे.

| सन | सन 2013-14 चे उत्पन्न (बांधील खर्च वजा जाता 5 टक्के होणारी रक्कम) | 5 टक्के होणारी रक्कम | तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 2014-15 | 55912214 | 2795610 | 2700000 | 3010366 | 785244 |

उपरोक्त कमी खर्चाबाबत साधार कारणे स्पष्ट करुन आता पुढीलवर्षी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद करुन कमी खर्चाचा तपशिल भरुन काढणेत येऊन पुर्तता दाखवावी.

4. महाराष्ट्र शासन व नगरविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक 2010/ प्र.क्र.146/2020/नवि-6दिनांक 30/10/2010 नुसार निव्वळ उत्पन्नाच्या 3 टक्के रक्कम अपंगांसाठील खर्च करावयाची आहे. तथापि नगरपरिषदेने सन 2014-15 मधील अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद न करता एकूण रक्कम 1677366/- इतका कमी खर्च केला असून याबाबत कागदोपत्री खुलासा करुन पुढील वर्षी योग्य तरतूद करुन अनुशेष भरुन काढणेत येऊन पुर्तता दाखवावी.

5. महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता 1971 चे नियम 28 अनुसार अर्थसंकल्प मंजूर झालेनंतर कोणत्या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च एकतर बचतीमधून स्थानांतरण अतिरिक्त अनुदान वाटप व अर्थ संकल्पात सुधारणा करणे यापैकी कोणत्याही एका मार्गाने जादा खर्चासाठी तरतूद केल्याशिवाय जादा खर्च करता येणार नाही.

6. सन 2014-15 मधील मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन करता जमेबाबत एकत्रित कर, पाणीकर, शिक्षण कर, वृक्षकर, जागा व इमारत भाडे इत्यदी बाबींवर अंदाजीत रकमेपेक्षा रक्कम कमी जमा झाली आहे. तरी रकमा

कमी जमा अथवा वसुल का झाल्या? तसेच वसुलीबाबत कोणत्या उपाययोजना केल्या? याचा कागदपत्रांसह खुलासा करावा तसेच अप्राप्त अनुदानाबाबत पाठपुरावा करावा.

7. नगरपरिषद साताराचे सन 2014-15 मधील मंजूर अंदाजपत्रकाचे अवलोकन करता सामान्य प्रशासन, परताव, निवृत्ती वेतन रस्त्यावरील दिवाबत्ती खर्च, साफसफाई प्राथमिक शिक्षण, मैदान विकसीत करणे, कास धरणाची उंची वाढविणे इत्यादी बाबींवर तरतूदीपेक्षा जादा खर्च केला असल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पातील तरतूद अपुरी पडत असल्यस महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 30 अनुसार पुर्व विनियोजन केल्याशिवाय खर्च करता येत नाही. असे असतांना नगरपरिषदेने उपरोक्त बाबींवर जादा खर्च केल्याने खर्चासाठी तरतूद करतांना खर्चाच्या बाबीबाबत माहितीच्या आधारे नियोजन केल्याचे दिसून येत नाही. याबाबत साधार खुलासा करुन यापुढे जमा व खर्चाच्या शक्य तितक्या अचुक माहितीच्या आधारे वास्तववादी अंदाजपत्रक तयार करण्याची दक्षता घ्यावी.

DATSGKM6501 (Ref No : 53, Hmm No : 73)

## *22 नगरपरिषद मुख्य कार्यालय ते शाही मशिद अखेर नवीन पोल बसवून स्ट्रीट लाईटची सोय करणे कामाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 457000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 47000.00/-

***प्रशासकीय मंजूरी आदेश घेतलेले नसून स्थायी समितीच्या ठरावांतील कामाच्या नावात बदल आहे. विहीत मुदतीत काम पुर्ण नसून विलंबाची कारणे नमूद नाहीत. अंदाजपत्रकीय बाबीत बदल करुन काम केलेले आहे.***

स्थायी समिती ठराव क्रमांक 1105 दिनांक 28/2/2014 विषय क्रमांक 34

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 450000/-

जाहिर निविदा - दैनिक मुक्तागिरी दिनांक 12/8/2014

कामाचे आदेश - प्र.क्र. 64 दिनांक 9/9/2014 मुदत 60 दिवस

काम पुर्णत्व प्रमाणपत्र - नस्तीसोबत नाही.

तांत्रिक मंजूरी - कार्यकारी अभियंता, मजिप्रा पत्र क्रमांक 2042 दिनांक 8/8/2014 रुपये 450000/-

मक्तेदार - श्री. वरद विनायक इलेक्ट्रीक डेकोरेटर्स, सातारा स्थायी समिती विषय क्रमांक 22 ठराव

क्रमांक 1459 दिनांक 6/9/2014 अन्वये वरद इले. सातारा यांचे 4.99 जास्त दराने निविदा स्विकृती केली आहे.

उपरोक्त तपशिलाप्रमाणे नगरपालिकेने स्ट्रीट लाईट बसविणेकामी 450000/- इतका खर्च केला आहे. याबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 72 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामास स्थायी समिती ठराव क्रमांक 1105 दिनांक 28/5/2014 अन्वये प्रशासकीय मंजूरी घेतल्याचे नमूद आहे. प्रत्यक्ष सदर ठरावाचे अवलोकन केले असता कामाचे नांव "सातारा शहरातील राजपथ, कर्मवीर भाऊराव पाटील पथ व आदालत वाडा या मुख्या रस्त्यावरील जुने व खराब झालेले सोडियम व्हेपर दिवे बदलणे" असा उल्लेख आहे. प्रत्यक्ष देयक मंजूरी आदेशावर, "नगरपालिका कार्यालय ते शाही मशिद अखेर स्ट्रीट लाईटची सोय करणे" असे नमूद आहे. तसेच सदर कामाचे प्रशासकीय मंजूरी आदेश नस्तीसोबत नाहीत. त्यामुळे स्थायी समिती ठरावातील कामाच्या नावात देयक मंजूरी आदेशातील कामाच्या नावात विसंगती दिसते. प्रशासकीय मंजूरीशिवाय काम केल्याबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.
2) सदर कामाची निविदा 4.99 टक्के जादा दराने मंजूर केलेली आहे. स्थायी निदेश क्रमांक 36 मधील तरतूदीनुसार प्राप्त निविदा जादा दराने आल्यास फेरनिविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही का करण्यात आली नाही याची पुर्तता करावी.
3) सदर कामाची मुदत 09 नोव्हेंबर 2014 संपत असल्याने त्यापुर्वी काम पुर्ण होणे आवश्यक असतांना मोजमाप पुस्तिका (क्रमांक नमूद नाही) पान क्रमांक 155 ते 160 वरील नोंदीनुसार कामाची मोजमापे 22/3/2015 ला घेतलेली आहे. त्यामुळे सदर काम मुदतीत पुर्ण झालेले नसून विलंबाबाबत कोणती कार्यवाही केली व काम पुर्णत्व प्रमाणपत्र नसल्याने काम कधी पुर्ण झाले याचा बोध होत नाही.
4) सदर कामाच्या अंदाजपत्रकापमाणे 10 पोलची नोंद असून प्रत्यक्ष मोजमाप पुस्तिकेतील नोंदीनुसार 15 पोलचे काम केलेले आहे. त्यामुळे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ तयार केल्याचे दिसत नाही.

उपरोक्त मुद्दा क्रमांक 1 ते 4 चे अवलोकन केले असता सदर कामामध्ये विसंगती व अनियमितता दिसून येतात. सदर बाबींकडे नगरपरिषदेचे लक्ष वेधण्यात येत आहे.

DATSGKM6501 (Ref No : 55, Hmm No : 72)

### *23 अपंग कल्याणकारी खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 नप निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णयाप्रमाणे अपंग खर्चाबाबत कार्यवाही केलेली नाही. यासाठी तरतूद करुनही खर्च कमी केला आहे.***

लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 62 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) नगरपरिषद सातारा यांनी सन 2014-15 मध्ये प्रमाणक क्रमांक 2670 दिनांक 31/3/2015 अन्वये रुपये 50000/- इतकी रक्कम नगरपरिषद वसुली विभागातील लिपीक श्री. बाबर यांना अंध/अपंग कल्याणकारी निधीतून स्कुटर विथ ॲडॉप्शन (ॲक्टीव्हा) खरेदीकामी केलेली आहे.

संबंधीत नस्तीचे अवलोकन केले असता सन 2014-15 च्या अर्थसंकल्पात सदर लेखाशिर्षाखाली रुपये 200000/- इतकी तरतूद केल्याचे नमूद आहे. खर्च मात्र रुपये 50000/- केल्याचे दिसते. तरतूद करुनही खर्च कमी केल्याने सदर मोघमपणे तरतूद करून खर्च केल्याचे दिसते.

सदर खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक -अपंग-2012/प्र.क्र.32/अ.क्र.-2 दिनांक 8/2/2013 नुसार केलेला आहे.

उपरोक्त केलेल्या खर्चाबाबत अनुशेषाबाबत नगरपालिकेकडे नोंदवही ठेवल्याचे दिसते नाही. त्यामुळे यापूर्वी सन 2014-15 अखेर किती खर्च/अनुशेष करणे आवश्यक होते, यापूर्वी किती खर्च केलेला आहे याचा लेखापरीक्षणास बोध होत नाही. साधार पुर्तता करावी. तसेच श्री. बाबर यांच्या सेवापुस्तकात या बाबी नोंद करून पुर्तता दाखवावी.

2) नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2010/प्र.क्र.146/2010/नवि-6 दिनांक 30 ऑक्टोबर 2010 मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे अपंग व्यक्ती, समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा 1995 मधील कलम 40 अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी किमान 3 टक्के निधी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. परंतू नगरपरिषद सातारा यांनी याप्रमाणे खर्च केलयाचे दिसत नाही.

याबाबत नगरपरिषद क्षेत्रात प्रभागनिहाय अपंग लाभार्थी नोंदवही/यादी तयार करून नियमानुसार खर्च करणे आवश्यक आहे.

DATSPVM7601 (Ref No : 56, Hmm No : 62)

***24 ई.सी.एच.एस. पॉलीक्लिनीक सातारा या ठिकाणी नवीन एअर कंटीशनर बसविणेबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 121544.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 121544.00/-

| |
|---|
| ***मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक साशा/नपा/कावि 875 सातारा दिनांक 29/4/2013 ने सदर खर्च 10 टक्के राखीव निधीतून अंधअपंग योजनेअंतर्गत मृत्यु पावलेल्या सैनिकांच्या पत्नीच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेवर खर्च केला नाही.*** |

कामाचे नांव - ई.सी.एच.एस. पॉलीक्लिनिक सातारा या दवाखान्यास एअर कंडिशन बसविणेबाबत.

प्रशासकीय मान्यता - मे. स्थायी समिती ठराव क्रमांक 1144 दिनांक 21/7/2014

तांत्रिक मान्यता - जा.क्र.चिशा/तांमं/2044/2014 महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग सातारा दिनांक 8/8/2014

जाहिर निविदा - दैनिक ग्रामोध्दार दिनांक 12/8/2014

मक्तेदार - कुलव्हीजन सातारा

दर - 4.99 टक्के जादा दर

अंदाजपत्रकीय रक्कम - 124000/-

कामाचा आदेश - जा.क्र./सानज/विद्युत/58 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 9/9/2014

कामाची मुदत - 30 दिवस

उपरोक्त केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 71 दिनांक 12/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर खर्चाची अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेली नव्हती परंतू माननीय जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रमांक साशा/नपा/कावि-875 सातारा दिनांक 29/4/2013 नुसार नगरपालिकेने 10 टक्के राखीव निधीमधून अंध अपंगांसाठी 25 टक्के निधी खर्च करावा. त्याचप्रमाणे युध्दात मृत्यु पावलेल्या सैनिकांच्या पत्नीसाठी प्रस्तुत निधीतून खर्च करण्यात यावा म्हणजेच सदर निधीमधून वैयक्तिक लाभार्थ्यांवर खर्च करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता ई.सी.एच.एस. पॉलीक्लिनीकमध्ये एअर कंडिशन बसविणेवर रक्कम रुपये 121544/- इतका खर्च केला आहे. तरी सदर झालेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. सदर खर्च संबंधीतांकडून वसूल करुन

पुर्तता दाखवावी.

DATSGKM6501 (Ref No : 60, Hnun No : 71)

***25 सिसनं 58, मल्हारपेठ जवळील श्री. छत्रपती अभयसिंहराजे उद्यान येथे फायबर म्युअरल्स बसविणे.***

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : इतर बांधकमे नप निधी निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 371765.00 /-
तात्पुरती अमान्य रक्कम रु. 371665.00/-

***1. नागरी बाब सिव्हील आयटम्स नसल्यामुळे तांत्रिक मान्यतेबाबत कोणत्या आधारे दिली याचा बोध होत नाही.2. काम पुर्णत्व प्रमाणपत्रावर सक्षम अधिकारी स्वाक्षरी नाही.3. चाचणी अहवाल सोबत नाही.***

कामाचे नांव सिसनं 58, मल्हारपेठ जवळील श्री. छत्रपती अभयसिंहराजे उद्यान येथे फायबर म्युअरल्स बसविणे.
प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्रमांक 1147 दिनांक 21/7/2014
अंदाजपत्रकीय रक्कम 338625/-
तांत्रिक मान्यता मा. कार्यकाररी अभियंता मजिप्र सातारा ठराव क्रमांक 2896 दिनांक 19/12/2013
मक्तेदाराचे नांव श्री. शैलेशकुमार चंद्रकांत शिंदे
कामाचा आदेश दिनांक बाक/साशन/सांबां/1113 दिनांक 26/12/2014
काम पुर्ण दिनांक 20/1/2015 कामाची मुदत 90 दिवस
मोजमाप पुस्तक क्रमांक 49/190
लेखाशिर्ष इतर बांधकामे
झालेला खर्च प्रमाणक क्रमांक व दिनांकरक्कम शेरा
371625 2663 दिनांक 31/3/2015 371665 Ist and Final Bill
याबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 46 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामामधील बाबींचे दर डिएसआरमध्ये समाविष्ट नसल्याचे नमूद आहे व सदर कामास एमजेपी ने

तांत्रिक मान्यता दिलेली आहे. डिएसआर मध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरीता एमजेपी ने कशाच्या आधारे तांत्रिक मान्यता दिलेली आहे. याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

सदर बाब सुशोभिकरण अंतर्गत असून जनरल सिव्हील बाबींमध्ये व डिएसआर मध्ये बाब समाविष्ट नाही. त्यामुळे सदर बाबीकरीता एमजेपी ने काय आधारे तांत्रिक मान्यता दिली याचा बोध होत नाही.

2. सदर कामाच्या काम पुर्ण प्रमाणपत्रावर सक्षम अधिकारी/नगर अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

3. सदर कामाकरीता दैनिक ग्रामोध्दारमध्य जाहिर निविदा प्रसिध्द केली असून सदर काम श्री. शैलेशकुमार चंद्रकांत शिंदे यांना देण्याता आले आहे. (4.99 टक्के जादा दराने) सदर काम Civil Work नसून डिझाईन, पुतळे, आर्ट सुशोभिकरण डिझाईन क्षेत्रातील अधिकृत मक्तेदारांस किंवा निविदा स्विकारतांना या क्षेत्रातील अनुभवी /या प्रकारचे कामे केलेल्या मक्तेदारांस देण्यात प्राधान्य देणे आवश्यक होते. परंतू सदर काम देतांना मक्तेदाराने या बाबीकरीता काम केल्याबाबत कोणतेही अभिलेखे घेतल्याचे दिसत नाही. विसंगतीबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

4. संबंधीत कामाच्या चाचणी अहवालाबाबत कोणती कार्यवाही केली याचाही बोध होत नाही.

5. स्थायी निर्देश क्रमांक 37 नपप्रसं 1005/ विकासकामे/43/05 दिनांक 3/1/2006 मधील मुद्दा क्रमांक 29,30,31अ अन्वये नामफलकाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

DATSPVM7601 (Ref No : 62, Hmm No : 46)

## *26 थकीत कर वसूली व त्याच्या नोंदीबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 172018000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 172018000.00/-

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियमाप्रमाणे नोंदी नगरपरिषदेने ठेवलेल्या नाहीत.***

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 97 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 नियम 76 नुसार निर्धारण सुची पुर्ण व अधिप्रमाणीत

झाल्यानंतर लगेच नमुना क्र. 47 प्रमाणे मागणी पुस्तक उघडणे आवश्यक असता तसे उघडण्यात आले नाही. व जेथे अनेक प्रभाग असतील तेथे प्रत्येक प्रभागासाठी मागणी पुस्तक ठेवून प्रत्येक प्रभागाच्या मागण्या संकलन व थकबाकी इ. चा गोषवारा काढून नगर परिषद क्षेत्रातील एकूण मागण्या, संकलन आणि थकबाकी निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु तशा नोंदी नगर परिषदेने ठेवलेल्या नाहीत.

2) नगर परिषदेकडून संगणकीय प्रणालीद्वारे कर संकलन सुरु आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 1971 नियम 78(3) अन्वये नमुना क्रमांक 50 अन्वये संकलन पुस्तकांत जमा पावतीचा तपशील नोंदवला पाहिजे व प्रत्येक दिवसाअखेर बेरजा घेतलेल्या पाहिजेत. परंतू नगर परिषदेने नमुना क्र. 49 व 50 मध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत. सदर नोंदी न घेतल्याने व मागणी पुस्तक न ठेवल्याने संगणकीकृत कर संकलन सदोष नसल्याबाबत साधार पुर्तता होणे आवश्यक आहे.

3) सन 2014-15 अखेर करांच्या थकबाकीपोटी एकूण रु. 172018000/- इतकी रक्कम असल्याचे दिसते. नगर परिषद प्रशासन त्याची निदेश क्र. 17 परिपत्रक नपयु 1022/प्र.क्र.122/2002/06 दि. 03 जून 2002 मधील अ.क्र.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे नगर परिषदेच्या उत्त्म आर्थिक व्यवस्थापनासाठी शासनाने लागू केलेल्या उपविधीनुसार सर्व प्रकारची वसुली 100% करावी असे नमूद आहे. त्यामुळे याबाबत योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 105(अ) अन्वये नगर परिषद क्षेत्रातील मोकळया जमिनीचे सर्वेक्षण करुन कर आकारणी करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत साधर पूर्तता होणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग निर्णय क्र. 2008/466/प्र.क्र.167/2008/नवि.32 दि. 5 जून 2010 प्रमाणे भांडवली मुल्याधारित कर आकारणी करण्याबाबत सुचित केले आहे. याबाबत नगर परिषदेने कोणती कार्यवाही केली याबाबत पुर्तता दाखवावी.

6) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 150(अ) प्रमाणे दिलेल्या बीलामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम बील दिल्याच्या दिनांकापासून सदर महिन्याच्या आत भरावयाची आहे. व बीलामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे दुस-या सहामाही कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या 31 डिसेंबर पुर्वी भरावयाची आणि कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे कराची रक्कम विहित मुदतीत भरली नाही तर रक्कम भरावयाच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यांस 2% प्रमाणे शास्तीची आकारणी करुन वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे. मात्र याबाबत सातत्य ठेवणे गरजेचे आहे. व्याज आकारणी पध्दतीमध्ये मानवी हस्तक्षेपास वाव नसल्याबाबत पुर्तता आवश्यक आहे.

7) नगरपरिषदेकडे अग्नीशमन वाहन असल्याने स्थायी निदेश क्र. 31 मधील अनुक्रमांक 25(1) नुसार अग्नीशम व बाकी सेवेच्या व्यवस्थापनासाठी शासन अधिसुचना नगरविकास विभाग क्र. एमयुजी

1089/1288/प्र.क्र. 41/91/नवि.32 दि.01/04/1992 नुसार मालमत्ता कराच्या किमान 2% दराने अग्निशमन कर आकारावा असे नमूद आहे. परंतू याप्रमाणे नगर परिषदेने कार्यवाही केलेली नाही.

8) तसेच न्यायालयीन प्रकरणांमुळे गुंतलेल्या करांच्या रकमांकरीता योग्य ती कार्यवाही करुन वसुलीबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

DATSRCM7001 (Ref No : 64, Hmm No : 97)

## *27 एस.एल. ओ. नोंदवही न ठेवलेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 123 नुसार नमुना नंबर 92 मध्ये एस.एल.ओ. नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क् 98 दि 18/05/2016 अन्वये खालील नमूद आक्षेपाबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे उत्तर प्राप्त् न झालेने खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 123 नुसार नगरपरिषदेने नमुना नं. 92 मध्ये एस एल ओ नोंदवही ठेवणे आवश्यक असून सन 2013-14 च्या लेखापरीक्षण अहवालातील परीच्छेद क्र. 37 मध्ये नमूद करुनही नगरपरिषदेने नोंदवही सादर न केलेने नोंदवही ठेवलेली नसल्याचे दिसून येते. नगरपरिषदेने सर्व विभागांचे एस.एल.ओ. रजिस्टर न ठेवलेने मंजूर पदाप्रमाणे व कार्यरत पदाप्रमाणे वेतन आदा झाल्याबाबत खात्री करता होत नाही. सदर नोदंवही न ठेवल्यामुळे मंजूर कार्यरत पदांचे वेतन दुबार पारीत होऊन यामध्ये अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही आता एस.एल.ओ .नोदंवही ठेवून व त्यामध्ये अद्यावत नोंदी घेवून वेतन देयकाच्या रक्कमा दुबार आदा केल्या नसल्याबाबत लेखापरीक्षणास पुर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

DATMSSM6801 (Ref No : 67, Hmm No : 98)

## *28 आर्थिक स्थितीवरील अभिप्राय.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष :00 न.प.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| ***1. आर्थिक स्थिती समाधानकारक नाही.2. आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.*** |
|---|

सातारा नगरपरिषदेचे सन 2014-15 साठीचे दि. 31/3/2015 चे मत्ता दायित्व विवरणपत्राचे अवलोकन करुन आर्थिक स्थितीबाबत लेखापरिक्षण करता लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 100 दि. 18/05/2016 अन्वये संबंधीत संस्थेस खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करण्यात येत आहेत.

1. प्रथम दर्शनी दायित्वापेक्षा मत्ता रु. 172560572/- ने अधिक आहे. तथापि मत्ता या सदरी शिक्षण व रोजगार हमी कर, एकत्रित कर, विशेष शिक्षण कर, पाणी कर, इमारत भाडे, थकीत घरपट्टीवरील व्याज, वॉरंट फी, नोटीस फी, वृक्ष कर याची एकूण रक्कम रु. 200725391/- येणे असून ती पूर्णत: वसूल झाल्या शिवाय मत्ता म्हणून गणता येणार नाही. तसेच अग्रिम (तसलमात) रु. 3411990/- वसूल होईपर्यंत मत्तेत समाविष्ट करता येणार नाही. याबाबींचा विचार केला असता सकृतदर्शनी दायित्वाचे पारडे जड होत आहे. थकीत रकमांच्या वसुलीस प्राधान्य न दिल्याने नपा निधीच्या दृष्टीने सदर बाब चिंताजनक आहे.

2. नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

- नगरपरिषद करांची"थकबाकी रु. 200725391/- इतकी असून ती 100% वसूल करण्याबाबत अधिनियमातील तरतूदींचा व स्थायी निदेशाचा वापर करुन ठोस कार्यक्रम राबवून 100% वसूली कशी करता येईल याबाबत नगरपालिकेने विशेष लक्ष पुरवून कार्यवाही करावी.
- मोबाईलटॉवरची 100% कर वसूली करुन नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने कार्यवाही करावी.
- संगणक प्रणाली नोंद विसंगतीमुळे जागाभाडे थकीत रक्कम समजू शकली नाही. सदर रक्कम निश्चित करुन वसुलीस प्राधान्य देणे गरजेचे आहे.

3. नगरपालिकेने विविध कारणांसाठी घेतलेल्या कर्जाचे दायित्व रु. 65237062 इतके असल्याने कर्जाचे हप्ते व व्याजापोटी रक्कमा अदा कराव्या लागत आहेत. कर्जाचे दायित्व कमी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

4. नगरपालिकेने चतुर्थ वार्षिक कर आकारणीबाबतची कार्यवाही धिम्या गतीने सुरु ठेवल्याचे दिसते. याबाबत प्राधान्याने कार्यवाही करणे गरजेचे आहे. ज्यायोगे विकास कामे व अन्य कामांकरीता भविष्यात

वाढणा-या खर्चाच्या तुलनेत नियोजन करुन निधी वेळेवर उपलब्ध होण्यास मदत होईल.

5. नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना तोटयात असून सन 2014-15 मध्ये रु. 6384339/- इतका तोटा झालेला आहे. तोटा टाळून योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. यासाठी नगरपालिका हद्दीतील नळ धारकांकडून मीटरद्वारे पाणीपट्टी आकारणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

6. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचा दि. 5/6/2010 च्या अधिसुचनेअन्वये भांडवली मूल्य आधारीत कर आकारणी करणेसाठी प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

7. मक्तेदार / ठेकेदार यांना देयकापोटी देणे रक्कम रु. 4547654/- दर्शविण्यात आली आहे. याबाबत नोंदवही व सविस्तर तपशिलाच्या आधारे थकीत बिलांची रक्कम निश्चित केल्याचे दाखवावे.

8. नगरपरिषद पाणी पुरवठा योजना चालवित आहे. सदर योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून कृष्णा जल उद्धवातून पाणी घेण्यात येते. त्यासाठी आदा करावयाच्या पाणी बिला पोटी रु. 49178645 देणेबाकी असून त्याचे दंडवव्याजाची आकारणी होत आहे. त्यामुळे नगरपरिषदेचे नुकसान होत आहे. ते टाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

9. अग्रीम रक्कम रु. 3411990/- ची वसुली होणेबाकी असून ती त्वरीत समायोजन/वसुली करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

10. नगरपरिषदेच्या गाळे व जमिनी महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1961 तसेच नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील तरतूदीप्रमाणे वेळच्या वेळी भाडयाचे दरात आवश्यक ती वाढ करुन नगर पालिकेचे हित जपून शक्य तेवढे जास्तीत जास्त भाडे वसूल करणे गरजेचे आहे. तसेच गुंठेवारी प्रकरणाची प्रशमन शुल्काची वसूली व विधीयोग्य होणे गरजेचे आहे. नगरपरिषदेने पुरविलेल्या सेवांचे दर वेळच्या वेळी नगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या प्रमाणात वसूल होणेचे उद्दीष्टाने सेवेचे दर ठरवावे. नागरीक/खाजगी व्यक्ती/फर्म यांनी केलेल्या व नगरपरिषदेच्या जमीनी व इतर मत्तेवर केलेल्या कामामुळे नगरपालिकेचे झालेले नुकसान पूर्णत: नगरपरिषदेच्या हित जपण्यासाठी संपूर्ण भरपाई होईल या बाबीकडे काटेकोरपणे तपासणी होणे गरजेचे आहे.

11. सन 2013-14 मधील नगरपालिकेच्या बँक खात्यातील तरल शिलकेपेक्षा सन 2014-15 मध्ये रक्कम रुपये 59159836/- एवढी कमी शिल्लक आहे. तसेच गुंतवणुक (निधी) मधील शिल्लक देखील सन 2013-14 च्या तुलनेत 2014-15 मध्ये रक्कम रुपये 11232240/- एवढी कमी आहे. निधीतून खर्च झालेल्या रकमांपोटी विकासकामे व त्याद्वारे जास्तीत जास्त शाश्वत मत्ता निर्माण होणे आवश्यक आहे.

DATVSDM6301 (Ref No : 68, Hmm No : 100)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

***29 सातारा नगरपालिका हद्दीतील सदरबझार 409/4 नढे मंगल कार्यालयाजवळ पाईप ड्रेन करणे व रस्त्यावर भराव करुन मजबुतीकरण करणे.***

**खासदार निधी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 शास निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 571361.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 546249.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 25112.00/-

***1. WBM, CARPET SEAL COAT च्या कामंची मोजमापे वेगवेगळी आहेत.2. प्रत्यक्ष काम चालू असतांना मोजमापे नोंदलेली नाहीत. 3. कामगार विमा रक्कम कपात केलेली नाही.4. काम पुर्ण प्रमाणपत्रावरील काम पुर्ण दिनांक हा मोजमाप पुस्तकावरील प्रत्यक्ष मोजमाप नोंदल्याचा दिनांक अगोदरचा आहे.***

प्रशासकी मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 473 दिनांक 20/12/2012

तांत्रिक मान्यता - जा.क्र.चिशा 1/तांमं184 दिनांक 24/1/2013

लेखाशिर्ष - खासदार निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - 476000/-

मक्तेदार - श्री. तुकाराम दिगंबर सुतार

कामाचे आदेश दिनांक - 14/10/2013

कामाची मुदत - 60 दिवस काम पुर्ण दिनांक 10/12/2013

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा/ ई टेंडरिंग/ सु.बे./म.स.सं.

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 709 | 25/7/2014 | 571361 | प्रथम/द्वितीय / तृतिय / अंतिम |

उपरोक्त कामांबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 22 दिनांक 26/04/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. मोजमाप पुस्तक क्रमांक 50 पान क्रमांक 284 वरील नोंदींनुसार 578.375 चौरस मीटरचे BBM चे काम केलेले आहे. मोजमाप पुस्तक क्रमांक 70 पान क्रमांक 17 नुसार 475.50 चौरस मीटर चे कारपेट व 487.45 चौरस

मीटरचे SEAL COAT चे काम केलेले आहे. वास्तविक WBM CARPET, SEAL COAT ही कामे एकाच मोजमापात होणे आवश्यक होते. सबब केलेले काम तांत्रिकदृष्टया योग्य असलेचे दाखवावे.

2. सदर काम ड्रेनेज लाईन व डांबरी रस्त्याचे काम असून मोजमाप पुस्तकामध्ये नोंदी घेताना ड्रेनेज लाईन व त्यानंतर रस्त्याच्या कामाची मोजमापे नोंदणे आवश्यक असतांना मोजमाप पुस्तकामध्ये प्रथम रस्त्याची मोजमापे व त्यानंतर ड्रेनेज लाईनची मापे नोंदलेली आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष काम चालू असतांना सदर बाबींची मोजमापे नोंदलेली नाहीत. याबाबत साधार व तांत्रिकदृष्टया खुलासा करावा.

3. संचालक विमा संचालनालय महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक प्रविनि-2310/सांबांवि/विमा वसुली/अभि-3 दिनांक 8/9/2010 नुसार 1 टक्के रक्कम कामगार विम्यापोटी शासनास भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासनास भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 5965/- कामगार विम्यापोटी भरणा केल्याचे दाखवावे.

DATSPVM7601 (Ref No : 2, Hmm No : 22)

### *30 प्रभाग क्रमांक 3 सुखटणकर हॉस्पीटल ते दाजी नलवडे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : रस्ते निधी न.प. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 533535.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 515946.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17589.00/-

***1. गौण खनिज स्वामीत्वधनाची रक्कम कपात करुन शासनास भरणा केलेली नाही.2. सदर काम मुदतीनंतर पुर्ण झालेले आहे.3. देयकातून कामगार विम्याची रक्कम कपात केलेली नाही.4. सदर कामाचया देयकातून कार्यकंत्राट कर कमी कपात केलेला आहे.5. कमी जादा कामाचे विवरणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.***

| | |
|---|---|
| कामाच नांव | प्रभाग क्रमांक 3 सुखटणकर हॉस्पीटल ते दाजी नलवडे घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे. |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती ठराव क्रमांक 583 दिनांक 29/4/2013 |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 442700/- |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र. 39 दिनांक 29/8/2013 |

| | | | |
|---|---|---|---|
| मक्तेदाराचे नांव | श्री. तुकाराम दिगंबर सुतार | | |
| कामाचा आदेश दिनांक | जा.क्र./साशन/सांबां./2182 दिनांक 3/2/2014 | | |
| काम पुर्ण दिनांक | 1/5/2014 कामाची मुदत - 60 दिवस | | |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 75- 2 ते 3 निविदा प्रकार - जाहिर निविदा | | |
| लेखाशिर्ष | रस्ते | | |
| झालेला खर्च | प्र.क्र. व दिनांक | रक्कम | शेरा |
| 586302 | 27-26/6/2014 | 533535 | पहिले व अंतिम देयक |

उपरोक्त नमूद कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 26 दिनांक 06/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. जिल्हा दरसुची सर्वसाधारण टिपणीप्रमाणे ठेकेदाराने प्रत्यक्ष रॉयल्टी भरल्याचे चलन सादर केले तर त्याच्या देयकातून रॉयल्टी कपात करु नये अन्यथा ठेकेदाराच्या देयकातून रॉयल्टी कपात करणे आवश्यक आहे. परंतू सदर कामाच्या ठेकेदाराने रॉयल्टी भरल्याचे चलन सादर न करता गौण खनिज वाहतुकपास जोडलेले आहेत. व त्याआधारे रॉयल्टी माफ केलेली आहे. गौण खनिज वाहतुक पास क्रमांक 143614/- ते 143622 या पासाच्या आधारे प्रति ब्रास 6 ब्रास X 9 = 54 ब्रास X200= 10800 इतकी रक्कम कपात करुन रॉयल्टी पोटी भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 177 नमुना क्रमांक 133 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. व त्यावरील नोंदींनुसार सदर काम दिनांक 1/5/2014 रोजी पुर्ण झालेले आहे. परंतू कामाचे आदेश जा.क्र./सानप/साबां/2182 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 3/2/2014 ने पारीत केलेला असून त्यानुसार दिनांक 3/4/2014 रोजी पुर्ण होणे आवश्यक होते. त्यामुळे सदर काम 28 दिवस उशीरा पुर्ण झालेले आहे. कामाच्या आदेशानुसार ठेकेदारास काम उशीरा पुर्ण झालेबद्दल 28X100 = 2800 रुपये दंडनिय रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक होते.

3. संचालक विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य पत्र क्रमांक प्रविनी-2310/साबांवि/विमा वसुली/अभि-3 दिनांक 8/9/2010 नुसार कामगार विम्यापोटी 1 टक्के कपात शासकीय खाती भरणा करणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 1863/- कपात करुन भरणा केलेली नाही.

4. कार्यकंत्राट अधिनियमानुसार कामाच्या देयकातून कार्यकंत्राट कर 5 टक्के कपात करणे आवश्यक आहे किंवा ठेकेदाराने जर नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडले असेल तर 2 टक्के कपात करणे असे असतांना सदर कामाच्या ठेकेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडलेले नाही व ठेकेदाराच्या देयकातून 2 टक्के कार्यकंत्राट कर कपात केलेला आहे. त्यामुळे सदर कामातून 3 टक्के आयकर 17589/- कपात करणे कार्यकंत्राटकरापोटी भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सोबत व्हॅट सर्टिफिकेट जोडले आहे.

5. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 176 नमुना क्रमांक 132 नुसार कमी जादा कामाचे विवरणपत्र जोडणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

***31 प्रभाग क्रमांक 10 पेठमाची सि.स.नं. 56 अंतर्गत रस्ता कॉंक्रीट करणे व गटर आणि पाईप ड्रेन करणे.***

**खासदार निधी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 रस्ते निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 293823.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 293823.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 14059.00/-

***दंडाची रक्कम वसूल केलेली नाही. माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.अनावश्यक खुदाई केलेली आहे. कामगार विम्यापोटी कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 316 दिनांक 18/9/2012

तांत्रिक मान्यता - एमजेपी जा.क्र.चिशा/तांमं/3333 दिनांक 24/12/2012

लेखाशिर्ष - खासदार निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - 500000/-

मक्तेदार - शैलेशकुमार चंद्रकांत शिंदे

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र. /सानप/साबां/1306 दिनांक 13/9/2013

कामाची मुदत - 60 दिवस काम पुर्ण दिनांक 25/1/2015

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा /सु. बे. निविदेचा दर - 14.98 टक्के जादा

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 1213 | 18/10/2014 | 293823 | पहिले व अंतिम देयक |

उपरोक्तपणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 27 दिनांक 06/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामाकरीता जा.क्र./सानप/साबं/1306 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 13/9/2013 ने कामाचे आदेश पारीत करण्यात आले त्यानुसार सदर कामाकरीता मुदत 60 दिवस देण्यात आली होती. सदर काम मुदतीत पुर्ण न झाल्यास प्रती दिन 100/- रुपये दंड आकारावा असे असतांना महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम

177 नमुना क्रमांक 133 या नमुन्यात काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडले आहे. त्यानुसार सदर काम दिनांक 25/1/2015 रोजी पुर्ण झाले आहे. म्हणजेच सदर काम 75 दिवस उशीराने पुर्ण झालेले आहे. त्यामुळे संबंधीत ठेकेदाराकडून 75X100= 7500/- दंडापोटी वसूल करावेत.

2. कामाचे आदेशातील अटीनुसार कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. मोजमाप पुस्तक क्रमांक 74 पान क्रमांक 65 बाब क्रमांक 1 नुसार संजय घाडगे यांचे घरामागे गटर बांधकामासाठी 13.05 घनमीटर इतकी खुदाई केलेली आहे. परंतू सदर खुदाई केलेल्या जागेवर गटर बांधकाम केल्याची नोंद मोजमाप पुस्तकामध्ये केलेली नाही. त्यामुळे सदर खुदाईवर झालेला खर्च वाया गेला असून आवश्यकता नसतांना केलेल्या खुदाईवर झालेला खर्च 13.05 घनमीटर x 124.23 = 1621 सबंधीतांकडून वसुल करावा.

4. प्रथम धावते व दुसरे अंतिम देयकातून रक्कम रुपये 4938/- कामगार विम्यापोटी कपात करुन शासनास भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATSPVM7601 (Ref No : 4, Hmm No : 27)

## *32 प्रभाग क्रमांक 9 पेठ शनिवार चोरगे घर ते नातूवाडा अखेर रस्ता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : रस्ते निधी शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 376275.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 376275.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 19063.00/-

***1. काम मुदतीत पुर्ण न केल्यामुळे आकारावयाची दंडनीय रक्कम आकारलेली नाही.2. रस्त्याकरीता खुदाई केली असून सदर रस्ता खुदाईची भरावा न करताच रस्त्याचे काम केले आहे.3. कामगार विम्याची रक्कम विमा संचालनालयाकडे भरणा केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 551 दिनांक 21/2/2013

तांत्रिक मान्यता - एमजेपी जा.क्र./चिशा/तांमं/765 दिनाक 30/3/2013

लेखाशिर्ष - रस्ते निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - रुपये 351150/-

मक्तेदार - श्री. राजन शिवाजी खराडे

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/सांबां/1143/दिनांक 14/5/2014

कामाची मुदत - 60 दिवस काम पुर्ण दिनांक 14/5/2014

निविदा प्रक्रिया - सु.बे. निविदेचा दर - 4.99 टक्के जादा

खर्चाचा तपशिल

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 534 | 5/7/2014 | 376275 | अंतिम देयक |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 28 दिनांक 06/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामास कामाचा आदेश जा.क्र./सानप/सांबां/1443 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 14/10/2013 ने राजन शिवाजी खराडे यांना पारीत केला असून अनुक्रमांक 8 नुसार कामाची मुदत 60 दिवस दिलेली असून अनुक्रमांक 9 नुसार काम मुदतीत पूर्ण न केल्यास प्रतिदिन 200/- रुपये दंडाची तरतूद केलेली आहे. सदर कामाच्या नस्तीसोबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 177 नुसार नमुना नंबर 133 मध्ये काम पुर्णत्वाचे दाखल जोडलेले असून त्यावरील नोंदींनुसार सदर काम दिनांक 14/5/2014 रोजी काम पुर्ण झालेले आहे. मे. स्थायी समिती ठराव क्रमांक 1198 दिनांक 21/7/2014 नुसार सदर कामास मुदतवाढ दिलेली आहे. परंतू करारनामा अट क्रमांक 18 नुसार मुदतवाढ हवी असेल तर ठेकेदाराने तसा प्रस्ताव मुदत संपण्यापूर्वी सबळ कागदपत्रांच्यासह नगरपरिषदेस सादर करणे आवश्यक आहे. परंतू ठेकेदाराने तशी मुदतवाढ केलेली नाही. व मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढ मागीतली नसल्याने दिलेली मुदतवाढ ग्राहय धरता येत नाही. त्यामुळे दिनांक 13/12/2013 नंतर दिनांक 14/8/2014 पर्यंत प्रति दिन 100/- रुपये प्रमाणे रक्कम रुपये 153 दिवस X 100 = 15300/- रुपये संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन पूर्तता दाखवावी.

2. सदर कामाच्या देयकातून नियमानुसार 1 टक्के कामगार विम्यापोटी भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 3762 संबंधीतांकडून वसूल करुन कामगार विम्यापोटी भरणा केल्याचे दाखवावे.

DATSPVM7601 (Ref No : 5, Hmm No : 28)

## *33 सदर बझार कॅनॉल ते पारशी अग्यारी ते कत्तलखाना अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**वैशिष्ट्यपूर्ण रस्ते अनुदान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : वै. रस्ते अनुदान शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4808620.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 4794804.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 13816.00/-

***1. शासन निर्णय दिनांक 19/1/2013 नुसार ई निविदा पध्दतीचा अवलंब केलेला नाही.2. सदर कामाची मुदत संपल्यानंतर कामास मुदतवाढ दिलेली आहे. तसेच सुधारीत अंदाजपत्रक करतांना त्याबाबतचा अहवाल पहायला मिळाला नाही. 3. P/L BBM 75MM on WBM without face coat व P/L face coat on the prepared surface heating and spreying bitumeu या बाबींच्या मोजमापांची बेरीज करुन देयक आदा केले आहे. 4. लेखासंहिता नियम 177 नुसार कार्यवाही केलेली नाही.5. स्थायी निदेश क्रमांक 37 नुसार कामाची गुणवत्ता तपासणी केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 224 दिनांक 12/11/2012

तांत्रिक मान्यता - जा.क्र./चिशा/तामं-586 दिनांक 13/3/2013, तांत्रि क मान्यता - जा.क्र./चिशा/तामं-376 दिनांक 6/2/2014

लेखाशिर्ष - वैशिष्टयपूर्ण रस्ते अनुदान

अंदाजपत्रकीय रक्कम - 3281435/- सुधारीत 4633100/-

मक्तेदार - मे. पुनम कन्स्ट्रक्शन, मक्तेदार - पुनम कन्स्क्टशन सातारा

कामाचे आदेश दिनांक - 1464 दिनांक 19/10/2013

कामाची मुदत - 60 दिवस

निविदा प्रक्रिया - जाहिर निविदा

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 541 | 5/7/2014 | 26922661<br>494004 | IST RA BILL<br>IIND RA BILL |
| 1302 | 18/10/2014 | 141302<br>14810481 | IIIRD RA BILL<br>IVTH RA BILL |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 29 दिनांक 06/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती 2012/प्र.क्र.273/19 दिनांक 19/1/2013 नुसार दिनांक 1/2/2013 पासून 10 लाखांवरील कामांसाठी ई निविदा प्रक्रियेचा अवलंब अनिवार्य करण्यात आलेला आहे. परंतू नगरपरिषदेने शासन निर्णयानुसार कार्यवाही केलेली नाही.

2. सदर कामाचा आदेश मे. पुनम कन्स्ट्रक्शन 189 सदरबझार सातारा यांना जा.क्र./सानप/ सांबां /1464 सातारा

दिनांक 19/10/2013 ने पारीत करण्यात आला व सदर कामास 60 दिवसांची मुदत देण्यात आली म्हणजेच 18/12/2013 पूर्वी सदर काम पूर्ण करणे आवश्यक होते. परंतू विशेष सभा ठराव क्रमांक 254 दिनांक 3/1/2014 ने सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 4633100/- चे कामास व खर्चास मंजूर देण्यात आली. परंतू सदर कामाची मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढ देणे आवश्यक होते. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 4633100/- या अंदाजपत्रकीय रकमेस जा.क्र.चिशा/तांमं/3762014 महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग सातारा दिनांक 6/2/2014 ने तांत्रिक मान्यता घेतलेली आहे. परंतू सदर कामास सुधारीत अंदाजपत्रक का करावे लागले याबाबतची कोणतीही कागदपत्रे, अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 177 नमुना क्रमांक 133 काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. परंतू सदर प्रमाणपत्रावर काम कधी पुर्ण झाले याबाबतचा दिनांक नमूद नाही. तसेच मोजमाप पुस्तकामध्ये नोंदलेली मोजमापे दिनांकित नोंदली नसल्याने सदर काम मुदतीत पुर्ण झाल्याची पडताळणी करता आली नाही.

4. स्थायी निदेश क्रमांक 37 मध्ये कामाची गुणवत्ता तपासणीबाबत दिशादर्शक मुद्दे नमूद केलेले आहेत. परंतू नगरपरिषदेने त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे केलेली कामे योग्य गुणवत्तेची असल्याबाबत कोणतेही अभिलेखे नस्तीसोबत नसल्यामुळे त्याबाबतची पडताळणी करता आली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 6, Hmm No : 29)

## *34 प्रभाग क्रमांक 3(अ) सि.स.नं. 196 रविवार पेठ ते 47 पंताचा गोट जुरवे घर ते 13 ब पंताचा गोट अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**दलितवस्ती सुधारणा योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : द व सु योजना शासन निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 839580.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 831184.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 8396.00/-

***1. कामगार कल्याण उपकर कपात करुन शासनास भरणा केलेला नाही.2. लेखासंहिता नियम क्रमांक 175 नुसार कार्यवाही केलेली नाही.3. लेखासंहिता नियम क्रमांक 172 नुसार कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 148 दिनांक 1/8/2012

तांत्रिक मान्यता - जा.क्र./सानप/नगरअभियंता, 145 दिनांक 1/3/2014

लेखाशिर्ष - दलितवस्ती सुधार योजना

अंदाजपत्रकीय रक्कम - 937400/-

मक्तेदार - श्री. विजय आनंदराव पवार

कामाचे आदेश दिनांक - 1068-12/12/2014

कामाची मुदत - 90 दिवस काम पुर्ण दिनांक 30/1/2015

निविदा प्रक्रा - जाहिर निविदा

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 2618 | 27/3/2015 | 839580 | अंतिम बिल |

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 30 दिनांक 06/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामाचे ठेकेदार विजय आनंदराव पवार यांनी व्हॅट प्रमाणपत्र निविदा सादर करतांना निविदेबरोबर जोडलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराच्या देयकातून 5 टक्के व्हॅट कार्यकंत्राटकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून 2 टक्के कार्यकंत्राटकर कपात करुन शासनास भरणा केलेला आहे. त्यामुळे कमी कपात केलेला व्हॅट 3 टक्के रक्कम रुपये 25188/- संबंधीतांकडून वसुल करुन शासनास भरणा केल्याचे दाखवावे.

2. उद्योग उर्जा विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीए-2009/सीआर-108/कामगार-7ए दिनांक 17/6/2010 नुसार 1टक्के कामगार कल्याण उपकर देयकातून कपात करुन कामगार कल्याण उपकर या लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब 1 टक्के रक्कम रुपये 8396/- संबधीतांकडून वसुल करुन शासनाकडे भरणा करावे.

3. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 176 नुसार कामाच्या परीपुर्ततेचा अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 175 नुसार नगरपरिषद अभियंता, मुख्याधिकारी यांनी कामाच्या वेळी कामाच्या ठिकाणी भेटी देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम क्रमांक 172 नुसार नगरपरिषदेने कार्यवाही केलेली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 7, Hmm No : 30)

***35 प्रभाग क्रमांक 10 पेठ मंगळवार संत कबीर सोसायटी व बेडकर घर ते भंडारे घर येथील रस्ता दुरुस्ती करणे.***

00

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.प. निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 244260.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 244260.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8800.00/-

***कामाच्या देयकातून दंडाची रक्कम वसूल केलेली नाही. थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट करुन घेणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - मे. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 1213 दिनांक 21/7/2014

तांत्रिक मान्यता - मा. नगर अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा नगरपरिषद सातारा तांत्रिक मंजूरी क्रमांक 188 दिनांक 21/7/2014

लेखाशिर्ष - नगरपरिषद निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - 244260/-

मक्तेदार - चेअरमन गणेशराज मजूर सहकारी संस्था सातारा काम वाटप समिती पत्र क्रमांक 553 दिनांक 11/8/2014

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/साबां/593/सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 25/8/2014

कामाची मुदत - 90 दिवस काम पुर्ण दिनांक 12/3/2015

निविदा प्रक्रिया - मजूर सहकारी संस्था

खर्चाचा तपशिल -

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 33- दिनांक 07/05/2016 अन्वये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामास कामाचा आदेश जा.क्र./सानप/सांबां/593 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 25/8/2014 पारीत केला असून सदर आदेशानुसार कामाची मुदत 90 दिवस देण्यात आलेली होती. व सदर काम मुदतीत पुर्ण न झाल्यास प्रतिदिन 100/- रुपये दंड करणे असे नमूद केलेले आहे. सदर काम 24/11/2014 पर्यंत काम पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 177 नुसार नमुना नंबर 133 या नमुन्यात काम पुर्ण प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. परंतू त्यानुसार सदर काम 12/3/2015 रोजी पुर्ण झालेले आहे. म्हणजेच सदर काम 88 दिवस उशीरा पुर्ण झाल्यामुळे 88 X 100 = 8800/- दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तरी ठेकेदाराकडून रुपये 8800/- रुपये दंडापोटी वसुल करुन पुर्तता दाखवावी.

2. करारनाम्यातील अटींनुसार ठेकेदाराने थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट करुन घेणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. कामाचे आदेश क्रामंक 12 नुसार ठेकेदाराने कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 8, Hmm No : 33)

### *36 प्रभाग क्रमांक 10 पेठ मंगळवार धस कॉलनी व वडार वस्ती या ठिकाणी रस्ता दुरुस्ती करणेबाबत.*

**रस्त दुरुस्ती**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न प निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 322625.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 322625.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 11600.00/-

| |
|---|
| ***ठेकेदारास दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट करुन घेणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.*** |

प्रशासकीय मान्यता - मे. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 1214 दिनांक 21/7/2014

तांत्रिक मान्यता - नगरपरिषद अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सातारा नगरपरिषद सातारा तांत्रिक मंजूरी क्रमांक 189 दिनांक 21/7/2014

लेखाशिर्ष - न.प.निधी

अंदाजपत्रकीय रक्कम - 446250/-

मक्तेदार - चेअरमन गणेशराज मजूर सहकारी संस्था, सातारा कामवाटप समिती पत्रक क्रमांक 554 दिनांक 11/8/2014

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/सांबां/594 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 25/8/2014

कामाची मुदत - 90 दिवस काम पुर्ण दिनांक 20/3/2015

निविदा प्रक्रिया - मजूर सहकारी संस्था , निविदेचा दर - अंदाजपत्रकीय दराने

उपरोक्त कामाबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 34 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. सदर कामास जा.क्र./सानप/सांबां/594 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 25/8/2014 ने कामास आदेश पारीत केला असून सदर कामास 90 दिवस मुदत देण्यात आली होती. म्हणजेच सदर काम 24/11/2014 रोजी पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 1971 नियम 177 नुसार नमुना नंबर 133 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले असून त्यानुसार सदर काम दिनांक 20/3/2015 रोजी पुर्ण झाले आहे. सदर कामास कोणतीही मुदतवाढ देण्यात आलेली नाही. त्यामुळे उशीरा काम पुर्ण केल्यामुळे ठेकेदारास करारनामा व कामाच्या आदेशानुसार 116 दिवस X 100/- = 11600/- ठेकेदारास दंड आकारणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तरी ठेकेदाराकडून रक्कम रुपये 11600/- वसुल करावेत.

2. करारनाम्यातील अटींनुसार ठेकेदाराने थर्ड पार्टी टेक्नीकल ऑडीट करुन घेणे आवश्यक असतांना ठेकेदाराने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4. कामाचे आदेश क्रामंक 12 नुसार ठेकेदाराने कामाच्या ठिकाणी माहितीदर्शक फलक लावणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 9, Hnm No : 34)

## *37 चांदणी चौक ते मंगळवार तळे रस्ता डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : रस्ते शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 4264349.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 4264349.00/-

***सदर कामाकरीता ई निविदा कार्यप्रणालीचा वापर केलेला नाही. वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. माहीतीदर्शक फलकाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 259 दिनांक 12/11/2012

तांत्रिक मान्यता - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग जा.क्र./चिशा/तांमा/586 दिनांक 13/3/2013

अंदाजपत्रकीय रक्कम - 3678450/-

मक्तेदार - ए. एस. देसाई

कामाचे आदेश दिनांक - जा.क्र./सानप/साबां/1500 दिनांक 30/10/2015

कामाची मुदत - 60 दिवस काम पुर्ण दिनांक 9/5/2015

खर्चाचा तपशिल

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 595 | 9/7/2014 | 4264349 | प्रथम देयक |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे चांदणी चौक ते मंगळवार तळे अखेर रस्ता डांबरीकरण कामाकरीता प्रथम धावत्या देयकाद्वारे रुपये 4264349/- इतका खर्च केलेला आहे. यावरी लेखापरीक्षण लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 47 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16 जानेवारी 2013 नुसार 10 लाख किंवा त्यापेक्षा अधिक मुल्यांच्या निविदांसाठी/कामांना ई निविदा कार्यप्रणाली लागू केलेली आहे. परंतू सदर कामाकरीता ई निविदा कार्यप्रणालीचा वापर केलेला नाही.
2.सदर कामाकरीता Type Estimate for 100sqm चा वापर केलेला आहे. वास्तविक नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 158, स्थायी निदेश क्रमांक 37 क्रमांक नपप्रसं1005/विकास कामे/43/05 दिनांक 3 जानेवारी 2006 सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/प्र.क्र.65/रस्ते 1 दिनांक 11/6/2004 मधील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कामाकरीता वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. मुख्याधिकारी नगरपरिषद सातारा यांचे पत्र जा.क्र.सानप /साबां/748 दिनांक 23/9/2014 अन्वये कार्यकारी अभियंता, मजिप्रा जलव्यवस्थापन विभाग, सातारा यांना सदर कामाच्या मूळ अंदाजपत्रकास रुपये 3678450/- सुधारीत अंदाजपत्रक रुपये 6275565/- सुधारीत मान्यता देण्याबाबत कळविले आहे. क्षेत्रीय परिस्थिती नुसार संकल्पनामध्ये बदल झाल्याने सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी मागविली आहे. परंतू पुढील पत्रव्यवहार अंदाजपत्रक नस्तीसोबत नाही. सुधारीत मान्यतेसह पुर्तता दाखवावी.
3.सदर कामाकरीता माहीतीदर्शक फलकाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

DATSPVM7601 (Ref No : 17. Hmm No : 47)

## *38 वाहन वापरावरील इंधन व देखभाल व दुरुस्ती खर्चाबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.पा. निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 218632.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 218632.00/-

***वाहन देखभाल दुरुस्तीवर मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाला आहे. वाहन इंधनावर मर्यादेपेक्षा जादा खर्च झाला आहे. वाहन जिल्हयाबाहेर फिरतीसाठी वापरले आहे.***

लेखापरीक्षण कालावधीत सन 2014-15 मध्ये एम.एच.11 ए.बी.1001 वर खालीलप्रमाणे इंधन व दुरुस्ती खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

अ- देखभाल दुरुस्तीवरील खर्च

| अ.क्र. | वाहन क्रमांक | दुरुस्ती खर्च | मर्यादा | जादा खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 1001 | 73697 | 25000 | 48697 |
| 2 | 1000 | 40366 | 25000 | 15366 |
| एकुण | | | | 64063 |

ब- इंधन खर्च

| अ.क्र. | वाहन क्रमांक | इंधन खर्च | मर्यादा | जादा खर्च (लिटर) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1001 | 3143 लिटर | 1200 लिटर | 1943 |
| 2 | 1000 | 1564 लिटर | 1200 लिटर | 364 |
| | | | | 2307 |

याबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 92 दिनांक 19/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालय क्रमांक नप्रस/वाहन धोरण/201/2004/प्र.क्र.05/9 दिनांक 10/5/2005 तसेच नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निर्देश क्रमांक 32 मधील 16 नुसार अध्यक्ष व मुख्याधिकारी यांना नगरपरिषदेने उपलब्ध करुन दिलेली देखभाल व दुरुस्तीसाठी वा वाहन सुस्थितीत ठेवणेसाठी प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्षी रक्कम रुपये 25000/- पर्यंत खर्च मर्यादा घालून दिलेली असतांना नगरपालिकेने उपरोक्तपणे रक्कम रुपये 64063/- इतका जादा खर्च झाला आहे. याबाबत साधार खुलासा करावा. अन्यथा स्थायी निर्देश क्रमांक 32 अनुक्रमांक 17 नुसार रक्कम वसुलात आणावी.

2. नगरपरिषद संचालनालयाचे सुधारणा परिपत्रक क्रमांक नप्रस/वाहन धोरण/2005/प्र.क्र.05/09 दिनांक 18/8/2005 दिनांक 29/8/2005 व दिनांक 3/5/2006 तसेच स्थायी निर्देश क्रमांक 32 मधील अट क्रमांक 7(2) अ वर्ग नगरपालिकेच्या अध्यक्ष, मुख्याधिकारी यांच्या अखत्यारीतील प्रत्येक वाहनासाठी इंधनाची मर्यादार प्रति महिना 100 लिटर इतकी ठरवून देण्यात आली आहे. त्याची उपरोक्त तपशिलानुसार दोन्ही वाहनांवर मर्यादेपेक्षा 2307 लिटर इतके इंधन जादा वापरणेत आले आहे. जादा इंधन वापराबाबत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांची मान्यता घेतलेली नाही. याबाबत साधार खुलासा करुन आता कार्योत्तर मान्यता घेऊन दाखवावी. व जादा इंधनावरील रुपये 67/- प्रती लिटरप्रमाणे रक्कम रुपे 154569/- वसुलात आणावी.

3. स्थायी निर्देश क्रमांक 32 अ.क्र. 18 नुसार जिल्हयाबाहेरील दौ-साठी वाहन वापरात येऊ नये असे स्पष्ट नमूद असतांना जिल्हयाबाहेरील वाहनांची फिरती झालेचे लॉगबुकावरुन दिसून आले. याबाबत साधार खुलासा करावा व आता सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन पुर्तता दाखवावी.

DATSGKM6501 (Ref No : 28, Hmm No : 92)

## *39 शहापूर योजना बिगरसिंचन पाणीपट्टी भरणा करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 744407.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 744407.00/-

***बिगरसिंचन पाणीपट्टी मध्ये विलंब आकार व विलंब आकार दंड आकारणी केलेली आहे.***

महाराष्ट्र शासनाने पाटबंधारे प्रकल्पाचे व्यवस्थापनाकरीता दुरुस्तीकरीता, व सुस्थिती राखणेकरीता शेतीशिवाय पाणी वापराकरीता बिगरसिंचन पाणीपट्टी आकारली आहे.

सातारा शहरास कण्हेर पाटबंधारे विभागाअंतर्गत शहापूर योजनेमधून पाणी पुरवठा केला जातो सन 2014-15 मध्ये यापोटी एकूण रुपये 744407/- एवढी बिगरसिंचन पाणीपट्टी भरणा केली आहे. याबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 87 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. कण्हेर पाटबंधारे उपविभाग क्रमांक 1 सातारा यांचे जा.क्र.कपविक्र/1/दका/781/2015 अन्वये रुपये 271407/- माहे फेब्रुवारी 2015 अखेरचे देयक पाठविले आहे. याच्या तपशिल नगरपालिका जा.क्र. 329/दिनांक 14/3/2015 अन्वये मागणी केली असता कण्हेर पाटबंधारे उपविभाग यांनी दिनांक 12/3/2015 चे पत्रानुसार पुढीलप्रमाणे तपशिल कळविला आहे.

| अ.क्र. | तपशिल | मागील थकबाकी दिनांक 31/1/2015 पर्यंत | माहे 2/2015 चे बिल | एकूण एकंदर |
|---|---|---|---|---|
| 1 | पाणीपट्टी | 59382 | 33075 | 92457 |
| 2 | लेट फी | 8680 | 1586 | 10266 |
| 3 | स्थानिक कर | 13230 | 6615 | 19845 |
| 4 | पेनल्टी चार्जेस | 99226 | 42613 | 148839 |
| एकूण | | 180518 | 83889 | 271407 |

याबाबत खालीलप्रमाणे भरणा केला आहे.

| अ.क्र. व दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|
| 1- 31/3/2015 | 71542 | बिगरसिंचन पाणीपट्टी माहे 2/15 देयक भरणा |
| 2- 31/3/2015 | 199865 | बिगरसिंचन पाणीपट्टी माहे 2/15 देयक भरणा |
| एकूण | 271407 | |

सदर तपशिल पहाता लेट फी पोटी 10266/- व पेनल्टी चार्जेस, विलंब आकार रुपये 148839/- इतका आकारला आहे. सदर देयक ई जलसेवा या ऑनलाईन प्रणालीद्वारे तयार व वितरीत झाले आहे.

2. नगरपरिषदेने अर्थसंकल्पीय अंदाज सन 2014-15 नमुना 4अ नुसार अ.क्र. 3 अन्वये रुपये 500000/- व अ.क्र. 4 अन्वये 500000/- असे एकूण रुपये 1000000/- एवढी तरतूद केली आहे. सन 2014-15 मध्ये बिगरसिंचन

पाणीपट्टी रुपये 744407/- भरणा केला आहे. म्हणजे तरतूदीपेक्षा कमी खर्च झाला आहे. असे असतांना उपरोक्त माहे 2/2015 देयकामध्ये सदर पाणीपट्टी उशिरा भरणा केल्याने विलंब आकार व विलंब आकार दंड यापोटी रक्कम आकारली किंवा अन्य कारण आहे यबाबत पुर्तता आवश्यक आहे.

DATMVJM7001 (Ref No : 33, Hmm No : 87)

## *40 शहापूर पंपींग स्टेशन मधील 150 एच.पी. मोटार व पंपसेट दुरुस्ती करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 186924.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 182552.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1372.00/-

***1. दर आकारणीबाबत आधार नमूद नाही.2. तातडीने करावयाचे काम असतांना जाहीर निविदा प्रसिध्दी व तांत्रिक मंजूरी मागणी या बाबत विलंब केला आहे. ठेकेदार कामाकरीता तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत कागदपत्रे नाहीत.***

कामाचे नांव - शहापूर पंपींग स्टेशन मधील 150 एच.पी. मोटार व पंपसेट दुरुस्ती करणेबाबत.

प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 1097 दिनांक 28/2/2014

अंदाजपत्रकीय रक्कम - 174614/-

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता मजिप्रा. जलव्यवस्थापन, सातारा क्रमांक 2123 दिनांक 28/8/2014

मक्तेदाराचे नांव - सातार इलेक्ट्रीक, सातारा

कामाचा आदेश दिनांक - क्रमांक सानप/143 दिनांक 30/8/2014

कामाची मुदत - 10 दिवस

मोजमाप पुस्तक क्रमांक 72 पान क्रमांक 96

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| 1372-20/10/2014 | 183924 | |

याबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 86 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. उपरोक्त कामास स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 1097 दिनांक 28/2/2014 अन्वये मंजूरी दिली आहे. तथापि जाहीर निविदा प्रसिध्दी दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रात दिनांक 2/7/2014 रोजी म्हणजेच 4 महिने विलंबाने प्रसिध्द केली आहे.
नगरपरिषदेने तांत्रिक मंजूरी मिळणेबाबत क्रमांक 137 दिनांक 25/8/2014 अन्वये कार्यकारी अभियंता, मजिप्रा सातारा यांना तांत्रिक मान्यता मिळणेबाबत मागणी केलेली आहे. मोटर व पंपसेट दुरुस्तीबाबतच्या टिपणीनुसार सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे. असे असता वर नमूद केलेल्या विलंब व विसंगतीबाबत कारण नमूद करणे आवश्यक आहे.
2. सदर काम मोटर पंप दुरुस्तीचे असल्याने मजिप्रा कडील मान्यता प्राप्त कंत्राटदार असणे आवश्यक आहे. तथापि प्राप्त 3 निविदा पहाता, सदर कंत्राटदार हे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार असन त्यांची पदवी/पदविका पहाता स्थापत्य शास्त्रातील पदविकाधारक आहेत. असे असता त्यांच्या निविदा सदर कामासाठी ग्राहय धरणे ही बाब अनुचित झाली आहे.
3. प्राप्त निविदाधारकांची कागदपत्रे पहाता निविदा शर्ती कामाचा अनुभव असलेली कागदपत्रे जोडलेली नाहीत. मजिप्रा यांचेकडील अंदाजपत्रकामध्ये बाब क्रमांक 3,4,5,8,9,10 व 11 या बाबींचे जिल्हा दरसुचीतील दर नमूद केलेले नाहीत. नमूद केलेल्या दरांचा आधार काय आहे हे नोंदविले नाही. त्यामुळे त्याबाबीपोटी दर्शविलेला खर्च विशेषत: बाब क्रमांक 3 removing at old Burnt wire.... etc हे काम Job Work आहे यासाठी रक्कम रुपये 75000/- आकारले आहेत. या दराचा जिल्हा दरसूची पृष्ठ क्रमांक, बाब क्रमांक असा आधार नोंदविलेला नसल्याने योग्य असल्याचे म्हणता येत नाही.
4. अंदाजपत्रकातील बाब क्रमांक 3 removing and dismantling of HP WLVT pump etc. या बाबीकरीता दर रुपये 7322.25 नमूद केला आहे. मात्र मोजमाप पुस्तक पान क्रमांक 96 वर रुपये 8694.42 नमूद केला आहे. त्यामुळे जादा आदा रुपये 1372.17 जादा आदा झाले आहेत.
5. नस्तीसोबत काम पुर्ण झालेबाबत प्रतिवृत्त जोडलेले नाही. त्यामुळे मोटार दुरुस्तीचे काम विहीत वेळेत व योग्यरित्या पूर्ण झाले असलेबाबत प्रमाणीत होत नाही.

DATMVJM7001 (Ref No : 34, Hmm No : 86)

## *41 करांची मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***कर मागणी नोंदवही ठेवलेली नाही. नगरपालिका लेखासंहिता 1971 नमूना नं 47 प्रमाणे मालमत्ता करांची मागणी नोंदवही ठेवलेली नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र. 99 दिनांक 18/05/2016 अन्वये खालील परीच्छेदांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971नियम 76 नुसार निर्धारण सुची पुर्ण व अधिप्रमाणित झाल्यानंतर लगेच नमूना क्र. 47 प्रमाणे मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे जेथे अनेक प्रभाग असतील तेथे प्रत्येक प्रभागासाठी मागणी पुस्तक ठेवून प्रत्येक प्रभागाच्या मागण्या संकलन व थकबाकी इ.चा गोषवारा काढून नगरपरिषद क्षेत्रासाठी एकूण मागण्या , संकलन आणि थकबाकी निश्चित करावे ,असे असताना नगरपरिषद सातारा .यानी नमूना क्र 47 प्रमाणे मागणी नोंदवही ठेवलेली नाही. सदर बाब नियमबाहय असून नोंदवही न ठेवल्यामुळे आर्थिक नुकसान होत असणेची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता नियम 78 (3) अन्वये नमूना क्र .50 प्रमाणे संकलन पुस्तकात प्रत्येक जमा पावतीचा तपशील नोंदवला पाहीजे .त्यानुसार प्रत्येक दिवसाअखेर बेरजा घेणे आवश्यक असून नगररिषद सातारा यांनी नमूना क्र 49 व 50 ठेवलेले नाहीत. नगरपरिषदेने सध्या संगणकीकृत कर संकलन सुरु केले आहे. तथापि, उपरोक्त नोंदवहया अभावी करांची मागणी ,वसूली व थकाबाकी परिगणनेबाबत सत्यता पडताळता आली नाही.

2. तसेच ज्या वित्तीय वर्षापासून संगणकीकृत नोंदी ठेवल्या आहेत. त्या वर्षातील सर्व करांच्या मागणी नोंदवहीतील सर्व नोंदी संगणकीकृत अज्ञावलीमध्ये समाविष्ट केल्या असल्याबाबत व कोणतीही नोंद नोंदणेची राहिली नसल्याबाबत मुख्याधिकारी यांनी प्रमाणीत करणे आवश्यक आहे.

सबब मागणी नोंदवहीअभावी संगणकीकृत मागणी, वसुली, थकबाकी यामध्ये तफावत नसलेबाबत पुर्तता दाखवावी.

DATSRCM7001 (Ref No : 40, Hmm No : 99)

## 42 प्रलंबित तसलमात रकमांबाबत.

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 09**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3369729.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3369729.00/-

***संस्था, व्यक्ती, कार्यालयीन कर्मचारी यांना तसलमात रकमा आदा केल्या असून त्या वसुली अथवा समायोजन केलेल्या नाहीत.***

नगरपालिका साताराचे सन 2014-15 चे लेखापरीक्षण करतेवेळी तसलमात नोंदवही नमुना नंबर 147 ची पडताळणी करता सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्रमांक 6 मध्ये नमूद केलेप्रमाणे दिनांक 31/3/2015 अखेर नगरपालिकेने एकूण रक्कम रुपये 3369729/- इतक्या तसलमात रकमेची वसुली अथवा समायोजन होणे बाकी आहे.

याबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 76 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. तसलमात नोंदवही नमुना नंबर 147 ची पडताळणी करता सन 1951 पासून तसलमात रकमा येणे बाकी आहे अथवा समायोजन होणे बाकी आहे. तरी मागील लेखापरीक्षण अहवालाबाबत अभिप्राय नोंदवूनही नगर पालिकेने सदर तसलमात रकमा वसुल करणेबाबत कुठली ठोस कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. याबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

तसेच तसलमता रकमा वेळीच वसुल न केल्याने नगरपालिकेचा मोठया प्रमाणावर निधी नाहक अडकून पडला आहे. त्यामुळे नगरपालिकेचे त्या रकमेवरचे व्याजाचे नुकसान होत आहे. तरी आता तसलमात रकमा वसुलीबाबत व्याजाची अथवा दंडाची कार्यवाही करुन प्रलंबित तसलमता रकमा वसुल करणेत येऊन पुर्तता दाखवावी.

2. नोंदवहीचे अवलोकन करता दिनांक 19/6/1975 ला पब्लिक हेल्थ डिव्हीजन यांचे नांवे रक्कम रुपये 25000/- इतकी तसलमात दिसून येते. याबाबतचा तपशिल नोंदवहीवर नमूद नाही. तसेच वसुलीबाबत पत्रव्यवहार केलेला नाही. खुलासा करुन वसुलात आणलेबाबत कार्यवाही केलेबाबतची पुर्तता होणे आवश्यक आहे.

3. तसलमात रकमेपैकी दिनांक 18/4/1991 ला रक्कम रुपये 40000+60000 असे एकूण रुपये 100000/- तसलमात सागर एजन्सीज होजपाईप पुरविणेसाठी अदा करणेत आली आहे. तथापि सदर काम केले किंवा नाही याबाबत कागदपत्रे तसेच मोजमाप नोंदवही उपलब्ध नाही. तरी याबाबत खुलासा करुन कागदपत्रे मोजमाप नोंदवही उपलब्ध करुन खर्चाची खात्री पटवून समायोजन करणेत यावे. अथवा रक्कम वसुलात आणलेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4. दिनांक 10/9/2002 रोजी रक्कम रुपये 62790/- इतकी तसलमात जिल्हा सैनिक कल्याण यांचे नावे दिसून येते तरी सदर तसलमात रक्कम वसुल करणेबाबत अथवा समायोजनाबाबत कार्यवाही का केली नाही खुलासा करुन कागदपत्राआधारे वसुल अथवा समायोजन केलेली पुर्तता होणे आवश्यक आहे.

5. नोंदवहीत नमूद केलेप्रमाणे दिनांक 25/11/1999 रोजी प्रवास भत्त्यापोटी रक्कम रुपये 19400/- सेल्फ या

नावे नोंद असून सदर रकमेचे अद्याप समायोजन झालेले नाही. तसेच सदर तसलमात रक्कम कोणास आदा झाली याबाबत उल्लेख नाही. खुलासा करुन कागदपत्रांआधारे संबंधीतांकडून तसलमात रक्कम वसुलात आणावी.

6. दिनांक 7/8/1999 ला रुपये 21967/- स्टेट बँकेला आयकर, कोणत्या कालावधी व कशाची आयकर रक्कम भरणा केलेबाबतचा तपशिल नसलेबाबत खुलासा करुन आता कागदोपत्री खुलासा करुन स्टेट बँकेत भरणा केलेची पुर्तता होणे आवश्यक आहे.

7. माजी मुख्याधिकारी नगरपालिका सतारा यांना तातडीची वैद्यकीय मदत म्हणून रक्कम रुपये 100000/- दिनांक 9/12/2004 रोजी आदा करणेत आली आहे. तथापि लेखापरीक्षण कालावधीअखेर रकमेचे समायोजन अथवा वसुली करणेत आलेली खुलसा करुन याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.

8. दिनांक 31/3/2011 रोजी रक्कम रुपये 50000/- इतकी तसलमात रक्कम डॉ. आंबेडकर जयंती साजरी करणेकामी श्री. किरण रामचंद्र गाडे यांना आदा करण्यात आली असून त्यांचे वसुली अथवा समायोजन का करण्यात आले नाही. याचा साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

9. मुळातच नगरपालिका आस्थापनेवर नसतांना त्रयस्थ व्यक्ती अथवा संस्था यांना तसलमात रकमा काय आधारे आदा केलेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. आता सदर रकमा वसुलात आणून पुर्तता दाखवावी.

DATSGKM6501 (Ref No : 50, Hmm No : 76)

## *43 प्रभाग क्रमांक 2 राजू शेळके घर ते होमगार्ड अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : खासदार निधी शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 462000.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 427400.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 34600.00/-

***कामास मुदतवाढ दिली नाही. त्यामुळे विलंबापोटी दंड आकारणी करणे आवश्यक आहे. मोजमाप पुस्तक उपलब्ध केले नाही. साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही. नियमाप्रमाणे फेरनिविदा मागविल्या नाहीत.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग क्रमांक 2 राजू शेळके घर ते होमगार्ड अखेर रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशासकीय मान्यता | मे. स्थायी समिती ठराव कमांक 411 दिनांक 20/12/2012 रुपये 462000/- | | |
| अंदाजपत्रकीय रक्कम | 500000/- | | |
| तांत्रिक मान्यता | जा.क्र.चिशा/तांमं/184 मजिप्रा व्यवस्थापन विभाग दिनांक 24/1/2013 | | |
| मक्तेदाराचे नांव | श्री. सुरज प्रभाकर जगतप | | |
| कामाचा आदेश दिनांक | जा.क्र./यसपजव/साबां/1986 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 18/1/2014 | | |
| काम पुर्ण दिनांक | 27/2/2015 कामाची मुदत - 60 दिवस | | |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 80/21-22 निविदा दर 10.80 टक्के जादा दर | | |
| लेखा शिर्ष | खासदार निधी | | |
| झालेला खर्च | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | शेरा |
| | 2757-31/3/2015 | 462000 | Ist and final |

उपकर कामाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 38 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर कामास कामाचा आदेश जा.क्र./सानप/साबां/1986 सातारा नगरपरिषद सातारा दिनांक 18/1/2014 ने पारीत केला असून सदर कामास 60 दिवस इतकी मुदत देण्यात आली होती. सदर काम मुदतीत पुर्ण न झाल्यास प्रती दिन 100/- रुपये इतका दंड करण्यात येईल असे कामाच्या आदेशात नमूद केलेले आहे. त्यामुळे सदर काम दिनांक 18/3/2014 पर्यंत पुर्ण होणे आवश्यक होते. परंतू त्याप्रमाणे काम पुर्ण न होता सदर काम, काम पुर्ण प्रमाणपत्रानुसार दिनांक 27/2/2015 रोजी पुर्ण झाले आहे. त्यामुळे सदर काम 346 दिवस उशीरा पुर्ण झाले आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांखस-2008/प्र.क्र.256/08/उद्योग 4 दिनांक 10 ऑक्टोबर 2008 नुसार कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये. अपवादात्मक परिस्थितीत सक्षम प्राधिकरणाच्या मते करारास मुदतवाढ देणे अत्यावश्यक असेल तर त्याबाबत स्पष्ट कारणे नमूद करुन तसेच शासन कार्यनियमावली नुसार संबंधीत विचार विनिमय केल्यानंतर योग्य ती कार्यवाही करावी असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नसल्यामुळे त्याबद्दल ठेकेदारास 346X100=34600/- दंड आकारणे आवश्यक होते. परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 34600/- ठेकेदाराकडून दंडापोटी वसुल करावेत.

2) सदर कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक 80 लेखापरीक्षणास उपलब्ध केले

नाही.

3) नगरपरिषद संचालनालय स्थायी निर्देश क्रमांक 35 दिनांक 21/10/2005 नुसार कामाचा दर्जा तपासण्याकरता वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.
4) नगरपरिषद संचालनालयाचे स्थायी निदेश क्रमांक 36 दिनांक 29/12/2005 मधील अट क्रमांक 45 नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदांना मंजूरीची शिफारस न करता फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

DATRBBM8201 (Ref No : 61, Hmm No : 38)

## *44 कर वाढ व घट नोंदवहीबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता 1971 चे नियम 75 अन्वये विहीत केलेला नमूना 46 ठेवणे आवश्यक असून इमारत/मिळकतीमध्ये झालेली वाढ किंवा घट दर्शवणे व तशा नोंदी घेणे आवश्यक असताना कर विभागाने तशी नोंदवही ठेवलेली नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र 95 दिनांक 18/05/2016 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही , त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप नमूद करणेत येत आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद अनिधियम 1965 चे कमल 123 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही कारणाने मागणीमध्ये झालेला प्रत्येक बदल महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता 1971 चे नियम 75 अन्वये विहीत केलेला नमूना 46 ठेवणे आवश्यक असून इमारत/मिळकतीमध्ये झालेली वाढ किंवा घट दर्शवणे व तशा नोंदी घेणे आवश्यक असताना कर विभागाने तशी नोंदवही ठेवलेली नाही.त्यामुळे सन 2014-15 मध्ये वाढ घट किती झाली हे समजून येत नाही.त्या अभावी कररचना सदोष असलेचे नाकारता येत नाही.

2. शहर विकास विभाग नगरपरिषद सातारा यांचेकडील पत्र क्र. 3/559 ,4/558 ,4/557 दि.19/9/14 व पत्र क्र .504 दि.28/8/14 अन्वये विभागाने सन 2010 ते 2014 अखेर ज्या मिळकत धारकांना भोगवटा प्रमाणपत्र मंजूर केले आहे. त्यांचा तपशील वसूली विभागाला कळविला आहे. त्यामध्ये सन 2011-12, 2012-13, 2013-14 मध्ये भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे नमूद केले आहे. ज्या वर्षी बांधकाम पुर्ण झाले आहे त्यावेळी तात्काळ याबाबत शहर विकास विभागाने कळविणे आवश्यक होते तथापि त्याप्रमाणे कळवलेले नाही. उशीरा कळविल्याने सदर बांधकाम इमारतीवर कर आकारणीसाठी विलंब होवून नगर पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

DATSNKM7001 (Ref No : 65, Hmm No : 95)

***45 जाहिरात कराबाबत.***

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 91552.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 91552.00/-

***नगरपरिषद (जाहिरात कर) नियम 1970 चे कलम 12(1) ते (ह) प्रमाणे तपशिलवार व वर्गवारी प्रमाणे जाहिरातींच्या बाबीप्रमाणे नोंदी घेतलेल्या नाहीत. थकबाकी वसूली करणे आवश्यक आहे.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्र 96 दि 18/05/2016 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते मात्र संबंधीत संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही नमूद आक्षेप खालीलप्रमाणे त्यामुळे . .आहे येत करणेत

सन 2014-15 करीता नगरपरिषद सातारा यांचेकडील जाहिरात कर विभागाकडील नोंदवहयांची पडताळणी करून त्यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1) नगरपरिषद (जाहिरात कर) नियम 1970 चे कलम 12(1) (अ) ते(ह) प्रमाणे तपशीलवार व वर्गवारी प्रमाणे जाहिरातींच्या बाबीप्रमाणे नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापी जाहिरात नोंदवही नमुना 57 मधील नोंदी पाहता याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे जाहिरात कर नियम 3 ची अनुसुची प्रमाणे विहीत पदधतीने कर आकारणी केल्याबाबत पुर्तता होणे आवश्यक आहे.
2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1970 नियम 86 (1) (2) अन्व्ये नगरपरिषद ने नमुना 57

नमुना 58 ठेवलेला आहे.परंतु नोंदवहया मधील नोंदी सक्षम प्रधिकारी /मुख्याधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत.

3) जाहिरात कर मागणी नोंदवही न.न 58 नुसार एकूण 904 जाहिरात दार आहेत मात्र नोंदवही न.न 57 पान क्र. 43 वरील अंतिम नोंदीनुसार 238 जाहिरात दार आहेत तफावतीबाबत ताळमेळ घेवून पुर्तता करावी
4) जाहिरात कर नियम 1970 नियम 7 व 8 प्रमाणे अनधिकृत जाहिरातदारांवर कार्यवाही केल्याची आढळले नाही.
5) सन 2014-15 अखेर जाहिरात करापोटी असलेली थकबाकी रक्कम रुपये 91552/- वसुल करणेबाबत प्राधान्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.
6) नगरपरिषद लेखासंहिता नियम 86 (2) अन्व्ये जाहिरात कर मागणी पुस्तक नियम क्र. 76 मध्ये विहित केल्याप्रमाणे ठेवणे आवश्यक असताना त्या प्रमाणे नोंदी घेतलेल्या नाहीत

उपरोक्त् मुददा क्र.1ते 6 बाबत साधार पुर्तता करून कर आकारणी योग्य् असल्याबाबत खात्री पटवावी.

DATSRCM7001 (Ref No : 66, Hmm No : 96)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

निरंक

# भाग दोन

## सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

### *46 कार्यादेश पुस्तक (नमुना नंबर 23) न ठेवलेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 150(2) प्रमाणे नगरपरिषदेचे कार्यादेश पुस्तक नमुना नंबर 123 मध्ये ठेवलेले नाही.***

लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 53 दिनांक 07/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 150(2) प्रमाणे नगरपरिषदेचे कार्यादेश पुस्तक नमुना नंबर 123 मध्ये ठेवले जाते व त्यामध्ये नगरपरिषदेच्या वेगवेगळया विभागांकडून मिळालेल्या कामांच्या अंमलबजावणीसंबंधात सर्व आदेशांची अनुक्रमाने नोंद करण्यात येते व मिळालेल्या आदेशासंदर्भात देयके तयार करणेत येतात. नगरपरिषद सातारा यांनी अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही. याबाबत समर्पक खुलासा सादर करावा व विहीत नमुन्यातील अद्यावत नोंदवही ठेऊन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

DATSPVM7601 (Ref No : 20, Hmm No : 53)

### *47 थकीत लेखापरीक्षण आक्षेपांबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 शासन/नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***सन पासून ते सन 2014-15 अखेर एकूण आक्षेप प्रलंबित आहेत या प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन मंजूरीसाठी सादर करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.***

उपरोक्त बाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 50 दिनांक 10/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद वित्तीय वर्ष सन 2014-15 मध्ये मागील लेखापरीक्षण अहवालाचे अवलोकन केले असता, सन 1972-73-74 पासून सन 2013-14 अखेर एकूण 557 आक्षेप प्रलंबित असल्याचे दिसून आले.
2. सदरचे थकीत आक्षेप निकाली काढण्यासाठी नगरपरिषदेने कार्यवाही सुरु ठेवली आहे. असे असले तरी त्यात सातत्य ठेऊन थकीत परिच्छेदांचे प्रमाण कमी करणे गरजेचे आहे.
3. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 ( सुधारणा 2011) चे कलम 10(1) मधील तरतुदीनुसार वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे.
4. नगरपरिषद यांचे उपरोक्त थकीत परिच्छेदांमध्ये काही गंभीर स्वरुपाचे आक्षेप समाविष्ट असून त्यामध्ये मोठया प्रमाणात रक्कम गुंतलेली आहे. तरी थकीत परिच्छेदांचा निपटारा करण्यासाठी नगरपरिषदेमार्फत कार्यक्रम आखून जास्तीत जास्त थकीत अनुपालन सादर करुन पुर्तता अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे. प्रस्तुत आक्षेपांबाबत मा. अध्यक्ष व मुख्याधिकारी नगरपरिषद यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

DATSPVM7601 (Ref No : 24, Hmm No : 50)

## *48 घसारा निधीबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***नगरपालिकेने स्थावर/जंगम मालमत्तेचा घसारा निधी ठेवलेला नाही.***

उपरोक्त बाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 51 दिनांक 10/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय

खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद साताराकडील सन 2014-15 चे लेखापरीक्षण केले असता, नगरपरिषद सातारा कडील घसारा निधीबाबत नगरपरिषदेने सदर निधी उभा केलेला नाही. परंतू ट्रॅक्टर, कचरागाडी इत्यादी वाहने असल्यामुळे मुंबई वित्तीय नियमावली घसारा निधी 1959 च्या नियम 149 टीप 2 च्या तरतूदीनुसार घसारा निधी उभा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचे निदर्शनास येत नाही. तरी सदर बाबत नियमबाहय आहे.तरी सदरचा घसारा निधी नियमानुसार उभा करणे आवश्यक आहे.

DATVSDM6301 (Ref No : 25, Hmm No : 51)

## *49 नगरपरिषदेमध्ये दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9इ*

***दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी आवश्यक असता अद्याप केलेली नाही.***

उपरोक्त बाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 52 दिनांक 10/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये नगरपरिषदेने दुहेरी नोंद लेखापध्दतीची अंमलबजावणी केली नाही. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, लेखास-102004/79/प्र.क्र.5/04/नवि-31 दिनांक 6/7/2005 नुसार दुहेरी लेखा नोंद पध्दतीची अंमलबजावणी करावी असे स्पष्ट निर्देश आहेत. याबाबत मागील लेखापरीक्षण अहवाल सन 2013-14 मध्ये आक्षेप क्रमांक 6 नोंद करुनही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी याबाबत तात्काळ कार्यवाही करावी व पुर्तता अनुपालन सादर करावे.

DATVSDM6301 (Ref No : 26, Hmm No : 52)

### *50 ऐक्य कॉर्नर ते दळवी घर अखेर रस्ता डांबरीकरण करणे.*

**रस्ते अनुदान**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : 00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 458181.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 458181.00/-

***मोजमाप पुस्तिकेत देयक क्रमांक, दिनांक, रक्कम असा तपशिल नोंदला नाही. तपशिलवार अंदाजपत्रक तयार केले नाही.***

प्रशासकीय मान्यता - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 254 दिनांक 12/11/2012

तांत्रिक मान्यता - मा. कार्यकारी अभियंता मजिप्रा सातारा जा.क्र./चिशा/तांमं/960 दिनांक 17/4/2013

लेखाशिर्ष - रस्ते

अंदाजपत्रकीय रक्कम - 859370/-

मक्तेदार - मे. डॉली इंटरप्रायजेस, सातारा

कामाचे आदेश - जा.क्र./साश्न/सांबां/1322 दिनांक 21/9/2013

कामाची मुदत - 10 दिवस काम पुर्ण दिनांक 15/11/2014

निविदा प्रक्रिया -

खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | देयक प्रकार |
|---|---|---|---|
| 558 | 9/7/2014 | 454181 | द्वितीय धावते देयक |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे संबंधीत कामावर केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 53 दिनांक 10/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नियम 180(3) अन्वये जेव्हा देयक मंजूर करण्यात येईल तेव्हा मोजणी पुस्तकात त्याचा प्रतिसंदर्भ नमूद करण्यात यावा असे सुचित करण्यात असतांना संबंधीत कामाच्या मोजमाप पुस्तिकेत देयक क्रमांक दिनांक, रक्कम इत्यादी तपशिल नमूद केलेला नाही.

2. सदर कामास कार्यकारी अभियंता, मजिप्रा सातारा यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. प्रत्यक्ष अंदाजपत्रक पहाता टाईप इस्टीमेट फॉर 100 चौरसमीटर वापरलयाचे दिसते. प्रत्यक्षात नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 158, 159, 161 प्रमाणे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

## *51 सातारा शहरातील कुपनलिका (बोअर) दुरुस्ती करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 445610.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 445610.00/-

***उपरोक्त कामाची फेरनिविदा काढलेली नाही. मुदतवाढीकरीता पुनः प्रत्यायी आदेश न देता ठेका सुरु ठेवला आहे. ठेकेदार या कामाकरीता सक्षम असल्याबाबत प्रमाणपत्रे दप्तरी नाहीत.***

कामाचे नांव - सातारा शहरातील कुपनलिका (बोअर) दुरुस्ती करणेबाबत.

प्रशासकीय मान्यता -

अंदाजपत्रकीय रक्कम - 41492/- (40500/-)

तांत्रिक मान्यता -

मक्तेदाराचे नांव - मे. राजू बबन पाटील

कामाचा आदेश - सानप/वाप/327/ दिनांक 7/2/2013

कामाची मुदत - 12 महिने

मोजमाप पुस्तक क्रमांक - 88 पान क्रमांक 208

| झालेला खर्च | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 40510 | 1292-18/10/2014 | 40510 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 89 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. उपरोक्त काम वार्षिक ठेका पध्दतीने मंजूर केले आहे. नस्ती पाहता सदर सन 2012-13 मध्ये पाणी पुरवठा समिती ठराव क्रमांक 799 दिनांक 5/11/2012 अन्वये मंजूर केला आहे. व ठेकेदारास सन 2014-15 मध्ये देखील कुपनलिका दुरुस्तीचे काम दिले आहे. कामाचे आदेश दिनांक 7/2/2013 रोजी एक वर्षाकरीता दिले आहे. मात्र यास मुदतवाढ घेतलेली नाही. यामुळे उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनासंक 2/1/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (परिशिष्ट 7) नुसार फक्त निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्यासच पुनर्प्रत्यायी आदेश देणे आवश्यक आहे. असे असतांना वरीलप्रमाणे संयुक्तिक कारण नसतांना दिलेली मुदतवाढ

नियमबाहय झालेली आहे.

2. सदर ठेक्यांचे दर 1 ते 9 बाबींकरीता मागविले आहेत. सदर दर सन 2012-13 मध्ये मंजूर केलेले आहेत. त्याच दरात सन 2014-15 मध्ये देखील आदाई केली आहे. वास्तविक बाजारभाव चौकशी करणे आवश्यक होते. तसेच सदर बाबत नगरपालिकेकडे या संदर्भातील तंत्रज्ञान व शासनाच्या भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांचेकडील अभिप्राय मागविणे आवश्यक होते. ते न मागविता केलेल्या निविदा मागविणे, ठेका देणे व मुदतवाढ न देता त्याच दराने ठेकेदाराकडून दुरुस्तीचे काम करणे याबाबी तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

3. नस्तीमधील नोंदीनुसार सदर नियुक्त ठेकेदार हा स्थापत्य अभियांत्रिकी पदविकाधारक आहे. व त्याच्याकडे कुपनलिका दुरुस्ती कामासंबंधीचे आवश्यक साहित्य असलेची कागदपत्रे, याबाबतच्या कामाचा पुर्वानुभवाची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

4. सदर खर्च प्रमाणक पहाता त्यासोबत दुरुस्ती केलेल्या कुपनलिका नादुरुस्त असल्याचा अहवाल काम केलेले ठिकाण, त्या परिसरातील नागरिकांची मागणी इत्यादी कागदपत्रे सोबत नाहीत. त्यामुळे दर्शविल्याप्रामणे दुरुस्तीची कामे झालेची खात्री होत नाही.

DATMVJM7001 (Ref No : 31, Hmm No : 89)

## *52 वाढीव पाणी पुरवठा योजना कुशल, अकुशल व तांत्रिक कर्मचारी नमून चालविणे.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 767250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 767250.00/-

***मुदतीनंतर निविदा प्रक्रिया राबविली नाही. मुदतवाढ न देता ठेका पुढे सुरु ठेवला आहे. ठेकेदाराकडील कर्मचारी योजना चालविण्यासाठी सक्षम असल्यबाबत कागदपत्रे दप्तरी नाहीत. मुदतवाढीबाबत कार्यादेश व करार सन 2014-15 मध्ये केलेली नाही.***

दर मंजूर - सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 730 दिनांक 7/8/2009

वर्क ऑर्डर - सानप/पापु/133/ दिनांक 28/8/2009

वाढीव वर्क ऑर्डर - सानप/पापु/160 दिनांक 1/10/2012

मुदतवाढ - नगरपरिषद सभा ठराव क्रमांक 165 दिनांक 20/1/2012

ठेका रक्कम - रुपये 69750/- दरमहा याप्रमाणे सन 2014-15 मध्ये एकूण अदा रुपये 767250/-

ठेकेदार - राजू बबन पाटील

याबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 88 दिनांक 11/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. सदर कामाच्या ठेक्यास सन 2009-10 मध्ये मंजूरी देण्यात आली आहे. त्यास तेथून पुढे प्रतिवर्षी मुदतवाढ देण्यात आली आहे. उपरोक्त मुदतवाढ दिनांक 20/1/2012 चा ठराव पाहता दिनांक 1/10/2012 पासून मुदतवाढ दिली आहे. मात्र मुदतवाढीचा कालावधी नमूद केलेला नाही व त्यानंतर त्याच मुदतवाढ ठरावावर सन 2014-15 अखेर ठेका सुरु ठेवला आहे. वास्तविक सन 2011-12 नंतर सन 2012-13 ते 2014-15 या दरम्यान मुदतवाढ घेतलेली नाही. महाराष्ट्र उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस/1088/2512/उद्योग-6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 ( परिशिष्ट 7) नुसार फक्त निविदा प्रक्रिया विलंब होत असल्यासच पुन:प्रत्यायी आदेश देणे आवश्यक आहे. सदर ठेक्यास चार वर्षे झाली असल्याने तसेच निविदा प्रक्रिया राबविली नसल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. तसेच सन 2012-13 मधील करारनाम्याच्या आधारे सन 2014-15 मध्ये ठेका पध्दती योजना चालविली आहे. त्यामुळे ठेकेदार करारातील अटी, शर्ती यांस बाध्य राहिला नाही.

2. सदर ठेक्याच्या दरमहाच्या प्रदानास फक्त टिपण मंजूर घेऊन ठेकेदरास प्रदान केले आहे. व यास शासन निर्णय क्रमांक भांखस 1008/प्रक्र 256/08 उद्योग-4 दिनांक 10/10/2002 नुसार कोणत्याही करारास मुदतवाढ देण्यात येऊ नये, अपवादात्मक परिस्थितीत अत्यावश्यक असेल तरच सक्षम प्राधिका-याच्या मते स्पष्ट कारणे नमूद करुन व कार्य नियमावलीनुसार योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र फक्त टिपणीद्वारे मुदतवाढ दिल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

3. याकरीता असलेल्या दिनांक 27/5/2009 च्या अंदाजपत्रकानुसार पंप ऑपरेटेड -2,फिल्टर ऑपरेटर -1, मजदूर लाईट-1, मजदूर हेल्पर-1, मॅकॅ/इले. इंजिनिअर इनचार्ज-1, इलेक्ट्रीशियन/वायरमन-1, असे एकूण 7 कर्मचा-यांचे शिफ्टनुसार व नियोजित कामकाजाचे अंदाजपत्रक तयार केले आहे, तथापिसदर ठेकेदारासमवेतचा मूळ करारनामा दिनांक 28/8/2009 व वाढीव मुदतीचा करारनामा दिनांक 28/9/2012 पाहता यामध्ये सदर ठेकेदाराकडे तांत्रिक, कुशल व अकुशल असे किती कर्मचारी कार्यरत आहेत व त्यांच्या कामकाजाचे स्वरुप, तांत्रिक कर्मचा-याचे कौशल्य प्रमाणपत्र इत्यादींबाबत आवश्यक तो तपशिल, प्रमाणपत्रे घेतलेली नाहीत. त्यामुळे पाणी पुरवठा योग्य मनुष्यबळाद्वारे सुरक्षित चालविण्यास ठेकेदार सक्षम असल्याची प्रमाणीत होत नाही.

DATMVJM7001 (Ref No : 32, Hmm No : 88)

## 53 निवृत्ती वेतन अंशदान नोंदवही व सेवापुस्तकातील तफावतीबाबत.

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***निवृत्ती वेतन अशदान नोंदवही व बँक पासबुक व रोख पासबुकातील रकमेतील तफावत ही नोंदवहीत व्यवस्थित नोंदविणे आवश्यक आहे.***

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 84 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. नगरपरिषद सातारा येथील सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करीता असता निवृत्तीवेतन अंशदान नोंदवही व पासबुक व रोखपुस्तकानुसार तपासणी केली असता खालीलप्रमाणे तफावती दिसून येते.

| महिना | पासबुकानुसार शिल्लक | निवृत्तीवेतन अंशदान नोंदवही शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|
| मार्च पेड एप्रिल 2014 | 139680 | 139680 | - |
| एप्रिल पेड मे 2014 | 137648 | 137648 | - |
| मे पेड जुन 2014 | 144348 | 144434 | 86 |
| जुन पेड जुलै 2014 | 146558 | 146558 | - |
| जुलै पेड ऑगस्ट 2014 | 152220 | 152380 | 160 |
| ऑगस्ट पेड सप्टेंबर 2014 | 153154 | 152220 | 934 |
| सप्टेंबर पेड ऑक्टोबर 2014 | 151112 | 148994 | 2118 |
| ऑक्टोबर पेड नोव्हेंबर 2014 | 148004 | 157268 | 9264 |
| नोव्हेंबर पेड डिसेंबर 2014 | 214244 | 214324 | 80 |
| डिसेंबर 2014 पेड जानेवारी 2015 | 217832 | 217914 | 82 |
| जानेवारी पेड फेब्रुवारी 2015 | 216272 | 216352 | 80 |
| फेब्रुवारी पेड मार्च 2015 | 210352 | 225600 | 15288 |

कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदान नोंदवही लिहीत असतांना ब-याच प्रमाणात जादा रक्कम नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचा-यांना जादा रक्कम जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नोंदी व्यवस्थित घेऊन तसे अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

## *54 भविष्य निर्वाह निधी लेख्यांबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 00 निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***भविष्य निर्वाह निधी अग्रीमाची वसुली ही आदेशात नमूद केल्याप्रमाणे विहीत हप्त्यांमध्ये केली जात नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या शेवटचा हप्ता अग्रीम स्वरुपात देण्यात आलेला आहे.***

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 83 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. भविष्य निर्वाह निधी अग्रीमाबाबतच्या नस्ती तपासल्या असता अग्रीमाचा प्रकार असे परतावा, ना-परतावा याबाबतचा उल्लेख नमुना नंबर 98 ( भविष्य निर्वाह निधी खर्च) वर घेण्यात आलेली नाही. अग्रीमाची नवीन मागणी अग्रीमामध्ये जमेस धरुन त्या थकबाकीचे जास्तीत जास्त 36 समान हप्ते करणे भविष्य निर्वाह निधी नियम 1998 नियम 13(4) अन्वये बंधनकारक आहे. मागील घेतलेल्या अग्रीम जमेस न धरता मागील हप्ता आहे तसा चालू ठेवला आहे.

उदा. श्री. मच्छिंद्र शंकर धडचिरे यांना 2013-14 मध्ये तीन वेळा अग्रीम देण्यात आले आहे.

प्रमाणक क्रमांक 95 दिनांक 12/6/2013 रक्कम रुपये 8000/-

प्रमाणक क्रमांक 172 दिनांक 2/9/2013 रक्कम रुपये 7000/-

प्रमाणक क्रमांक 303 दिनांक 4/2/2014 रक्कम रुपये 5000/-

व 2014-15 मध्ये प्रमाणक क्रमांक 103 दिनांक 2/7/2014 रुपये 30000/-

प्रमाणक क्रमांक 420 दिनांक 16/12/2014 रुपये 10000/- असे अग्रीम देण्यात आले आहे. परंतू परतावा पहिल्यापासून रुपये 700/- ठेवण्यात आला आहे. त्यामुळे उत्तरोत्तर भविष्य निर्वाह निधी खात्यावर रक्कम कमी होऊन निवृत्तीचे वेळी कर्मचा-याचे भविष्य निर्वाह निधी खाते अत्यल्प शिल्लक होण्याची शक्यता आहे.

2. सहाव्या वेतन आयोगाचा शेवटचा हप्ता रक्कम रुपये 935970/- एवढा आलेला आहे. परंतू ती रक्कम नगरपरिषदेने कर्मचा-यांना ॲडव्हान्स स्वरुपात दिलेला आहे. परंतू ती रक्कम देण्याबाबत तसा ठरावही घेतलेला नाही व आदेशाची प्रतही जोडलेली नाही.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण2009/प्र.क्र./106/09/नवि/14 दिनांक 31/8/2009 अन्वये तसेच नगरपालिका ठराव क्रमांक 883 मधील अट क्रमांक अन्वये सहाव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम 5 वर्षे नादेय असतांनाही ती परतावा योग्य रक्कम गृहीत धरुन घेऊन कर्मचा-यांना परतावा अग्रीम स्वरुपात दिल्या जात आहेत. सदर बाब नियमबाहय आहे.

3. मंजूर करण्याचे अग्रीम कोणत्या प्रयोजनासाठी आहे याचा तपशिल दिला जात नाही.

महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियमावली 1998 च्या तरतूदींचे पालन करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक 1 ते 3 ची पुर्तता करणे आवश्यक आहे.

DATSRCM7001 (Ref No : 37, Hmm No : 83)

## *55 नळ जोडणी गणना करणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***जलदाय व्यवस्थापन अभियंत्यांनी वर्षातून किमान एकदा नळ जोडणी गणना करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नाही.***

उपरोक्तबाबत लेखापरीक्षकाने संबंधीत संस्थेस अर्धसमासपत्र क्रमांक 82 दिनांक 18/05/2016 अन्वये खुलासा मागविला होता तथापि संबंधीत संस्थेने त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 93 नुसार जलदाय व्यवस्थापन अभियंत्याने कुठलीही नळजोडणी पाणीपट्टी आकारातून सुटली नाही. हे पाहण्यासाठी नळ जोडणीची वर्षातून किमान एकदा मोजणी करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे अनधिकृत नळ जोडणी संख्या व नगरपरिषदेने करावयाची दंडात्मक कार्यवाहीचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार नळ जोडणीची मोजणी करुन अनधिकृत नळ कनेक्शन नसल्याची खात्री पटवावी व अनधिकृत नळ कनेक्शन आढळलेल्या नळ कनेक्शनधारकावर दंडात्मक कार्यवाही करुन पुर्तता दाखवावी.

DATMSSM6801 (Ref No : 38, Hmm No : 82)

***56 वृक्ष लागवड व त्यांचे जतन वृक्ष गणना याबाबत.***

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***नगरपरिषद सातारा वृक्ष विभागाकडील उणिवांबाबत वृक्ष प्राधिकरणाचे 31 ऑक्टोबरपूर्वी स्वतंत्र बजेट सादर केले नाही. वृक्ष लागवड व वृक्षतोड प्रतिबंध यावर आवश्यक उपाययोजना केल्या नाहीत.***

अर्धसमासपत्र 79 दिनांक 11/5/2016 अन्वये खालील नमूद आक्षेपांबाबत उत्तर मागविले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमासपत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालील आक्षेप नमूद करण्यात आला आहे.

नगरपरिषद साताराचे सन 2014-15 मध्ये वृक्ष विभागाकडील उणिवांबाबत लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम 1975 अनुसार नगरपालिकेने खालील बाबींची कटाक्षाने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

1. वृक्ष प्राधिकरणाचे गठण करणे त्याकरीता 9 ते 15 सदस्यांची समिती नेमणे आवश्यक आहे. तसेच वृक्ष प्राधिकरणाच्या बैठका नियमित (45 दिवसांच्या आत) घेणे आवश्यक आहे.

2. वृक्ष प्राधिकरणाचे वेगळे बजेट 31 ऑक्टोबरपूर्वी करण्यात येऊन त्यास प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

3. वृक्ष प्राधिकरणाचे वेगळे खाते उघडणे आवश्यक आहे.

4.वृक्ष प्राधिकरणाने नागरी क्षेत्रातील संपूर्ण जमिनीवरील असणा-या वृक्षांची गणना दर पाच वर्षांनी करणे आवश्यक आहे.

5. निकामी मृत झाडांच्या जागी नविन झाडे लावणे तसेच पडीक भागामध्ये झाडे लावून विकसीत करणे याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे.

6. वृक्ष तोडीवर प्रतिबंध व त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

7. गेल्या पाच वर्षातील करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीपैकी किती वृक्ष जीवंत आहेत. याचा आढावा घेणे आवश्यक आहे. याचा पाठपुरावा न केलेस केलेला खर्च वाया जाऊन आर्थिक अनियमितता होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. कार्यवाहीची पूर्तता होणे आवश्यक आहे.

8. टी प्रिझर्वेधन अँड प्रोटेक्शन ॲक्ट 1975 नुसार वृक्ष प्राधिकरणाने नागरी क्षेत्रातील संपूर्ण जमिनीवरील असणा-या वृक्षांची गणना दर पाच वर्षांनी करावयाची आहे. तसेच बॅकलॉग भरुन काढण्यासाठी नियोजन करणेचे आहे. (मास्टरप्लॅन)
उपरोक्त 1 ते 8 बाबत योग्य ती पूर्तता दाखवावी.

DATSRCM7001 (Ref No : 47, Hmm No : 79)

## *57 विद्युत पोल व दिवे यांच्या नोंदवहया न ठेवलेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष : विद्युत नपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 144 नुसार नगरपरिषदेने नमुना नंबर 114 मध्ये पोलची नोंदवही ठेवलेली नाही.***

लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 78 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

नगरपरिषद साताराचे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचया लेखापरीक्षणाचे वेळी विद्युत विभागाचे लेखापरीक्षण केले असता महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 मधील नियम 144 नुसार नगरपरिषदेने नमुना नंबर 114 मध्ये विद्युत पोल बाबतची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. तसेच ठेवलेली नोंदवही प्राधकारी अधिकारी यांनी प्रमाणीत केलेली नाही. तसेच नियम 147(1) नुसार नमुना नंबर 119 मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात पुस्तक ठेवण्यात येऊन त्यात नगरपरिषदेने रस्ता प्रकाश योजनेमध्ये बसविलेल्या विद्युत दिव्यांची संख्या दर्शविणे आवश्यक आहे. परंतू सातारा नगरपरिषदेच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये अशा प्रकारची नोंदवही ठेवलेली नाही.

तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 चे नियम 147(2) नुसार नमुना नंबर 120 मध्ये विद्युत शक्तीच्या खपाची मीटर नोंदवही ठेऊन त्या मासिक मोजमापे नमूद करणे आवश्यक आहे. परंतू अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

DATSGKM6501 (Ref No : 48, Hmm No : 78)

***58 दिग्विजय ऑटोमोबाईल ते रयत शिक्षण संस्था अखेर डिव्हायडरमध्ये लॅम्प्स व केबल बदलणे.***

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*
गुंतलेली रक्कम रु. 285011.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 285011.00/-

***निविदा जाहिरातीत बयाणा रक्कम मुदतीत भरणा नसतांना निविदा उघडण्यात आल्या आहेत. निविदेत नमूद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता नसतांना निविदा उघडण्यात आल्या आहेत. विलंबाने काम पुर्ण करुनही दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.***

कामाचे नांव - दिग्विजय ऑटोमोबाईल ते रयत शिक्षण संस्था अखेर डिव्हायडरमध्ये लॅम्प्स व केबल बदलणे.
प्रशासकीय मान्यता - स्थायी समिती ठराव क्रमांक 877 दिनांक 17/9/2013
अंदाजपत्रकीय रक्कम - 417519/-
तांत्रिक मान्यता - जा.क्र.चिशा/तांम/2046/2014/मजिप्रादिनांक 8/8/2014
मक्तेदाराचे नांव - मनोज शेंडे मंजूर दर रुपये 4.99 टक्के जादा
कामाचे आदेश - सार्वजनिक बांधकाम विभाग जा.क्र/सानप/सांबां/पापु/आरोग्य/विद्युत 43 दिनांक 10/8/2014
काम सुरु दिनांक - 10/8/2014 - काम पुर्ण दिनांक - 10/10/2014
खर्चाचा तपशिल -

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 1532 | 20/11/2014 | 285011 |

याबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 77 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. उपरोक्त कामाची निविदा दैनिक पुण्य नगरी दिनांक 13/2/2014 मध्ये प्रसिध्द करण्यात आली असून निविदा भरण्याचा कालावधी दिनांक 17/2/2014 ते दिनांक 28/2/2014 मंजूर निविदाधारक यांनी प्रत्यक्षात बयाणा रक्कम रुपये 4180/- भरणा दिनांक 3/3/2014 रोजी करण्यात आली. त्याच दिवशी निविदा सादर करण्यात आलेली आहे. तरी उशीरा निविदा का स्विकारण्यात आल्या? तसेच फेर निविदा का मागविण्यात

आल्या नाही. तरी नियमबाह्यतेबाबत साधार खुलासा करावा.

2. प्राप्त निविदांपैकी कोमल इलेक्ट्रीकल्स व वरद विनायक इलेक्ट्रीकल्स यांचे संस्था प्रमाणपत्र, संस्था नुतनीकरण केले नसलेचे तसेच पॅन कार्डची झेरॉक्सची प्रत जोडली नसलेचे आढळून आले. म्हणजेच कागदपत्रे अपुर्ण असतांना लखोटा 2 (दराची निविदा) कशी उघडण्यात आली याचा खुलासा करावा.

3. निविदा जाहिरातीत निविदा दिनांक 28/2/2014 रोजी उघडण्यात येतील असे नमूद असतांना लखोटा 2 (दरसुची) प्रत्यक्षात दिनांक 26/6/2014 रोजी उघडण्यात आल्या. तरी उशीराने उशीराने निविदा उघडण्याचे प्रयोजन सादर करावे.

4. कामाच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे कार्यादेशाच्या तारखेपासून 15 दिवसांत काम पूर्ण करावयाचे असतांना मात्र प्रत्यक्षात काम दिनांक 10/10/2014 पुर्ण झाले आहे. म्हणजेच 30 दिवस उशीरा काम पुर्ण झाले आहे. उशीरा काम पुर्ण केलेबाबत नगरपालिकेने दंडात्मक कार्यवाही का केली नाही याचा साधार खुलासा करावा.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये 285011/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

DATSGKM6501 (Ref No : 49, Hmm No : 77)

## *59 शाहुकला मंदीर व देखभाल दुरुस्ती खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1643652.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1643652.00/-

***नगरपरिषद सातारा ने सन 2014-15 मध्ये शाहुकला मंदीर या नाटयगृहावर जमेपेक्षा खर्च जास्त केला आहे. वास्तववादी अंदाजपत्रक तयार केले नाही. उत्पन्न वाढविणेबाबत ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही.***

नगरपरिषदेने सन 2014-15 मध्ये शाहुकला मंदीर या नाटयगृहावर खालीलप्रमाणे जमा व खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | जमा | रक्कम | खर्च | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | भाडयापोटी जमा | 494350 | नाटयगृह आस्थापना<br>देखभाल व दुरुस्ती<br>विद्युत देयके | 1097876<br>164136<br>378640 |
| | एकूण | 494350 | | 1643652 |

याबाबत लेखापरीक्षकाने अर्धसमासपत्र क्रमांक 75 दिनांक 12/05/2016 अनवये खुलासा मागवूनही

त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. नगरपरिषद ठराव क्रमांक 1192 दिनांक 6/4/2011 अन्वये शाहुकला मंदीर या नाटयगृहाचे कार्यक्रमासाठी भाडे दर खालीलप्रमाणे ठरविण्यात आले आहेत.

अ. रुपये 300 व त्याखालील तिकीट दराचे कार्यक्रमाचे भाडे रक्कम रुपये 4500/-

ब. रुपये 300 पेक्षा जास्त तिकीट दराचे भाडे रुपये 7000/-

क. स्थानिक हौशी कलाकार, एकांकिका स्पर्धा इत्यादीसाठी भाडे दर रुपये 200/-

ड. तमाशा, ऑर्केस्ट्रा, नृत्य स्पर्धा इत्यादीसाठी भाडे रुपये 5000/-

इ. डिपॉझिट रक्कम रुपये 10000/- ते 200000/-

2. दिनांक 6/4/2011 नंतर सदर भाडेदरात आज अखेर कोणतीही वाढ करण्यात आली नाही. लेखापरीक्षण वर्षात रक्कम रुपये 1146202/- खर्चाचा बोजा नगरपरिषदेवर पडत आहे. तरी याबाबत मागील वर्षाच्या लेखापरीक्षणात अभिप्राय देण्यात आला असतांनाही भाडेवाढ का करण्यात आली नाही याचा साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

3. तसेच प्रत्येक खेळासाठी व कार्यक्रमाचे स्वतंत्र वीजमीटर रिडींग घेऊन त्याप्रमाणे आकारणी करुन ती रक्कम अनामत रकमेतून कपात करणे आवश्यक आहे.

4. मा. संचालक, नगरपरिषद संचालनालय, महाराष्ट्र राज्याचे स्थायी निदेश क्रमांक 12 सकिर्ण-2011/प्र.क्र.246/2001/4 दिनांक 10/4/2001 अन्वये नगरपरिषदेमार्फत पुरविल्या जाणा-या सेवा आर्थिकदृष्टया तोटयात असल्यास तोटा भरुन काढणेबाबतचा अहवाल वार्षिक अर्थसंकल्पात सोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे नगरपरिषदेने शाहू कलामंदीर या नाटयगृहापासून किती उत्पन्न मिळाले व खर्च किती झाला याचा खुलासा होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर नाटयगृहापासून उत्पन्न वाढविणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5. सन 2014-15 च्या अंदाजपत्रकाचे अवलोकन करता नगरपरिषदेत जमेसाठी रक्कम रुपये 500000/- इतकी तरतूद केली असून मागील वर्ष 2013-14 पेक्षा 200000/-ने कमी करण्यात आली आहे. तरी अंदाजपत्रकीय जमा तरतूद वाढवून त्यादृष्टीने उपाययोजना करुन उत्पन्न वाढविणे गरजेचे असतांना जमा तरतूद काय आधारे कमी केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच खर्चासाठी सन 2014-15 मध्ये यरुपये 2100000/- इतकी तरतूद असून खर्च रुपये 1640552/- झाला आहे. म्हणजेच रक्कम रुपये 459448/- इतका कमी खर्च झाला आहे. म्हणजेच नाटयगृहाबाबतचे अर्थसंकल्पीय अंदाज वस्तुस्थित धरुन वास्तववादी करण्यात आलेले नाही. जादा रकमेचे अंदाजपत्रक केल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये अनावश्यक वाढ झाली आहे. रक्कम रुपये 1146202/-ची तुट भरुन काढणेबाबत उपाययोजना न करता अंदाजपत्रकात जादा तरतूद करणे ही बाब नगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

DATSGKM6501 (Ref No : 51, Hmm No : 75)

## *60 अनामत नोंदवहीबाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 95*

गुंतलेली रक्कम रु. 686155.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 686155.00/-

***तीन वर्षावरील अनामत रक्कमा अद्याप व्यपगत केल्या नाहीत. प्रमाणकासोबत जमा अनामतीची मूळ पावती तसेच मागणीचे अर्ज जोडले नाहीत.***

नगरपरिषद साताराकडील सन 2014-15 चे लेखापरीक्षणाचे वेळी अनामत नोंदवहीची पडताळणी करता सन 2011-12 ते 2014-15 अखेर एकूण अनामत रक्कम रुपये 68997855/- शिल्लक असल्याचे दिसून येते. यावर लेखापरीक्षणाचे लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 74 दिनांक 12/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 190(3) नुसार तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत हक्क न सांगितलेल्या सर्व रकमा प्रत्येक वर्षाच्या अखेरीस व्यपगत करणे आवश्यक आहे. तथापि सन 2010-11 अखेर शिल्लक रक्कम रुपये 9648999/- इतकी रक्कम नियमानुसार व्यपगत न करता त्यापैकी रुपये 686155/- चा परतावा केला आहे. याबाबत खुलासा करुन आता शिल्लक रक्कम रुपये 8962844/- व्यपगत करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

2. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 190(1) नुसार प्रत्येक ठेवीच्या प्रकारासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही अथवा त्याच नोंदवहीत पृष्ठांचे वेगळे गट करण्यात आलेले नाहीत. याबाबत खुलासा करुन नियमानुसार कार्यवाहीची पुर्तता दाखवावी.

3. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 190(4) नुसार नगरपालिका फंडात जमा झालेल्या ठेवी नगरपालिका मंजूरीशिवाय परत करता येणार नाही आणि जेव्हा त्या परत करण्यात येतील तेव्हा ठेव नोंदवहीत व्यपगत झाल्याच्या मूळ नोंदींसमोर टिप देण्यात यावी. याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. अनामत रकमा परत करतांना प्रमाणकासोबत तपासणी सुची मूळ जमा पावती अथवा संबंधीतांचे मागणी अर्ज नाहीत. खुलासा करावा. आता, मागणी अर्ज मूळ पावती उपलब्ध करुन परत केलेल्या अनामत रकमा योग्य असलेची खात्री पटवावी.

5. अनामत रक्कम परत करतेवेळी मुख्याधिकारी यांनी पडताळणी करुन नोंदवहीत स्वाक्षरी करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही. याबाबत योग्य तो खुलासा करावा.

*61 नगरपालिका फंडातून केलेल्या निवडणुक खर्चाबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष :00 नपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 105189.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 103949.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 1240.00/-

***निवडणुक खर्चासंबंधी निवडणुक निर्णय अधिकारी यांचे आदेश नसतांना खर्च केला आहे. खर्चापूर्वी निविदा प्रक्रिया राबविली नाही व प्रतिपुर्तीची मागणी केली नाही.***

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 1381 | 20/10/2014 | 62000 | विधानसभा निवडणुक खर्च |
| 2743 | 31/3/2015 | 43189 | लोकसभा निवडणुक खर्च |
| एकूण | | 105189 | |

उपरोक्त खर्चाबाबत लेखापरीक्षणकाने अर्धसमासपत्र क्रमांक 70 दिनांक 11/05/2016 अनवये खुलासा मागवूनही त्याबाबत संबंधीत संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) अ.क्र. 1 च्या प्रमाणकाद्वारे दिनांक 14/10/2014 व 15/10/2014 रोजी टाकलेल्या मंडप व खुर्चीचे देयक श्री. ऑंकार डेकोरेटर्स सातारा यांना तर अ.क्र. 2 च्या प्रमाणकाद्वारे मतदान केंद्र रामाचा गोट व बुधवार नाका येथील मतदान केंद्राची दुरुस्ती केलेल्या कामाचे देयक जितेंद्र औंधकर यांना अदा केले असून सदर कामे करणेसंबंधी मा. निवडणुक निर्णय अधिकारी यांचे आदेश लेखापरीक्षणास पहावयास न मिळाल्याने नगरपरिषद फंडातून सदर देयके काय आधारे अदा करण्यात आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) प्र.क्र. 1381 द्वारे आदा देयकासोबत संबंधीतांनी रुपये 7400/- , 42000/- चे सादर केलेले असतांना प्रमाणकासोबत रुपये 6000/- ची 73 प्रमाणके तयार करण्यात आलेली आहेत. त्यामुळे दोन्ही प्रमाणकाद्वारे अदा रक्कम करणेसंबंधी निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

3) श्री. ऑंकार डेकोरेटर्स सातारा यांना अदा देयकातून आयकराची कपात करणे

आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे संबंधीतांचे पॅन कार्ड असल्यास रुपये 620/- तर पॅनकार्ड नसल्यास रुपये 1240/- प्रमाणे आयकर कपात करणे आवश्यक आहे.

4) निवडणुक कामी शासनाकडे स्वतंत्र तरतूद असतांना उपरोक्त प्रमाणकाद्वारे केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडून करुन घेणे आवश्यक असतांना यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार नगरपालिकेने केल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे दुबार खर्च होणेची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त पुर्ततेअभावी खर्च रुपये 103949/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन व रक्कम रुपये 1240 अंतिम अमान्य ठेवणेत येत आहे.

DATYSSM8201 (Ref No : 54, Hmm No : 70)

